# महायोग विज्ञान

अनुवादक

प.पू. श्री योगिराज वामनरावजी द. गुळवणी महाराज



शक्तिपात योगसाधनेसंबंधी अपूर्व प्रमाणग्रंथ

प.पू. श्री योगानंदजी महाराजलिखित ग्रंथाचा अनुवाद

।। श्री गणेशदत्तगुरुभ्यो नमः ।।

पू. योगेन्द्रविज्ञानीमहाराज लिखित हिंदी ग्रंथातील काही प्रकरणांचा मराठी अनुवाद

# "महायोग विज्ञान"

## सुबोध दर्शन

"यत्र शक्तिर्न पतति तत्र सिद्धिर्न भवति"

सूत संहिता

भक्त्या पारायणैरेव दत्तात्रेयो जगद्गुरुः ।
दत्त्वा च मस्तके हस्तं शक्तिपातं करोति हि ।।

द्विसाहस्री

अनुवादक

प. पू. वामन दत्तात्रेय गुळवणी महाराज

श्रीवासुदेव निवास प्रकाशन, पुणे ४

महायोग विज्ञान (मराठी अनुवाद)

प. प. श्री वासुदेवानंद सरस्वतीमहाराज आणि
प. प. श्री लोकनाथतीर्थ स्वामी महाराज स्मारक ट्रस्टतर्फे चालविलेल्या
श्री वासुदेव निवास प्रकाशनातर्फे प्रकाशित

■ प्रकाशक
**श्री शरद ज. जोशी**
प्रधान विश्वस्त, श्रीवासुदेव निवास, ४२/१७ एरंडवणा
कर्वे पथ, पुणे ४११ ००४

■ मुद्रक
संवाद ट्रेडप्रिंट्स प्रा. लि.
पुणे
दूरध्वनी : ०२०-२४४८५६३२

© **सर्व हक्क प्रकाशन संस्थेकडे सुरक्षित**

■ **प्रकाशन दिन**
**प्रथम आवृत्ती : प. पू. गुळवणीमहाराज पुण्यतिथी**
पौष व ७ शके १९१३ रविवार २६ जाने. १९९२

■ **द्वितीय आवृत्ती (२५०० प्रति)**
ज्येष्ठ व. ४ शके १९१८ मंगळवार दि. ४/६/९६

■ **तृतीय आवृत्ती**
भाद्रपद शु. १४ शके १९२३ दि. १/९/२००१

■ **चतुर्थ आवृत्ती**
वैशाख शु. १२, दि. ११ मे २०१४

■ मूल्य ₹ ३०/-

दुसऱ्या आवृत्तीसंबंधी थोडेसे

# ॐ महायोग विज्ञान ॐ

प. पू. गुळवणी महाराज यांच्या अमोघ संकल्पाने हे कार्य घडत आहे. या ग्रंथात महायोग विज्ञानासंबंधी गुरु-शिष्य यावर महाराजांचे विवेचन अधिकार वाणीने आलेले आहे.

सर्व भाविक सज्जनांचे करिता प. पू. श्री. गुळवणी महाराजांचे संकल्प प्रभावाने आज पुन्हा प्रसिद्ध करण्याचा योग आला आहे. ईश्वरकृपेने सर्व भाविकांना यांचे वाचन, चिंतन घडून योग्य मार्गदर्शनाने ते कृतार्थ व्हावेत अशी भगवान श्रीवासुदेवांजवळ निरंतर प्रार्थना आहे.

ज्येष्ठ कृ. ४. शके १९१८
दि. ४-६-९६, पुणे ४

**श्री गुरुकृपाकांक्षी**
द. धुं. कवीश्वर - प्र. विश्वस्त,
श्रीवासुदेव निवास, कर्वे रोड, पुणे ४

---

।। श्री गणेश दत्तगुरुभ्यो नमः ।।

तिसऱ्या आवृत्तीसंबंधी थोडेसे

प. पू. गुळवणी महाराज यांच्या अमोघ संकल्पाने हे कार्य घडत आहे. या ग्रंथात महायोग विज्ञानासंबंधी गुरु-शिष्य यावर महाराजांचे विवेचन अधिकार वाणीने आलेले आहे.

संत महात्म्यांच्या मार्गदर्शक ग्रंथाचे वाचन-चिंतन-मनन श्रद्धेने घडल्यास प्रपंच व परमार्थ सुखाचा होतो. प्रारब्ध ईशकृपेने संपून जावे या दृष्टीने वरील ग्रंथाचे वाचन-चिंतन यायोगे सर्वांचे जीवन कृतार्थ व्हावे, अशी भगवान् वासुदेवांजवळ निरंतर प्रार्थना आहे.

भाद्रपद शु. गणेश ४ शके १९२३
दि. २२-८-२००१

श्री गुरुकृपाकांक्षी
**श्री नारायणकाका ढेकणे**
**प्रधान विश्वस्त**
श्री वासुदेव निवास, कर्वेरोड, पुणे ४

चौथ्या आवृत्तीसंबंधी थोडेसे

# ॐ महायोग विज्ञान ॐ

महायोग विज्ञान हा ग्रंथ शक्तिपात योगसाधन परंपरेतील महान आचार्य पू. श्री योगेंद्र विज्ञानीजी महाराज यांनी प्राचीन ग्रंथांच्या आधारे हिंदी भाषेत विवेचन केलेला ग्रंथ आहे. या ग्रंथातील काही प्रकरणांचा मराठी अनुवाद प. पू. योगिराज श्री गुळवणी महाराजांनी अनुवादित करून सर्व साधकांच्या सोयीसाठी लिहिला. प. पू. गुळवणी महाराज यांच्या अमोघ संकल्पाने हे कार्य घडत आहे. या ग्रंथात महायोग विज्ञानासंबंधी गुरु-शिष्य यावर विवेचन महाराजांचे अधिकार वाणीने आलेले आहे.

सर्व भाविक सज्जनांचे करीता प. पू. श्री गुळवणी महाराजांचे संकल्प प्रभावाने आज पुन्हा ४ थी आवृत्ती प्रसिद्ध करण्याचा योग आला आहे. प्रकाशन संस्था, साधक, जिज्ञासू आदि सर्वांनाच याचे समाधान होत आहे.

ही आवृत्ती प.प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या समाधी शताब्दी वर्षाचा सुयोग व श्रीवासुदेव निवासाच्या सुवर्ण महोत्सवाचा सुयोग साधून येत आहे हीच ईशकृपा!

सर्व भक्त मंडळींचे-अभ्यासकांचे परमकल्याण श्रीस्वामीकृपेने साध्य होवो ही त्यांचे चरणारविंदी प्रार्थना !

**आपला**
**शरदभाऊ ज. जोशी**
**प्रधान विश्वस्त**
**श्रीवासुदेव निवास पुणे**

**वैशाख शुद्ध द्वादशी शके १९३६,**
**दि ११ मे २०१४ पुणे ४.**



प. पू. श्री. योगिराज गुळवणी महाराज

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः

# साधन माहात्म्य दिग्दर्शन

**पू. श्री. दत्तमहाराज कवीश्वर**
'श्रीवासुदेवनिवास' पीठाधीश्वर

**सदानन्दति विद्वत्वात् सर्वदाऽति विभुत्वतः ।**
**मृत्युञ्जयति योगित्वात् यः स मे हृदि तिष्ठतु ।।**

श्रीवासुदेवानन्दसरस्वती महाराज,

श्रीयोगेन्द्र विज्ञानी (श्रीयोगानन्दजी) हृषिकेश, प्रणीत हिन्दी भाषेतील 'महायोगविज्ञान' ग्रंथस्थ काही भाग श्रीगुळवणी महाराजांनी मराठीत अनुवादिलेला, ग्रंथरूपाने, सर्व साधकांच्या सोयीसाठी आज प्रसिद्ध होत आहे ही भगवत्कृपाच आहे यात संशय नाही. याबद्दलचे, प्रस्तावना रूपाने दिग्दर्शन, ख्यातनाम, अभ्यासू, गुरुभक्त श्री. अच्युतराव पोटभरे यांनी केलेले आहे. त्यावरून या ग्रंथाची सर्वांगीण माहिती व उपयुक्तता लक्षात येईलच. तसेच सूतसंहितादि प्रमाण ग्रंथांच्या आधाराने, 'श्रीवासुदेवनिवास व पंथराज' या त्रैमासिकातून चालू असणाऱ्या, डॉ. श्री. जगन्नाथ जोशी, प्रपाठक, तत्त्वज्ञानमंदिर अंमळनेर - यांच्या लेखमालेतील लेखांचा भाग १, मागील वर्षी श्रीवासुदेव निवासाश्रमातर्फे प्रकाशित झालेला आहे. त्यावरूनही पारमार्थिक अनेक साधनसंप्रदाय व शक्तिपातसाधन संप्रदाय यांची समन्वय दृष्टीने दिलेली माहिती जिज्ञासू साधकांना चांगली उपयुक्त ठरणारी वाटेल.

प्रपंच हा एका जन्मापुरता असून, परमार्थ मार्गाचा संबंध मोक्ष मिळेपर्यंत अनेक जन्मांशी आहे. या दृष्टीने कोणत्याही एका संप्रदायाचा किंवा एखाद्या ग्रंथाचा संबंध सर्वत्र पोचणारा व उपयुक्त ठरणारा असणे कठीण आहे. '**बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते । वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ।।**' या प्रमाणे, जीवाच्या अंतिम, पूर्ण स्थितीचा निर्णय श्रीभगवंतांनीच देऊन ठेवला आहे. ही अंतिम उच्चतम भूमिका प्राप्त करून घेणे अत्यंत कठीण आहे. ती फक्त ईश्वराच्या व ईश्वरस्वरूप पूर्णप्रज्ञ महात्म्यांच्या, सद्गुरुंच्या परमकृपेनेच प्राप्त होणारी आहे.

ही स्थिती म्हणजेच आत्मविद्या – आत्मसाक्षात्कार होय. याचेच दिग्दर्शन, देवीमाहात्म्याच्या चौथ्या अध्यायात इंद्रादि देवांनी श्रीभगवतीची स्तुती करीत असताना पुढीलप्रमाणे केले आहे.

> **'यामुक्तिहेतुरविचिंत्य महाव्रता त्वम् अभ्यस्यसे सुनियतेन्द्रिय तत्त्वसारैः ।**
>
> **मोक्षार्थिभिर्मुनिभिरस्तसमस्त दोषैर्विद्यासि सा भगवती परमा त्वमेव ।।'**

आत्मविद्याच सर्व साधकांनी मुख्य प्राप्त करून घ्यावयाची आहे. तरच जीवभाव नाहीसा होऊन, सर्व दुःखनिवृत्तीरूप मुक्ती प्राप्त होणारी आहे. सर्व दुःखाबरोबर दुःख भोगणाराही नाहीसा होऊन त्याचे अविनाशी असे पूर्णानन्द स्वरूप शेवटी प्राप्त होते. असे फल कोणत्याही इतर संप्रदायांतून न दाखविलेले श्रीभगवत्पादशंकराचार्यांच्याच संप्रदायात आहे आणि ते, दाखविलेले 'भाष्यकाराते वाट पुसत' लिहिणाऱ्या श्रीज्ञानराजांनाही पूर्ण मान्य आहे. 'स्वस्ति श्रीमहेशु लोपवूनि जगदाभासु । दावी मग ग्रासु प्रकटिला करी' या श्रीज्ञानदेवांनी लिहिलेल्या उत्तराच्या पहिल्या ओवीवरून देखील श्रीज्ञानराजांचा अभिप्राय प्रकट होणारा आहे.

अशी आत्मविद्या – श्रीभगवतीचे स्वरूप, प्राप्त करून घेण्यासाठी, देवांनी त्या श्लोकात साधननिर्देशही सुचविला आहे. 'अविचिंत्य महाव्रता' 'सुनियतेंद्रियतत्त्वसारैः अभ्यस्यसे' 'मोक्षार्थिभिर्मुनिभिः' 'अस्तसमस्त दोषैः' या पदांतून आत्मविद्या साधनांचा महत्त्वपूर्ण निर्देश झालेला आहे. 'अविचिंत्य महाव्रता' या शब्दात, यमनियमादि सर्व योगांगांचा, सर्व स्थितप्रज्ञ लक्षणांचा, सर्व भगवद्भक्त लक्षणांचा, सर्व गुणातीत लक्षणांचा, सर्व दैवी संपत्तीचा – गीतानिर्दिष्ट लक्षणांचा, समावेश झालेला आहे.

अनेक जन्म, ईश्वर प्रार्थनापूर्वक केल्या जाणाऱ्या साधनाभ्यासांनी, शुभाशुभ कर्मसाम्य दशेत पोचलेल्या परिपक्वमल अशा उत्तमप्रज्ञ साधकालाच; शाब्दे परेच निष्णात असणारे सद्गुरू; शक्तिपात दीक्षेने त्याचा जीवभाव नाहीसा करून त्याचे मूळचे परब्रह्म स्वरूप – पूर्णानन्द स्वरूप – प्रकट करून देतात.

तोपर्यंत दीक्षा मिळालेल्या किंवा न मिळालेल्या सर्वही साधकांनी वरील 'ज्ञप्तेस्तु कारणं राम शिष्य प्रज्ञैव केवलम्' ही श्रीवसिष्ठांना अभिप्रेत असणारी,

तत्काल, वरीलप्रमाणे श्रीगुरुकृपा करून देणारी योग्यता मिळविण्याकरिता तळमळीने प्रयत्न करीत राहणे भाग आहे.

या उद्देशानेच श्रीवासुदेवानंद सरस्वती महाराजांनी – 'स्ववर्णाश्रमधर्मेण तपसा हरितोषणात् । ईश प्रसादः, तद्रूपः सुलक्षणाश्चाच सद्गुरुः । सद्गुरोः संप्रसादेऽस्य प्रतिबंधक्षयस्तथा । दुर्भावना तिरस्काराद्विज्ञानं जायते क्षणात् ।' याप्रमाणे सर्व साधनाभ्यासाने योग्यता प्राप्त होताच श्रीगुरुकृपेने तत्काल आत्मविद्या प्राप्त होते असे दर्शविले आहे.

याला श्री नामदेवरायांचे उदाहरण पुरेसे होईल. तसेच केवळ आपण होऊन श्रीज्ञानराजांकडे जाऊ इच्छिणारे श्रीचांगदेव योगिवर्य आपल्याच बुद्धीच्या दुर्भावनेने थांबले गेले हेही लक्षात येण्यासारखे आहे. सद्गुरूंची कृपादृष्टी होऊनही काल–कर्म व मूलाज्ञान – यांनी प्रतिबंध होतो. याचे उदाहरण – देवाचा परमसखा अर्जुनाचे आहे. प्रत्यक्ष श्रीकृष्णदेवांच्या मुखातून आत्मविद्या ऐकूनही, तत्काल ती स्थिती झाली व पुढे श्रीकृष्ण निर्याणानंतर ती आपोआपच अर्जुनाच्या चित्तात प्रकट झाली. म्हणजे त्याला देवगुरूपासून ही विद्या मिळाली पण ती काही काळ स्थगित राहून पुढे ती स्वयं त्याच्या चित्तातच आविर्भूत झाली. म्हणजे अर्जुनाचे ठिकाणी दैवविद्या–आर्षविद्या व पौरुषविद्या असा तिघांचाही एकत्र समावेश झालेला दिसतो. त्याचा देव–गुरू भक्तिप्रभावाने झालेला दैवीसंपत्तिरूप साधनाभ्यासही फलद्रूप झाला व शेवटी गुरुप्रसादरूप शक्तिपाताने तत्काळ आत्मविद्याही प्राप्त झाली.

श्रीनारदजींनीही श्रीव्यासजींना भागवत प्रथम स्कंधात सांगितलेले आत्मचरित्रही याबद्दल उद्बोधक आहे. यावरून प्रत्येक साधकाने कर्म–भक्ती–परोक्षज्ञान–ध्यानयोग–अशा यथासंभव साधनांनी आपली योग्यता वाढवीत राहाणे हेच साधकाचे मुख्य कर्तव्य संतमहात्म्यांनी सर्वत्र वर्णिलेले आहे. सिद्धमहात्मे–सद्गुरू यांचे कर्तव्य शेवटी ते करतातच व शिष्याला तत्काळ आत्मविद्या देऊन मुक्त करतात.

सर्वही पारमार्थिक साधने, श्रुती–स्मृतीही सदाचार व निर्दोषबुद्धिरूप आत्मतुष्टी या प्रमाणावरच अवलंबून असल्याने त्यांचे आचरण यथासंभव करीत राहून साधनाभ्यासही – दीक्षा प्राप्त असेल तर – तोही, करीत राहण्यानेच मुक्तिफलाद्य लाभ होणारा आहे.

'तुका म्हणे येथे न चाले तातडी । प्राप्तकाळ घडी आल्यावीण ।।' हे लक्षात ठेऊन 'सत्कर्म योगे वय घालवावे' या आदेशाचे पालन करण्यानेच खरे हित साध्य

होणारे आहे. या दृष्टीने विचार करून श्रीवासुदेवानन्दसरस्वती महाराजही देवाच्या सांगण्यावरूनच, एका खेडेगावात राहणाऱ्या, सामान्य दिसणाऱ्या, योगज्ञ, माणसाकडे जिज्ञासेने गेले व योगमार्गातील अडचण सोडवून घेऊन परत आले. हाही त्यांच्या चरित्रातील भाग विचारणीय आहे. अशा समन्वय दृष्टीने साधनाभ्यास होत राहिल्यासच, असूया - मत्सरादि चित्तदोष नामशेष होऊन, चित्त पूर्णपणे निर्दोष होऊन योग्यता प्राप्त होते.

**'कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।'**
**'हेचि थोर भक्ति, आवडते देवा, संकल्पावी माया संसाराची ।।'**

ही चित्ताची पूर्ण शक्तिपात योग्यता, महापुरुषांनी दाखविली आहे.

शक्तिपातयोगही श्रुती-स्मृत्यादि प्रमाणमूल आहे आणि कर्म-भक्ती इत्यादी साधनेही त्याच प्रमाणांच्या आधारावर आहेत. करिता आपली एकनिष्ठा जाईल की काय अशी भीती बाळगण्याचेही कारण नाही. उलट ती वाढण्यासच उपयोग होईल. शरीरातील ज्वरादि दोष निघून गेल्यावरच शक्तिवर्धक औषध खरे उपयोगी पडते. नाहीतर आधी विश्वरूप दाखवा म्हणणारा अर्जुनच ते दाखविताच भिऊन 'नको, नको - पहिले चतुर्भुज रूपच दाखवा' असे म्हणू लागला. अशी स्थिती व्हावयास नको.

पूर्ण स्थितीत पोचलेल्या सर्व महापुरुषांना सर्व साधनांचे ज्ञान असते. परंतु ते प्रत्येकाच्या अधिकाराप्रमाणे मार्गदर्शन करीत राहतात. त्यांच्यामध्ये तर-तम भाव कोणीही कधीही मानू नये व व्यक्तही करू नये. 'साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपी मिळाले । अवघे मिळोनी एकचि झाले । देहातीत वस्तू ।।'

हा समर्थांचा आदेश लक्षात ठेवून साधनरत रहावे ही प्रार्थना.

पौष शु. २-भौमवार १९१३.
दि. ७-१-१९९२

सज्जन कृपाभिलाषी
**दत्तात्रेय कवीश्वर**

# ग्रंथासंबंधी निवेदन

## 'महायोग विज्ञानचे मराठी भाषांतर'
## ''साधकांसाठी अपूर्व ग्रंथ''

**भक्त्या पारायणैरेव दत्तात्रेयो जगद्गुरुः ।**
**दत्वा च मस्तके हस्तं शक्तिपातं करोति हि ।।**

**द्विसाहस्री – प्रस्तावना.**

महायोगसाधनेचे रहस्य व महत्त्व भारतीय वेदांताधारे स्पष्ट करणारा हा ग्रंथ आहे. योगानुभूतिसंपन्न, विद्यमान शक्तिपात योगसाधन परंपरेतील महान आचार्य पू. श्री. योगेन्द्र विज्ञानीजी महाराज उर्फ श्रीयोगानंदजी महाराज यांनी अनेक प्राचीन ग्रंथांचे आधार देऊन स्वानुभूती देणाऱ्या शक्तिपात योगाचे म्हणजेच महायोगाचे सुस्पष्ट विवेचन केलेला हा ग्रंथ मूळ हिंदी भाषेत आहे. इ. स. १९३८ मध्ये ऋषिकेशहून प्रथम प्रकाशित झाला.

पू. श्री. योगानंदजी हे या महायोग परंपरेतील महान प्रवर्तक – प. प. श्रीनारायणदेवतीर्थ स्वामी महाराज, ज्ञानसाधनमठ, मदारीपूर, बंगार यांचे शिष्य. म्हणजे प. प. श्रीशंकर पुरुषोत्तमतीर्थ स्वामी महाराज आणि पू. श्री. योगानंदजी हे गुरुबंधू होते. एक परंपरा उत्तर भारतात गेली आणि एक परंपरा दक्षिण भारतात आली. प. प. श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ स्वामी महाराजांचे शिष्य प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज यांचे द्वारा ही महायोग परंपरा दक्षिणेत – महाराष्ट्रात आली. त्याचप्रमाणे पू. श्री. योगानंदजी महाराज यांनी व त्यांचे शिष्य प. प. श्री. विष्णुतीर्थ स्वामी महाराज यांनी मध्यप्रदेश देवास आणि उत्तरप्रदेश – ऋषिकेश येथे आश्रम स्थापन करून त्या भागात या महायोग विद्येचा प्रसार केला.

प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराजांचे शिष्य पू. श्री वामनरावजी गुळवणी महाराज यांनी महाराष्ट्रात व अन्यत्र, भारत व भारताबाहेरही या महायोगाचा फार मोठा प्रसार केला. तसेच प. प. श्रीविष्णुतीर्थ स्वामी महाराज यांचे शिष्य प. प. श्रीशिवोम् तीर्थ स्वामी महाराज यांनीही विशेषतः मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश – अन्यत्र भारत व भारताबाहेर अमेरिकादि देशात आश्रमकेंद्र निर्माण करून प्रसार चालविला आहे. प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराजांचे दुसरे एक शिष्य पू. श्री.

नारायणराव ढेकणे, सुपरिटेंडेंट इंजिनिअर (सेवानिवृत्त) यांनीही या परंपरेचा प्रसार नाशिक व मध्य महाराष्ट्रात भरपूर केला असून त्यांनी नाशिक येथे प. पू. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराजांचे भव्य मंदिरही निर्माण केले आहे.

या महायोग परंपरेची अनेक समर्थ केंद्रे- आश्रम स्थापन करून या दिव्य मार्गाचा प्रसार करीत आहेत. १) पुणे येथील श्रीवासुदेवनिवास हे पू. श्री. गुळवणी महाराजांनी निर्माण केलेले केंद्र प्रमुख आहे. २) नाशिक येथील श्री. नारायणराव ढेकणे यांनी स्थापलेले 'महायोग मंडळ' हे केंद्र (स्वामींचे मंदिर) ३) वाराणसी येथील छोटीगैबीतील 'सिद्धयोगाश्रम' हे स्थान स्वतः प. प. श्रीशंकर पुरुषोत्तमतीर्थ स्वामी महाराज यांनी सर्वात प्रथम निर्माण केले. ४) यांनीच दुसरे स्थान 'शंकरमठ' नावाने उत्तरकाशीमध्ये निर्माण केले. ५) ऋषिकेश येथे 'विज्ञानभवन' नावाने ग्रंथलेखक पू. श्रीयोगेन्द्रविज्ञानी यांनी या महायोगाचे स्थान निर्माण केले. ६) प. पू. श्रीविष्णुतीर्थ स्वामी महाराजांनी मध्यप्रदेशात देवास येथे 'नारायणकुटी' हे स्थान ७) आणि उत्तरप्रदेशात ऋषिकेश येथे 'योगश्रीपीठ' (मुनीकी रेती) हे स्थान निर्माण केले. ८) मुंबई-पनवेल मार्गावर दहिसर येथे 'देवात्मशक्ति केंद्र' नावाने प. प. श्रीशिवोम्‌तीर्थ स्वामीमहाराजांनी स्थान निर्माण केले आहे. याशिवाय आणखी कितीतरी छोटी मोठी केंद्रे या महायोगाचा प्रसार करीत आहेत. सर्वांचा उल्लेख अशक्य नि अनावश्यक आहे.

हेतू एवढाच की प्रत्यक्ष अनुभूती देणारा आणि स्वयंभू मार्गदर्शन करणारा हा महायोग साधनमार्ग आहे. या परंपरेचे विशाल होत चाललेले स्वरूपही लक्षात यावे व या मार्गासंबंधी किमान साधकबंधूंना तरी अशा ग्रंथाचा फार मोठा लाभ व्हावा हा आहे.

मूळ ग्रंथाला लेखकाने लिहिलेली 'वक्तव्य' नावाची छोटी प्रस्तावना मननीय आहे. ती अनुवाद करून खाली देत आहे.

## वक्तव्य

भारतवर्षात योगाचे माहात्म्य अखंडपणे चालत आले आहे. योगज्ञ ऋषीमुनी आणि योगी थोर पुरुषांनी या विषयावर अनेक ग्रंथ लिहिले असून ते अद्यापपर्यंत आमच्या वर्तनव्यवहारावर प्रभाव टिकवून आहेत. 'योग' हा दुर्बोध विषय असल्याने भिन्न भिन्न आचार्यांनी विविध प्रकारे त्याची मांडणी केली आहे. म्हणून त्या ग्रंथांची

उकल योगानुभूती असलेल्या व्यक्तीच्या साहाय्याशिवाय सर्वसाधारण व्यक्तीला होणे वा योग करणे सहज साध्य नाही. तरी सुद्धा समाजात योगाबद्दल ते सर्वश्रेष्ठ विज्ञान असून परम कल्याणाचा प्रशस्त मार्ग आहे अशी महान उच्च धारणा आहे.

वास्तविक योगशास्त्र हे सर्वश्रेष्ठ असूनही त्याचे वास्तविक गूढ रहस्य लोक जाणू शकत नाहीत. योग कसा करावा ? योगाचे फळ काय ? ते कसे प्राप्त होते? याची यथातथ्य जाणीव साधकांत दिसत नाही. ही अडचण दूर करण्यासाठी, महायोग प्रवर्तक, परम कारुणिक, पूज्यपाद श्रीमत् गुरुदेव १००८ श्री श्रीनारायणतीर्थ देव महाराज यांच्या संकल्पशक्तीने महायोगाचे वास्तवशास्त्र ग्रंथरूपाने प्रकाशित व्हावे आणि जिज्ञासूंचा फायदा व्हावा अशी प्रेरणा दिली. म्हणून केवळ त्यांच्या आज्ञेने आणि परमकृपेने या ग्रंथाची रचना झाली.

या ग्रंथलेखनापूर्वी महायोगसाधनेच्या साधकांना या शास्त्रमार्गासंबंधी आवश्यक तेवढीच माहिती दिली जात होती. या साधनप्रणाली संबंधी–स्वरूपासंबंधी विशेष–शास्त्रशुद्ध–माहिती एकत्र सुसंगत कुठेच उपलब्ध नव्हती. म्हणून साधक बंधूंचाही आग्रह झाला. या पार्श्वभूमीमुळे ग्रंथरचनेचा विचार निश्चित झाला. परंतु महायोगशास्त्रासंबंधीचा समग्र व क्रमवार विषयाचा एकही ग्रंथ पूर्वी लिहिला गेल्या नसल्याने हे कार्य तसे सोपे नव्हते. प्राचीन सर्व आर्ष ग्रंथांमध्ये महायोगाचे निहित तत्त्व – गुप्त रहस्य – सांकेतिक स्वरूपात आढळते. त्यामुळे प्राचीन ग्रंथ सामान्य वाचकांना अचूक आकलन होत नाहीत. फार काय योगानुभव नसलेल्या उत्तम संस्कृततज्ज्ञ विद्वानांनाही योगरहस्य आकलन होणे सोपे नाही.

तरी सुद्धा श्रीगुरुदेवांची आज्ञा आणि साधकांची इच्छा यामुळेच यथामति हे कार्य हाती घेतले. प्रथम वेद – उपनिषदे – षड्दर्शने – तंत्र आणि पुराण या साहित्य संभारातून योगासंबंधीची माहिती काढली. त्याची क्रमबद्ध रचना केली आणि मग ती ग्रंथबद्ध केली. यामुळे प्रत्येक जिज्ञासूला महायोग शास्त्राची सहज – सरल माहिती मिळू शकेल.

या ग्रंथात जी प्रमाणे दिली आहेत – श्लोक – सूत्रे दिली आहेत – ती सर्व वेद – उपनिषदे – षड्दर्शने – मंत्रशास्त्र – तंत्रशास्त्र – इतिहास पुराणादि आर्ष ग्रंथांमधीलच आहेत. त्यात कोणतेही परिवर्तन केले नाही. परंतु विषयाच्या सुसंगतीसाठी पूर्ण श्लोकच्या श्लोक मागे पुढे जोडून घेतले आहेत. सर्व श्लोक उपरोक्त शास्त्र ग्रंथातूनच घेतले आहेत आणि तसा उल्लेखही श्लोकारंभीच केलेला आहे.

या ग्रंथात श्लोकांच्या शब्दार्थांपेक्षा विशेषतः भावार्थाकडे अधिक लक्ष देण्याचा प्रयत्न केला आहे. हा दृष्टीकोन संस्कृत तज्ज्ञ सज्जनांना कदाचित रुचणार नाही. परंतु विषयाचे रहस्य उलगडून दाखविण्याच्या व स्पष्ट करण्याच्या सत् उद्देशाने प्रेरित होऊन श्लोकांतून विषयाची वास्तविकता स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

सूज्ञ वाचकवृंद यातून अल्प स्वल्प जरी लाभ घेऊ शकले तरी ती ईश्वरकृपा आहे हे समजून लेखकाच्या परिश्रमाचे सार्थक होईल. इति ओम् ।

**योगेन्द्र विज्ञानी**
**(मूळ ग्रंथ लेखक)**

❖ ❖

प. पू. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज हे गुरुदेव श्री गुळवणी महाराज यांचे पहिले गुरू. हे स्वामी श्री दत्त उपासना आणि श्रीदत्तसाधनपरंपरा पुनः संस्थापना करणारे श्रीदत्तावतारच होते. श्रीदत्तसंप्रदाय हा गुरुपरंपरेचा संप्रदाय आहे. सर्व समन्वय साधणारा हा संप्रदाय असल्याने सर्व उपासना – साधना मार्गामध्ये श्रीदत्तदेवतेला गुरुस्थानी वंदिलेले आहे. ज्ञान – भक्ती – कर्म – योग – मंत्र तंत्र – या सर्व उपासना पद्धती श्रीदत्तउपासनेत प्रकर्षाने आढळतात. सर्व देव देवता श्रीदत्तात्रेयांना "गुरुदेव" मानीत. श्री वसिष्ठ – काश्यप – अत्रि आदि प्राचीनतम सर्व द्रष्टे ऋषिमुनी श्रीदत्तानुग्रही होते. मच्छिंद्र, गोरक्षनाथांचा नाथ, संप्रदायही दत्तभक्त आहे, कारण स्वतः गोरखनाथ श्रीदत्तानुग्रही आहेत. महानुभावी पंथाची उपास्य देवता श्रीदत्त आहे. श्री जमदग्नी आणि श्री रेणुका यांच्यावर श्रीदत्तात्रेयांची परम कृपा होती म्हणून श्रीपरशुरामांचे उपास्यही श्रीदत्तात्रेयच होते. अशा प्राचीनतम गुरुपरंपरेचे दर्शन अखंडपणे दत्त उपासनेतून स्पष्टपणे व्यक्त होत आलेले दिसते. सर्व देव देवता विविध शक्तिपुंजकेंद्रे आहेत. त्या सर्वही शक्तिपूंजकेंद्रांचे नियोजन व कार्य गुरुप्रणीत मार्गानेच होत असते. म्हणजे विश्वातील सर्व शक्तिकेंद्रांवर, दृश्यअदृश्य, लौकिक – पारलौकिक शक्तिकेंद्रांवर गुरुशक्तीचे नियोजन आहे. ही गुरुशक्ती आपण अनुकूल करून घेतली नाही तर विविध शक्तींचे अनुभव येणार नाहीत वा आले तर विपरीतही येतील. महायोग साधना गुरुपरंपरेने प्राप्त होणारी असल्याने साधक हा साधनेच्या म्हणजे गुरूच्या अंकित असतो. येथे अंतिम ध्येयमंदिरापर्यंत साधक गुरुकृपेने साधनेद्वारा निश्चित जातो

असे स्पष्ट सांगितले आहे आणि ही स्थिती अनुभवलेले सर्व महात्मे 'गुरू आणि शक्ती जागृती' याचेच महत्त्व सांगतात.

प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी श्रीदत्तप्रभूंचे चरित्र-विविध ग्रंथांद्वारे - वेदान्त तत्त्वज्ञान साधन सिद्धांतांच्या प्रशस्त भूमिकेवरून ज्ञान - कर्म - भक्ती - उपासना आणि योग या सर्व शास्त्रांचा परामर्श स्पष्ट करीत वर्णिले आहे. ते स्वतः ज्ञान - कर्म - भक्ती उपासना यामध्ये पूर्णत्वास पोहोचलेले होते- तसेच ते योगामध्येही निष्णात होते. त्यांनी द्विसाहस्री, दत्तपुराण, दत्तमाहात्म्य आदि ग्रंथांतून योगाच्या सर्व प्रक्रियांचे मार्मिक वर्णन केलेले आहे. द्विसाहस्री ग्रंथामध्ये शक्तिपात योगशास्त्राचा उल्लेख करताना लिहितात -

**शिष्योपि गुरवे सर्वं शशंस स तु तत्क्षणम् ।**
**प्रीतः सुखाकरकरं दधौ तन्मूर्न्धि सद्गुरुः ।। अ. १/५७**
**तेन सद्योभवच्छिष्यो वेदवेदांग पारगः ।**
**कुशलः स्मर्तृतापघ्नो जीवन्मुक्तोखिल प्रियः ।। १/५८**

या श्लोकावर टीका लिहिताना श्रीस्वामीमहाराज लिहितात

''शशंस कथयामास स गुरुस्तु सुखस्याकरं रविनं यद्यपि

'ज्ञप्तेस्तु कारणं राम शिष्य प्रज्ञैव केवलम्' इति वासिष्ठोक्तेस्तथापि

'परिपक्वमला ये तानुत्सादन हेतु शक्तिपातेन । योजयति परेतत्त्व' इत्युक्तेर्गुरु प्रसादोपि ज्ञप्तेः कारणमभ्युपगंतव्य अतो वदति तेनेति । तेन शक्तिपातेन सद्यस्तत्क्षणं शाब्दपर ब्रह्मवेदत्ताभूदित्यर्थः ।''

श्रीगुरूंनी शक्तिपात योगसाधनेचा अनुग्रह करताक्षणी श्रीरामचंद्रासारखे अधिकारसंपन्न शिष्य शाब्देपरेच निष्णात होतात. ब्रह्मवेत्ते होतात, हा श्रीसद्गुरूंचा आणि शक्तिपात साधनेचा महिमा सांगितला आहे. तेव्हा श्रीसद्गुरू गुळवणी महाराजांना त्यांच्या या प्रथम गुरूकडून हा लाभ घडला यात शंका नाही. परंतु ही विद्या दुसऱ्या व्यक्तीमध्ये संक्रमित करण्याचा शास्त्रनिहित मार्ग प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराजांकडून मिळण्याची ईश्वरी योजना होती म्हणून पुढे हा समसमा योग घडून आला आहे.

अशा या प्रशस्त, वेदांतप्रणीत, शास्त्रशुद्ध, श्रीगुरुपरंपरेने चालत आलेल्या महायोगशास्त्राचा - शक्तिपात योग साधनेचा - मार्ग लाभलेल्या भाग्यवंतांना या

विषयावरील प्रमाण ग्रंथ सुबोध शब्दांतून प्राप्त होत आहे. हा ग्रंथ मार्गदर्शनासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

शक्तिपातयोग साधन संप्रदायातील सर्व साधकांसाठी ''महायोग विज्ञान'' हा हिंदी भाषेतील विस्तृत अपूर्व ग्रंथ आहे. याचे लेखक शक्तिपात पीठाधीश्वर प. श्री योगानंद ब्रह्मचारी - वर्तमाननाम योगेन्द्र विज्ञानी, हृषिकेश हे आहेत. इ. स. १९३८ मध्ये त्यांनी हा ग्रंथ लिहिला आहे.

पू. श्री. योगेन्द्र विज्ञानी हे इ. स. १९१३ मध्ये गरुडेश्वरला प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचे दर्शनास व भेटीस येऊन गेलेले होते. पुढे ते बंगालमध्ये मदारीपूर येथे प. प. श्रीनारायणदेव तीर्थस्वामी महाराजांचेकडे गेले. तेथे त्यांना त्यांचेकडून शक्तिपातयोगाची दीक्षा झाली. उत्तम साधनसंपन्न स्थितीमुळे त्यांना भरपूर अनुभव आले होते. त्यांनी या साधनामार्गावर अभ्यासपूर्ण तात्त्विक सिद्धांतांच्या प्रमाणांसह विस्तृत माहितीचा ग्रंथ लिहून या साधन संप्रदायातील सर्व साधकांना ऋणी करून ठेवले आहे. यांचे पट्टशिष्य प. प. श्रीविष्णुतीर्थजी स्वामीमहाराज, देवास यांनीही आपल्या गुरुंच्या लेखनकार्याची परंपरा विस्तृत लेखन करून समृद्ध केली आहे. पू. श्री. योगेन्द्र विज्ञानी महाराज आणि प. प. श्री. विष्णुतीर्थजी स्वामी महाराज ब्रह्मलीन झाले आहेत. सध्या प. प. श्रीशिवोम् तीर्थस्वामी महाराज हे देवास - ऋषिकेशच्या शक्तिपात पीठाचे उत्तराधिकारी असून त्यांनीही - शक्तिपातयोग साधनेवर विपुल लेखन केले आहे. सध्या त्यांचे प्रचारकार्य विस्तृत प्रमाणात - पद्धतशीरपणे चालू आहे. हे सर्व वाङ्मय हिंदीमध्ये आहे. या तुलनेने मराठीमध्ये या साधनमार्गाचे लेखन फारच अल्पस्वल्प आहे असे म्हणावे लागेल.

प. पू. श्रीसद्गुरू योगीराज गुळवणीमहाराज यांचा या शक्तिपात- साधन संप्रदायाशी संबंध इ. स. १९२२ मध्ये, होशंगाबाद येथे प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांच्या अपूर्व भेटीने आला. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांचे गुरू प. प. श्रीशंकर पुरुषोत्तमतीर्थ स्वामीमहाराज यांना मदारीपूर येथे प. प. श्री. नारायणदेवतीर्थ स्वामी महाराजांचेकडून शक्तिपातयोगविद्येची दीक्षा प्राप्त झाली. पुढे त्यांनी काशीक्षेत्री छोटी गैबीत आश्रम स्थापन केला. प. प. श्रीशंकरपुरुषोत्तमतीर्थ स्वामी महाराजांनी या साधनमार्गावर 'योगवाणी' नावाचा छोटा पण अत्यंत उपयुक्त ग्रंथ बंगाली भाषेत लिहिला. त्याचेच पुढे हिंदी भाषांतर झाले. श्रीसद्गुरू गुळवणीमहाराज यांची व प. प. श्रीशंकरपुरुषोत्तम तीर्थ स्वामीमहाराज यांची भेट झाली होती. त्यांचा योगवाणी ग्रंथ महाराजांनी दीक्षा घेणाऱ्या प्रत्येक साधकाला दीक्षेपूर्वी विकत घेऊन वाचून

मगच दीक्षा देण्याचा क्रम ठेवला होता. मराठी वाचकांना हिंदी समजत असले तरी भावग्राही अर्थाकलन होणे कठीण होते हे लक्षात घेऊन स्वतः श्रीगुळवणीमहाराजांनी योगवाणीचे मराठी भाषांतर करून ठेवले होते. त्या मराठी योगवाणी भाषांतराच्या प्रकाशनाचा योग ७-८ वर्षांपूर्वी आला.

श्रीगुरुमहाराजांची आणि पू. श्रीयोगेन्द्र विज्ञानी यांचीही भेट झाली होती. उभयतांमध्ये भरपूर पत्रव्यवहार झालेला होता. त्यांचा 'महायोग विज्ञान' हा ग्रंथ गुरुमहाराजांनी अनेक भक्तांना वाचण्यास सांगितला होता. या ग्रंथाचेही भाषांतर गुरुमहाराजांनी प्रवासामध्ये सोयीसवडीने करून ठेवले होते. ते श्रीवासुदेव निवासाच्या संग्रही होते. ते प्रकाशित करण्याचा योग आज सुमारे ५० वर्षांनी येत आहे.

श्रीगुरुमहाराजांनी महायोग विज्ञान या ग्रंथातील 'सप्तम प्रकाश' या प्रकरणापासून पुढील 'त्रयोदश प्रकाश' या प्रकरणाअखेर मराठी अनुवाद करून ठेवलेला उपलब्ध झाला आहे. यातील पहिल्या सहा प्रकरणांचा आणि शेवटचा पाच प्रकरणांचा अनुवाद श्रीगुरुमहाराजांनी केलेला नसावा असा अंदाज आहे. या प्रकरणांचा त्यांनी केलेला अनुवाद उपलब्ध नाही. परंतु ज्या प्रकरणांचा अनुवाद उपलब्ध आहे, तो मात्र शक्तिपात - महायोग साधनमार्गाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा व उपयुक्त असा आहे. तूर्त हाताशी असलेला अनुवाद वाचकांना देणे शक्य आहे. यातही नवमप्रकाशाचा अनुवाद नाही.

वाचकांना या ग्रंथाची पहिली प्रकरणे कोणती आहेत यासंबंधी जिज्ञासा राहणे स्वाभाविक आहे. परंतु ती जिज्ञासापूर्ती वाचकांची करणे या प्रास्ताविकाने होणे असंभव आहे. स्थूलपणे एवढे सांगता येईल - तात्त्विक - विविध संप्रदाय - योगमार्ग आदि विविध विषय प्रारंभी आहेत. शेवटची प्रकरणे अष्टांगयोग - सिद्धी - प्राण - मंत्र - तंत्र आदि विषयांवरची आहेत. या प्रकरणांचा अनुवादही होणे उपयुक्त ठरणारे आहे. पण हा विषय श्रीसद्गुरू इच्छेप्रमाणे होणारा आहे. म्हणून त्याचा संकल्प करता येत नाही.

हा एक अपूर्व ग्रंथ वाचताना सर्वांना परम आनंद होणार आहे. आणि मिळालेल्या साधनेचे अंतरंग स्वरूप आणि अनन्यसाधारण महत्त्व लक्षात येऊन साधनेची तीव्र ओढही लागणार आहे.

अशा सर्वांगांनी परमकृपा करणाऱ्या श्रीगुरुदेवांचे चरणी अनंत साष्टांग प्रणिपात.

**अ. सि. पोटभरे**

# अंतरंग


- साधन माहात्म्य दिग्दर्शन ........................ पाच
- ग्रंथासंबंधी निवेदन ........................ नऊ
- सप्तम प्रकाश ........................ १७
- अष्टम प्रकाश ........................ ३३
- दशम प्रकाश ........................ ५१
- एकादश प्रकाश ........................ ६५
- द्वादश प्रकाश ........................ ८३
- त्रयोदश प्रकाश ........................ ९७

॥ श्रीगुरुःशरणम् ॥

श्री वैष्णवेशगाणेशसौर्यशाक्त्यादिरूपधृक् ।
दत्तात्रेयोऽस्त्वजोऽनन्तः सदा मे हृदि सद्गुरुः ॥

# ✦ सप्तम प्रकाश ✦

**योगसाधनाने प्राप्त होणारे ज्ञान दोन प्रकारचे आहे. योग व ज्ञान. याचा अर्थ विज्ञान (अनुभवजन्य ज्ञान) असा आहे.**

ज्ञानं विज्ञान संसिद्धाः परं श्रेष्ठं विदुर्मम ।
ज्ञानी प्रियतमोऽतो ज्ञानेनासौ बिभर्ति माम् ॥
तस्माऽज्ज्ञानेन सहितं ज्ञात्त्वा स्वात्मानमुद्धव ।
ज्ञान विज्ञान संपन्नो भज मां भक्ति भावतः ॥
ज्ञान विज्ञान यज्ञेन मामिष्टवात्मानमात्मनि ।
सर्व यज्ञपतिं मां वै संसिद्धिं मुनयोऽगमन् ॥

**एकादश स्कन्ध, अध्याय १९ –**

ज्ञान आणि विज्ञान यांच्या योगाने कृतार्थ झालेले सिद्धपुरुष माझ्या श्रेष्ठ परमपदाला जाणतात. याकरिता ज्ञानी महात्मे मला अत्यंत प्रिय आहेत. कारण ते ज्ञानद्वारा निरंतर माझ्या ठिकाणी संलग्न असतात. म्हणून हे उद्धवा ! तू ज्ञानसहित आपल्या आत्मस्वरूपाला जाणून ज्ञानविज्ञान संपन्न होऊन माझे भजन कर. कारण ज्ञान विज्ञानरूप यज्ञद्वारानेच मुनींनी यज्ञपती जो मी त्या मला आपल्या ठिकाणीच आत्मरूपाने प्राप्त करून घेतले आहे.

ज्ञान विज्ञान संयुक्त आत्मभूतः शरीरिणाम् ।
आत्मानुभव तुष्टात्मा नान्तरायैर्विहन्यसे ॥
तपस्तीर्थजपोदानं पवित्राणि तराणी च ।
नालं कुर्वन्ति तां सिद्धिं या ज्ञान कलयाकृता ॥

याप्रमाणे ज्ञान आणि विज्ञानाने युक्त झाल्यावर तू सर्व देहधारी प्राण्यांचा आत्मरूप होशील आणि आत्मानुभवानेच संतुष्ट झाल्याकारणाने कोणत्याही विघ्नांनी बाधित होणार नाहीस. कारण तत्त्वज्ञानाच्या एका अंशमात्राने ही जी सिद्धी होते, ती जप, तप, दान, तीर्थ, व्रत इत्यादी कोणत्याही पवित्र कर्माने प्राप्त होत नाही. म्हणून या ज्ञानप्राप्तीकरिता तुला योगसाधन केले पाहिजे.

योगेन रहितं ज्ञानं च मोक्षाय भवेद्विधे ।
ज्ञानेनैव विना योगो न सिध्यति कदाचन् ।।
तस्माज्ज्ञानश्च योगं च मुमुक्षुर्दृढमभ्यसेत् ।
जन्मान्तरैश्च बहुर्भिर्योगो ज्ञानेन लभ्यते ।।
ज्ञानं तु जन्मनैकेन योगादेव प्रजायते ।
तस्माद्योगात्परतरो नास्ति मार्गस्तु मोक्षदः ।।

**योगशिखोपनिषद्, अध्याय १**

योगसाधनाने प्राप्त होणारे ज्ञान तेच आत्मज्ञान म्हटले जाते व त्याच्याच योगाने तुम्ही आनंदरूप व्हाल. जन्ममृत्युपासून सोडविणारे ज्ञान, सामान्य आणि विशेष, असे दोन प्रकारचे आहे. साधारणतः शास्त्रावरून तुम्ही माझ्या ज्ञानाचा जो निश्चय करता त्याला शास्त्रसिद्ध परोक्ष ज्ञान म्हणतात. आणि तपश्चर्या, योगसाधन करून तुम्हाला जो प्रत्यक्ष अनुभव येतो त्याला साधनसिद्ध अपरोक्ष विज्ञान म्हणतात. या विशेष ज्ञानाकरिताच तुम्हाला योग-साधन करावे लागेल. कारण योगरहित ज्ञान मोक्षदायक होत नाही. आणि ज्ञानाशिवाय योगसिद्धी होत नाही. ज्ञानाचा अर्थ जाणणे असा आहे व योगाचा अर्थ मिळणे असा आहे. म्हणून जोपर्यंत जाणणार नाही तोपर्यंत मिळू शकणार नाही आणि जोपर्यंत योगाने मिळू शकणार नाही तोपर्यंत जाणूही शकणार नाही. याकरिता तुम्ही योगसाधन व ज्ञानसाधन यांना वेगळे करू शकत नाही. ज्याप्रमाणे योगहीन ज्ञान मोक्ष देऊ शकत नाही त्याचप्रमाणे योगही ज्ञानाशिवाय मोक्ष देण्याला समर्थ नाही. म्हणून तुम्ही योग व ज्ञान यापैकी एकाचा जरी आश्रय सोडलात तर माझी प्राप्ती होणार नाही. माझ्याशी तादात्म्य पावण्याची इच्छा करणाऱ्या तुम्हाला ज्ञान व योग या दोन्हींचेही अनुष्ठान केले पाहिजे.

प्रविचार्य चिरं ज्ञानं मुक्तोऽहमिति मन्यते ।
किमसौ मननादेव मुक्तो भवति तत्क्षणात् ।।
पश्चाज्जन्मान्तरशतैर्योगादेव विमुच्यते ।
न तथा भवतो योगाज्जन्ममृत्युः पुनः पुनः ।।
प्राणापानसमायोगाच्चन्द्रसूर्यैकता भवेत् ।
सप्त धातुमयं देहमग्निना रञ्जयेद् ध्रुवम् ।।

केवळ ज्ञानाचाच अभ्यास करण्याने अनेक जन्मानंतर योगाची प्राप्ती होते. परंतु योगाने एकाच जन्मात ज्ञान होऊ शकते. म्हणून योगावाचून मोक्ष देणारा दुसरा कोणताही मार्ग नाही. जर दीर्घकाळपर्यंत ज्ञानाचा विचार करून मी मुक्त आहे असे

कोणी मानू लागेल तर योगसाधन न करता तो मुक्त होईल का ? म्हणून आरंभीच सांगितले आहे की योगाशिवाय ज्ञान कदापि होत नाही. म्हणून मनानेच मी मुक्त आहे असे मानणारा ज्ञानी कित्येक शेकडो जन्मानी योगानेच मुक्त होईल. योगसाधन न करता केवळ शास्त्र पढून अथवा आपल्या मनाने मी मुक्त आहे असे मानल्याने जन्ममृत्युपासून सुटका होणार नाही. परंतु योगसाधनाने याच जन्मात ज्ञान होईल, कारण योगाने वारंवार जन्ममृत्यू प्राप्त होणार नाही.

प्राणापानाची समता म्हणजे प्राणायामाने सूर्यचंद्राची एकता करणे, यालाच योगसाधना म्हणतात. म्हणून प्राणायामाने कुंडलिनी शक्तीला जागृत करून तिच्या साहाय्याने ब्रह्माग्नि प्रज्वलित करून मन, प्राण व शरीरसामर्थ्य संपन्न करून प्रकृतीवर प्रभुत्व प्रस्थापित केल्याने निर्विकल्प समाधिद्वारा जीवब्रह्माची एकतारूप योग साध्य होतो.

योगात् संजायते ज्ञानं ज्ञानाद्योगः प्रवर्तते ।
योगज्ञानपरो नित्यं स योगी न प्रणश्यति ।।
योगेन योगो ज्ञातव्यो योगो योगात्प्रवर्धते ।
योऽप्रमत्तस्तु योगेन सयोगी रमते चिरम् ।।

**त्रिशिख ब्राह्मणोपनिषद् तथा सौ. ल. उ.**

योगानेच ज्ञान उत्पन्न होते व ज्ञानानेच योग प्राप्त होतो म्हणून तुम्ही नित्य योगाचा व ज्ञानाचा अभ्यास कराल तर कधीही नाश पावणार नाही. योगसाधनानेच योगाचे ज्ञान करून घेतले पाहिजे. योगाभ्यासानेच योग होतो म्हणून उत्साहपूर्वक योगाभ्यास करीत रहाल तर चिरकालपर्यंत योगात रममाण व्हाल.

## प्राणायामाने असाध्य काहीही नाही कुंडलिनीशक्ती जागृत होईल

या उद्देशाच्या सिद्धीकरिता ज्या वेळी तुम्ही दैवावरील विश्वास सोडून आपल्या प्रयत्नांचा व ईश्वरी कृपेचा आश्रय करून प्राणापानाचे हवन – प्राणायाम – करीत राहाल त्या वेळी जगात अशी कोणतीही वस्तू नाही की जी तुम्हाला प्राप्त होणार नाही. केवळ दृढ संकल्पवान होण्याचीच आवश्यकता आहे. ज्या वेळी प्राण – अपानांचे हवन – प्राणायाम – करण्यासाठी बसाल त्या वेळी प्रथम पद्मासन घालून बसा. सद्गुरूला प्रणाम करून मंगलमय महेश्वराची, प्राणायामरूपी यज्ञात विघ्न न येण्याबद्दल प्रार्थना करा. दुर्भाग्यवशात विघ्न आलेच

तर प्रणवदेवतेचे पूजन, जप करीत राहिले पाहिजे. त्याच्याच बरोबर महामाया आद्यशक्ती कुंडलिनीदेवीचे ध्यान करावे, कारण तिच्याच कृपेने सिद्धी प्राप्त करून घेतात. ती निद्रित शक्ती तुमच्या प्राणअपानरूपी हवनाने जागृत होईल आणि अनादि कालापासून घेत असलेल्या निद्रेचा त्याग करून महेश्वराशी मिळण्याकरिता धावू लागेल. त्या वेळी तुम्ही हवन करण्याचे विसरून जाल. आणि शिवशक्तीच्या मेलनाच्या व्यग्रतेत रडू लागाल, हसू लागाल, नाचू लागाल, त्या वेळी आपण प्राणायाम करीत आहोत याचे तुम्हाला भानही रहाणार नाही. तुम्ही भयभीत झाल्याप्रमाणे दिसाल. तुम्हाला हसणे, नाचणे, उड्या मारणेच उत्तम वाटू लागेल आणि मधून मधून तुम्ही मूर्च्छितही व्हाल.

त्या अवस्थेत सारे ब्रह्मांड तुम्हाला आपल्या ठिकाणी चित्रविचित्र रूपाने दिसू लागेल. तुम्हाला अंतराकाशात दिव्य महाज्योतीचा प्रकाश प्रतीत होईल. ही अवस्था प्राणअपानरूपी हवनात – प्राणायामात प्रायः होईल. जसजसे तुम्ही प्राणाचे अपानात व अपानाचे प्राणात हवन करीत रहाल, तसतसे नाना प्रकारची दृश्ये तुमच्या दृष्टीसमोर दिसू लागतील. या तुमच्या मानसिक सृष्टीच्या विचित्रतेचे वर्णन कोणालाही करता येणार नाही.

## गुरुप्रदत्त शक्तीच्या प्रभावाने आश्चर्यजनक अनुभव येऊ लागतील

मनसा मन आलोक्य योगनिष्ठः सदाभवेत् ।<br>
मनसा मन आलोक्य दृश्यन्ते प्रत्यया दश ॥<br>
यदा प्रत्यया दृश्यन्ते तदा योगीश्वरो भवेत् ॥<br>
बिंदु नाद कला ज्योती रवीन्दु ध्रुवतारकम् ।<br>
शातं च तदतीतं च परं ब्रह्म तदुच्यते ॥

**योगशिखोपनिषद् अध्याय ६**

कुंडलिनीशक्तिच्या क्रियेच्या योगाने, मनाने मनाला पाहणे हेच योगसाधन करणे होय. योगसाधनाने मनाला मनाने पाहण्याने त्या साधनात उन्नती होत असल्याची व ब्रह्माची अभिव्यक्तिकारक दहा प्रकारची चिन्हे प्रत्ययाला येऊ लागतात, हे प्रत्यय येऊ लागले म्हणजे समजावे की योगसिद्धी लवकर होणार आहे. नाद, बिंदु, कला, ज्योती, सूर्य, चंद्र, ध्रुवतारा इत्यादी अंतराकाशात दिसतात व शांत होतात. त्या वेळी मन शांत भावाला प्राप्त होते. त्या वेळी मनात कोणतीही क्रिया होत

नाही. त्यानंतर शांतातीत अवस्था येते. शांतातीत स्थिती हेच मन वाणीला अगोचर स्वानुभवगम्य परब्रह्म आहे.

हसत्युल्लसति प्रीत्या क्रीडते मोदते तदा ।
तनोति जीवनं बुद्ध्या विभेति सर्वतोभयात् ।।
रोध्यते बुध्यते शोके मुह्यते न च संपदा ।
कम्पते शत्रुकार्येषु कामेन रमते हसन् ।।
स्मृत्वा कामरतं चित्तं विजानीयात्कलेवरे ।
यत्र देशे वसेद्वायुच्चित्तं तद् वसति ध्रुवम् ।।

असे दिव्य अनुभव होऊ लागल्याने योगी आनंदोल्लासाने प्रफुल्ल होऊन हसतो, प्रसन्न होतो, प्रेमाने क्रीडा करतो व महासुखी होतो. असा आत्मसुखाचा अनुभव घेतल्याने योगी विषयापासून विमुख होतो, संसाराचे भय मानून अलिप्त राहतो, शोकांत बुद्धिमत्तेने राहतो, तसेच, संपत्ती प्राप्त झाली असता मोहित होत नाही. कोणाशी शत्रुता उत्पन्न झाली असता त्याला कंप उत्पन्न होतो. कामजनित विकाराने शरीरावर होणाऱ्या परिणामाला जाणतो म्हणून सर्व प्रकारच्या वासनापासून मनाला रोकून धरतो, शरीराच्या ज्या भागात प्राणवायू राहतो त्याच भागात चित्तही निश्चयपूर्वक राहते.

या सर्व गोष्टी गुरुप्रदत्त शक्तीच्या प्रभावाने अथवा प्राणायामाने तुमच्या सर्व पापांचा नाश झाल्याने होतील. प्रत्यक्ष दिसणाऱ्या माझ्या सृष्टीचा सूक्ष्म अंश तुमच्या आत सामावला आहे. कुंडलिनी शक्ती क्रियाशील झाल्याने तुम्ही त्याला सर्वदा पाहू शकाल. ही सर्व शुभलक्षणे तुम्हाला संतोष व श्रद्धा उत्पन्न करण्याकरिता ब्रह्माची अभिव्यक्ती करीत राहतील. जोपर्यंत शिवशक्तींचे संमेलन होणार नाही तोपर्यंत या अलौकिक आश्चर्यकारक दृश्यांचा अंतःकरणात अनुभव करीत रहाल. परंतु ज्या वेळी तुमचे हवन पूर्णाहुतीला पोहोचेल त्या वेळी तुम्ही निर्विकल्प समाधीला प्राप्त व्हाल आणि बाहेरचे वास्तविक जगत् तुम्हाला स्वप्नाप्रमाणे भासू लागेल.

हवनाच्या आरंभापासून पूर्णाहुतीपर्यंत ज्या ज्या गोष्टींचा तुम्हाला अनुभव येईल त्यांचे यथातथ्य वर्णन करणे मनुष्यबुद्धीच्या पलीकडचे आहे. परंतु तुम्ही मात्र अनुभव घेत रहाल. हे अनुभव प्राप्त करून देणारी अंतःशक्ती कुंडलिनी आहे. ज्या ज्या वेळी ती वर चढू लागेल त्या त्या वेळी तुम्हाला अत्यंत आश्चर्यकारक अनुभव येऊ लागतील. परंतु एवढ्या अनुभवानेच तुम्ही कृतार्थ होणार नाही. अद्यापि तुम्हाला पुढे जावयाचे आहे. ज्या वेळी ती शक्ती शिवामध्ये लीन होऊन स्थित होईल त्याच वेळी तुम्ही कृतकृत्य आणि कृतार्थ व्हाल.

## ✦ प्राणायामाला अवधी नाही ✦

जितका होईल तितका प्राणायाम करीतच राहिले पाहिजे. जोपर्यंत प्राणायाम करता करता आपोआप थांबणार नाही तोपर्यंत तो बंद करू नये. हे हवन किती दिवस करीत रहावयाचे याचा काही अवधी नाही. याविषयी निश्चयपूर्वक काही सांगता येणार नाही. करीत राहणे कर्तव्य आहे. साधारणतः लोक समजतात की कुंडलिनी जागृत झाल्यानेच काम होते, परंतु असे नाही. कुंडलिनी केवळ जागृत झाल्यानेच काम भागत नाही. ती जागृत होऊन क्रियाशील होण्याने काम होते. जसे एखाद्या मनुष्याला निद्रेतून जागे केले असता तो जागा होतो परंतु उठून उद्योगाला लागला नाही तर त्याला जसा काही उपयोग नाही तसेच कुंडलिनीशक्ती जागृत झाली परंतु कार्य करणार नाही तर काय उपयोग ?

कुंडलिनीशक्ती जागृत झाली असे जरी कळून आले तथापि प्राणायाम करीत राहिले पाहिजे. प्राणायामाच्या अग्नीने कुंडलिनी संतप्त होऊन सहस्रार चक्रात जाऊन मन व प्राण यांचे ऐक्य करून ती ज्या वेळी ब्रह्मात लय पावेल त्याच वेळी साधनाची सफलता झाली असे समजावे. प्राणायामाचे हवन जितके अधिक तितक्या लवकर आत्मशक्तीचा विकास होईल. म्हणून हे काम नियमितपणे श्रद्धा, भक्ती, उत्साह व साहसपूर्वक - जोपर्यंत आपोआप सुटणार नाही तोपर्यंत - करीत राहिले पाहिजे. कुंभकरूपी आहुतींचे हवन जितके अधिक होईल तितका अधिक आनंद होईल.

## ✦ गुरूच्या शक्तिसंचाराने महायोग स्वतः होईल ✦

ज्या वेळी कुंडलिनीशक्ती जागृत होऊन क्रियाशील होते त्या वेळी जी जी लक्षणे होतात ती शेकडो लोकांचे अनुभव प्रत्यक्ष पाहून लिहिली आहेत. म्हणून याविषयी शंका घेणे निरर्थक आहे. कारण योग प्रत्यक्ष फल देणारा आहे. योगयुक्त सामर्थ्यसंपन्न गुरूच्या शक्तिपाताने - शक्तिसंचाराने शक्तीचे उद्बोधन अथवा उद्घाटन होऊन ज्या वेळी कुंडलिनी जागृत होऊन क्रिया करू लागेल त्या वेळी पुढील लक्षणे प्रतीत होतील. गुरूच्या शक्तिसंचाराने महायोग स्वतः होईल.

आधारवातरोधने शरीरं कम्पते यदा ।
आधारवातरोधने योगी नृत्यति सर्वदा ।।
आधारवातरोधने विश्वं तत्रैव दृश्यते ।
सृष्टिराधारमाधारमाधारे सर्वं देवताः ।।

**योगशिखोपनिषद् - अध्याय ६**

प्राणायामाने अथवा शक्तिमान गुरूच्या अनुग्रहाने अंतःशक्ती जागृत होते त्या वेळी आत्मशक्तीच्या उद्‌बोधनाने प्राण क्षोभित होऊन आधार चक्रात रुद्ध होतो व त्यामुळे साधकाचे शरीर कापू लागते व योगी आनंदाने नाचू लागतो. आधार चक्रात वायूचा निरोध झाल्याने त्या ठिकाणी सारे विश्व दिसू लागते. कारण कुंडलिनीशक्ती मूलाधारात निवास करते व त्या ठिकाणी तिचे वास्तव्य असल्याने सृष्टीचा आधारही मूलाधारच आहे. आधारातच सर्व देवता निवास करतात.

आधारे सर्व वेदाश्च तस्मादाधारमाश्रयेत ।।
आधारे पश्चिमे भागे त्रिवेणीसंगमो भवेत् ।
तत्र स्नात्वा च पीत्वा च नरः पापात्प्रमुच्यते ।।
आधारे पश्चिमं लिङ्गं कवाटं तत्र विद्यते ।
तस्योद्‌घाटन मात्रेण मुच्चयते भवबन्धनात् ।।

म्हणून आधारातच सर्व वेदांचे ज्ञान निहित आहे. वाग्देवी, वेदमयी, ज्ञानशक्ती मूलाधारातच आहे. याकरिता आधाराचाच आश्रय केला पाहिजे. आधाराच्या पश्चिम भागात इडा - पिंगला - सुषुम्ना, त्रिवेणी गंगा - यमुना - सरस्वतींचा संगम होतो. त्या ठिकाणी मन-प्राण एकत्र करून बुडी मारल्याने दिव्य स्नान व दिव्य पान केल्याने मनुष्य सर्व पापापासून मुक्त होतो. आधाराच्या पश्चिमभागी स्वयंभू लिंग प्रतिष्ठित आहे. त्याच ठिकाणी सुषुम्नेत प्रवेश करण्याचा मार्ग - ब्रह्मद्वार आहे. ते उघडल्यानेच मनुष्य संसारबंधनापासून मुक्त होतो.

आधार चक्रमहसा पुण्यपापे निकृन्तयेत् ।
आधारवातरोधने लीयते गगनान्तरे ।।

मूलाधारात कंप होऊ लागला की शरीर कापू लागते. कुंभक करण्याचा म्हणजे श्वास रोखण्याचा प्रयत्न केला असताही तो न होणे, व श्वास-प्रश्वास जोरात होणे, इच्छा नसताही श्वास-प्रश्वास दीर्घ होऊ लागणे, शरीर सांभाळले न जाणे इत्यादी लक्षणे होऊ लागली म्हणजे समजावे की कुंडलिनीशक्ती जागृत झाली व कार्य करू लागली. त्या वेळी निर्भय होऊन चुपचाप बसून काय होत आहे इकडे पाहत राहिले पाहिजे. ज्या वेळी शरीर कापू लागेल, रोमांच येऊ लागतील, इच्छा नसताही हास्य अथवा रडू येऊ लागेल, मुखावाटे विकृत शब्द निघू लागतील, वीर्यपात होईल, भय उत्पन्न होईल, अथवा भीतिप्रद दृश्ये दिसू लागतील, अनिच्छेने मूत्र-स्राव होईल त्या वेळी समजावे की कुंडलिनी कार्यशील झाली.

ज्या वेळी आसन स्थिर होईल, उड्डीयान, जालंधर, मूलबंध स्वतः होऊ लागतील, जीभ उलटी होऊन टाळूत जाईल आणि आतून इतकी स्फूर्ती येईल की स्थिर बसता येणार नाही, हातपाय जबरदस्तीने खेचू लागतील – ही लक्षणे होऊ लागली म्हणजे समजावे की परमाशक्ती कुंडलिनी क्रियाशील झाली.

ज्या वेळी आसन दृढ होईल, दृष्टी भ्रूमध्यात राहून डोळ्याचे तारे फिरू लागतील आणि आपोआप केवल कुंभक होऊ लागेल, मन बाह्यज्ञानशून्य, निष्क्रिय होईल त्या वेळी समजावे की महामाया आद्यशक्ती कुंडलिनीदेवी क्रियाशील झाली.

ज्या वेळी मूलाधारातून प्राणकलेचा प्रवाह सहस्त्रारात जात आहे असे कळून येईल, अंतःकरणात प्रणव जप स्वतः होऊ लागेल आणि प्राणाच्या वर चढणाऱ्या प्रवाहाबरोबर स्वतः मनाला नाना प्रकारच्या सुखाचा अनुभव येऊ लागेल त्या वेळी जगदंबा कुंडलिनीशक्ती क्रियाशील झाली असे समजावे.

ज्या वेळी नाना प्रकारचे शब्द होऊ लागतील, मेरुदंडात कंप होऊ लागेल, शरीर शून्य होईल, अथवा शरीर नाहीच असे वाटेल, सर्व शून्य वाटू लागेल, डोळे उघडण्याचा प्रयत्न केला असताही न उघडणे, शरीरात विद्युतप्रवाह चालल्याप्रमाणे वाटणे, अथवा खिचावट होणे, इत्यादी लक्षणे होऊ लागतील त्या वेळी महामाया कुंडलिनीशक्ती क्रियाशील झाली असे समजावे.

ज्या वेळी डोळे मिटताच शरीर जमिनीवर पडेल, शरीर चक्की प्रमाणे फिरू लागेल, श्वासप्रश्वास बाहेर निघणार नाहीत, शरीर बेडकाप्रमाणे उड्या मारीत इकडे तिकडे पडेल, अथवा बसलेल्या जागेवर चक्कर खात फिरेल, किंवा मृतवत् जमिनीवर पडेल, हात पाय उचलता येणार नाही, जणू काय प्राण शरीरातून निघून जात आहे अशा प्रकारे नाड्यामधून ताण होऊ लागेल, शरीर माशाप्रमाणे तडफडू लागेल, त्या वेळी समजावे की योगमाया कुंडलिनीशक्ती कार्यशीला झाली.

ज्या वेळी मनात आवेश येईल व असे वाटेल की शरीरात कोणीतरी प्रवेश केला आहे, त्या आवेशात नाना प्रकारची आसने जबरदस्तीने होऊ लागतील, व कोणत्याही प्रकारचे कष्ट बिलकूल वाटणार नाहीत, उलट आनंदच वाटू लागेल, त्याचबरोबर विचित्र प्रकारचे प्राणायाम होऊ लागतील, त्या वेळी समजावे की ईश्वरीशक्ती कुंडलिनी देवी क्रियाशीला झाली.

ज्या वेळी डोळे बंद करून आसनावर बसताच संकल्प करण्याबरोबर शरीरात विविध हालचाली होऊ लागतील, हातपाय फेकले जाऊन जबरदस्तीने मुखावाटे विकृत शब्द निघू लागतील, पशुपक्षी अथवा बेडकादि प्राण्याप्रमाणे शब्द निघू

लागतील, किंवा कोल्हा-कुत्रा-मांजर-वाघ-सिंह इत्यादी प्राण्यांचे - ऐकण्याला कठोर, भयानक व उच्छृंखल शब्द मुखावाटे निघू लागतील त्या वेळी समजावे की रुद्राची महाशक्ती कुंडलिनी देवी क्रियाशीला झाली.

ज्या वेळी शरीराच्या निरनिराळ्या भागात प्राणाची गती समजू लागेल आणि मन ज्या ज्या ठिकाणी लागेल त्या त्या ठिकाणी प्राणाच्या क्रियेचाही अनुभव येऊ लागेल आणि स्नायु मंडलात विद्युत्शक्तिप्रमाणे सुखसाध्य क्रियांचा अनुभव येऊ लागेल त्या वेळी समजावे की कुंडलिनीशक्ती क्रियाशीला झाली.

ज्या वेळी अष्टौप्रहर आतून काहीतरी क्रिया चालल्याचा अनुभव येऊ लागेल, कोठेही मन एकाग्र होताच शरीर कापू लागेल अथवा इच्छा नसतानाही शरीर हालू लागेल, मलिन - शौचकूपासारख्या ठिकाणी बसले असताही मन आनंदमग्न क्रियात्मक राहील, निजतानाही प्राणाचा प्रवाह सहस्त्राराकडे जात असल्याचा भास होईल आणि स्वप्नातही मन क्रियात्मक राहील तर त्या वेळी समजावे की आल्हादिनी कुंडलिनीशक्ती क्रियाशीला झाली.

ज्या वेळी आसनावर बसताच शरीर ढवळू लागेल आणि आनंदाने गाणे सुरू होईल व त्यातील रागरागिणी अशा विचित्र असतील की ऐकणारे मुग्ध होऊन जातील व त्यातील पद्यरचना स्वतःच होऊ लागेल, हाताने तालबद्ध टाळी वाजत राहील, अनेक प्रकारच्या भाषेतील पद्ये अर्थज्ञानविरहित उच्चारण होऊ लागतील, त्यांची भाषा कोणाला समजली नाही तरी ऐकताना मनाला आनंद उत्पन्न होईल, त्या वेळी समजावे की सरस्वतीरूपी कुंडलिनीशक्ती क्रियाशीला झाली.

ज्या वेळी भांग न पिताच भांग प्याल्याप्रमाणे कैफ चढेल, चालताना हातपाय कापू लागतील व शरीर इकडे तिकडे झुकू लागेल, मनात एक प्रकारची मस्ती येईल आणि व्यावहारिक कोणतेही काम होणार नाही, ऐकणे किंवा सांगणे बरे वाटणार नाही, आणि मद्य प्यालेल्या मनुष्याप्रमाणे अंगात मस्ती येऊ लागेल त्या वेळी आत्मशक्ती कुंडलिनीदेवी क्रियाशीला झाली असे समजावे.

ज्या वेळी रस्त्याने चालताना मनात आवेश येईल आणि वाटेल की उडून जावे, जमिनीला पाय लागताच पळणे सुरू होईल, शरीर वायूप्रमाणे हलके होऊन उडत आहोत असे वाटेल, कितीही चालले तरी थकवा येणार नाही, मन प्रफुल्लित व प्रसन्न राहील, स्वप्नात देखील अप्रसन्नता येणार नाही, इष्ट वा अनिष्ट गोष्टीने मन विचलित होणार नाही, आणि साधकाला कोणतेही काम क्लिष्ट वाटणार नाही त्या वेळी ब्रह्मशक्ती कुंडलिनी क्रियाशीला झाली असे समजावे.

ज्या वेळी आसनावर डोळे बंद करून बसताच स्वप्नाप्रमाणे अवस्था होईल, देवतांचे दर्शन होऊ लागेल, दिव्य गंध, रूप, रस, शब्द आणि स्पर्श यांचा अनुभव येऊ लागेल, आणि देवतांकडून आदेश मिळू लागतील त्या वेळी समजावे की दैवीशक्ती कुंडलिनी क्रियाशीला झाली.

ज्या वेळी ध्यानाला बसले असता पुढे होणाऱ्या गोष्टींचे भान होऊ लागेल, वेदवेदांताचे गूढ रहस्य समजू लागेल, मनाचे सर्व संशय नाहीसे होतील, कोणत्याही शास्त्राचा थोडासा अभ्यास करताच त्याचे मर्म - भावार्थ बुद्धीला आकलन होऊ लागेल, व्याख्या करण्याची आश्चर्यकारक शक्ती प्राप्त होईल, ज्ञानप्राप्तीकरता ब्रह्मदेवाकडेसुद्धा याचना करण्याची इच्छा होणार नाही आणि आत्मनिष्ठा होईल तर त्या वेळी समजावे की सिद्धशक्ती कुंडलिनी क्रियाशीला झाली.

ज्या वेळी आसनावर बसताच भ्रूमध्यात दृष्टी स्थिर होईल, जिभेने खेचरी मुद्रा सिद्ध होईल (जीभ उलट होऊन पडजिभेमागील पोकळीत वर जाणे), प्राण प्रवाह अगदी बंद होईल, मन आनंद सागरात मग्न होऊन जाईल, शांभवी मुद्रा सिद्ध होईल, सविकल्पाचे सुख अनुभवाला येऊ लागेल त्या वेळी समजावे की योगशक्ती कुंडलिनीदेवी क्रियाशीला झाली.

ज्या वेळी साधनाला बसण्याबरोबर मन एकाग्र होईल, देवी देवता बरोबर बोलणे होऊ लागेल, त्यांच्याकडून रोगांचे औषध मिळेल, त्या वेळी समजावे की सिद्धी प्रदायिनी कुंडलिनीदेवी क्रियाशीला झाली.

ज्या वेळी आसनावर बसून क्रिया करण्याचा संकल्प करताच आपले सूक्ष्म शरीर समोर प्रत्यक्ष भासू लागेल, स्थूल शरीराचे अस्तित्व भासणार नाही, डोळे उघडले असताही सर्व शून्य भासेल व वेळेचे भान राहणार नाही त्या वेळी समजावे की चित्‌शक्ती कुंडलिनीदेवी क्रियाशीला झाली.

ज्या वेळी प्रातःकाळी अथवा सायंकाळी इच्छा नसताही क्रियेचा वेग होऊ लागेल, आणि त्या योगाने शरीर - मन - प्राण विवश होईल, त्या वेळी समजावे की महादेवी कुंडलिनी देवी उत्तम कार्य करू लागली.

## ✦ मनुष्यमात्र ज्ञानाचा अधिकारी आहे ✦

### कर्म - जाती - अवस्था यांचा तपश्चर्येत भेद नाही

याप्रमाणे कुंडलिनीशक्ती भिन्न भिन्न प्रकृतीच्या लोकांकडून वेगवेगळ्या प्रकाराने मन - प्राण आणि शरीराला अनुकूल असे योग - शास्त्रोक्त साधन, शिवशक्ती

संमेलनार्थ, समाधीकरता, नाना प्रकारच्या क्रियांच्याद्वारा करवून घेते. मनुष्यमात्र मग तो आस्तिक असो अथवा नास्तिक असो, पुरुष असो किंवा स्त्री असो, बाल, वृद्ध, रोगी, निरोगी, पापी, पुण्यवान, किंवा महामूर्ख जरी असला तथापि कुंडलिनीशक्ती जागृत झाल्याने उपरोक्त लक्षणे तात्काल अथवा क्रमाने होऊ लागतात. नंतर आपापल्या संस्काराप्रमाणे सिद्धी होते. परंतु आत्मशक्तीच्या जागृतीला देश-काल-कृत अंतराय येत नाही. कारण मनुष्यमात्र ईश्वरीय ज्ञानाचा अधिकारी आहे. कर्म, जाती, अवस्था अथवा आश्रम यांचा योगसाधन तपस्येत विचार करण्याचे कारण नाही. प्रज्वलित अग्नीत चंदन किंवा विष्ठा टाकली असता दोन्ही जळून लाल होतात व त्या वेळी चंदनाचा सुगंध व विष्ठेचा दुर्गंध रहात नाही. दोन्ही अग्नीरूप होऊन जातात. योगसाधनरूपी तपस्येत – ब्रह्माग्नीत – सर्व ब्रह्मरूप होऊन जाते. म्हणून योगसाधन तपस्या करून तुम्ही याचा अनुभव घेतला पाहिजे.

**कुंडलिनीशक्ती गुरुशिवायही जागृत होऊ शकते. गुरू मिळविण्याकरिता सुद्धा तपस्या करावी लागते.**

प्रायेण मनुजा लोके लोकतत्त्व विचक्षणाः ।
समुद्धरन्ति ह्यात्मानमात्मनैवाशुभाशयात् ।।
आत्मनो गुरुरात्मैव पुरुषस्य विशेषतः ।
यत्प्रत्यक्षानुमानाभ्यां श्रेयोऽसावनुविन्दते ।।

**एकादश स्कंध, अध्याय ७**

गुरूच्या अनुग्रहाने शक्ती जागृत झाल्याचे फळ वर सांगितले. परंतु असेही पाहण्यात येते की गुरूच्या अनुग्रहाशिवाय केवळ प्राणायामाच्या अभ्यासानेही कुंडलिनी जागृत झाल्याने पुष्कळशी शुभलक्षणे प्रगट होतात. कारण प्राणायामानेच कुंडलिनी जागृत होते. म्हणून आत्मशक्ती जागृत झाल्यावर सर्व काही आपोआप होईल यात काही संशय नाही.

संसार तत्त्वाची आलोचना करणारी मनुष्ये प्रायः आपल्या चित्ताच्या अशुभ प्रवृत्तीचा रोध करून आपला आपणच उद्धार करून घेतात. मनुष्य स्वतः विवेकवान असल्याने प्रत्यक्ष व अनुमान प्रमाणांच्या योगाने आपल्याला कल्याणप्रद असलेल्या मार्गाचा निर्णय करून घेऊ शकतो, व आपणच आपला गुरू होऊ शकतो. म्हणून जर योग्य गुरू मिळणार नाही तर चिंता करण्याचे कारण नाही. तपस्या करावी लागते. म्हणून तपस्यासाधन गुरूच्या साहाय्याने आत्मगुरूची प्राप्ती करून घेतली पाहिजे.

कारण तुमच्या दुरवस्थेमुळे उपयुक्त गुरू तुम्हाला सहजासहजी मिळणे शक्य नाही. गुरू मिळेल या विश्वासावर राहून तपश्चर्येचा काळ व्यर्थ दवडणे ठीक नाही. पुरुषार्थ करीत राहिले पाहिजे. केव्हाना केव्हा गुरू अवश्य मिळेलच. केव्हाही केलेला प्रयत्न वाया जात नाही. योग्य समय आल्यावर केलेल्या सर्व कर्मांचे फळ मिळते. गुरूचा उपदेश घेतल्याबरोबर तात्काळ तुम्ही मुक्त व्हाल असे नाही. तर त्यानंतरही तुम्हाला साधन – तपस्या करावी लागेल. म्हणून आत्मविश्वास ठेवा. सर्व मंगल होईल.

## ✦ योगाचे फळ प्रत्यक्ष आहे ✦

कुंडलिनीशक्ती जागृत होऊन स्वतः क्रिया करते. हा महायोग साधन करणाऱ्या साधकांचा अनुभव आहे. सांगितलेल्या सर्व लक्षणांचा अनुभव प्रायः सर्व साधकांना येतो. ज्यांचा अनुभव आला नाही त्यांचाही क्रमाक्रमाने अनुभव येईल. आवश्यकतेप्रमाणे आपापल्या संस्काराप्रमाणे सर्व काही होईल. यात किंचित देखील संशय घेण्याचे कारण नाही. महायोगाचे माहात्म्य अत्यंत भारी आहे. महामाया कुंडलिनी क्रिया करविते. प्रत्यक्षाला प्रमाणांची आवश्यकता नाही. परंतु दुर्भाग्यवशात कोणी साधक पूर्ण यज्ञ करण्यास समर्थ नसेल अथवा गुरूची प्रीती उत्तम प्रकारे संपादन करू शकला नाही तर वर सांगितलेल्या अनुभवात अपूर्णता राहणे शक्य आहे. तुम्ही गुरूचे पूर्ण कृपापात्र बनला पाहिजे. साधनयज्ञ विधीपूर्वक कराल तर सर्व काम ईश्वरकृपेने सिद्ध होईल. श्रद्धा, वीर्य, स्मृती, मेधा संपादन करा. सदा सर्वदा सत्याचे पालन करा. उत्साह, साहस व तत्त्वज्ञान यांच्या योगाने निश्चय करा. कारण पुढे तुम्हाला सिद्धावस्थेला पोहचावयाचे आहे. सर्वदा सावधान रहा. विघ्नांचे मोठे भय आहे.

## ✦ मनाचे दुष्ट संस्कार दगा देतील ✦

मनाचे दुष्ट संस्कार फार प्रबळ असतात. असे अत्यंत आश्चर्यकारक प्रत्यक्ष अनुभव येऊनही आत्मविश्वास नसल्याने पुष्कळसे साधक मनाने धोका दिल्यामुळे गुरुकृपेने साधन प्राप्त झाले असूनही तसेच राहतात. पुढे प्रगती होत नाही. कारण दुर्भाग्याने मनात पहिलेच दुष्ट संस्कार असतात. चित्तशुद्धीचे काहीही साधन केलेले नसते. अकस्मात आत्मशक्ती जागृत झाल्याने नुकतेच कोठे सुसंस्कार आरंभ होऊ लागलेले असतात. परंतु दुष्ट संस्कार नष्ट झालेले नसतात. ते साधनात बाधा उत्पन्न करतात. विकल्प उत्पन्न करतात. अशा वेळी प्राप्त साधन दृढतापूर्वक करीत राहिले पाहिजे. त्याच्या योगाने शुभसंस्कार प्रबळ होतील व कुसंस्कारांचा नाश होईल.

याकरिताच शास्त्रात अधिकारी होण्याची आवश्यकता सांगितली आहे. अधिकार प्राप्त झाल्याशिवाय अशी अत्यंत महत्वाची वस्तू अपात्र मनुष्य रक्षण करू शकत नाही. याकरिता सद्गुरूंचे स्मरण व ईश्वराच्या अनुग्रहाची (कृपेची) कामना धरावी. तुम्ही प्रयागात प्रायश्चित्त केले आहे. त्यामुळे कुंडलिनीशक्ती जागृत होऊन क्रियाशील झाली आहे. म्हणून तुम्हाला दिव्यलोकाचे द्वार खुले झाले आहे. परंतु इतक्यात तुम्ही त्या ठिकाणी पोहचू शकत नाही. प्रयागतीर्थाची अधिष्ठात्री देवता - वेणीमाधव - आत्मा त्याचे दर्शन करावयाचे आहे.

## ✦ कुंडलिनीशक्ती मन-प्राण व शरीर बळकट करते ✦

तुम्ही जे जे वाचलेले ऐकलेले आहे ते ते दृढ करण्याकरिता व तुमच्या ज्ञानात जी अपरिपक्वता आहे ती परिपक्व व पूर्ण करण्याकरिता कुंडलिनीशक्ती तुमच्याकडून या सर्व शारीरिक व मानसिक क्रिया करविते. त्याच्या योगाने तुमचे मन, प्राण व शरीर दृढ होतात. कच्च्या शरीराने व दुर्बल मनाने तुम्ही आत्मदर्शन करू शकणार नाही. म्हणून योगमाया कुंडलिनीशक्ती आत्मज्ञानाकरिता तुमच्याकडून आवश्यक साधन करून घेईलच व त्यामुळे तुम्ही याच जन्मात जीवन्मुक्त होऊ शकाल. जीवन्मुक्ती देणारा हा योग आहे. त्याच्या चार अवस्था आहेत.

# महायोगाच्या चार अवस्था

आरंभश्च घटश्चैव तथा परिचयोऽपिच ।
निष्पत्तिः सर्वयोगेषु स्यादवस्था चतुष्टयम् ।।

**वराहोपनिषद्, अध्याय ५**

आरंभावस्था, घटावस्था, परिचयावस्था आणि निष्पत्ती अवस्था अशा चार अवस्था चित्तवृत्ती निरोधरूपी सर्व योगात असतात.

**आरंभावस्था**

करणत्रयसंभूतं बाह्यं कर्म परित्यजन् ।
आन्तरं कर्म कुरुते यत्रारंभः स उच्यते ।।

करण त्रयापासून उत्पन्न झालेल्या बाह्य कर्माची कारणे तीन असतात. ज्ञाता - ज्ञेय आणि ज्ञान त्यांचा त्याग करून कुंडलिनी शक्तीच्या प्रेरणेने जे आंतरिक - मानसिक यौगिक कर्म होते त्याला आरंभ अवस्था असे नाव आहे. अर्थात कुंडलिनीशक्ती जागृत होऊन क्रिया करून लावण्याने योगाची आरंभावस्था सुरू होते. वास्तविक योग येथूनच आरंभ होतो.

आरंभावस्थेत योगमाया कुंडलिनीशक्ती प्रथम हठयोगाला आरंभ करते. त्यामुळे नाना प्रकारच्या शारीरिक क्रिया होऊ लागतात. त्यात निरनिराळ्या प्रकारची आसने, बंध, मुद्रा, प्राणायाम यांच्या योगाने नाडीशुद्धी होते. आसवांनी शरीराची स्थिरता, बंध व मुद्रांनी शरीराची दृढता, प्राणायामाने शरीराची लघुता, आणि नाडीशुद्धीद्वारा शरीराची साम्यता होते. हठयोगानेच शरीर परिपक्व होते. म्हणून शरीर स्वाधीन ठेवण्याचा उपयोग हठयोग हाच आहे. हठयोगाशिवाय ज्ञान प्राप्त करून घेणे सहज नाही.

**घटावस्था**

वायुः पश्चिमतो वेधं कुर्वन्नापूर्यसुस्थिरम् ।
यत्र तिष्ठति सा प्रोक्ता घटाख्या भूमिका बुधैः ।।

यानंतर दुसरी घटावस्था आहे. घटावस्थेत शरीर संपूर्णपणे शुद्ध व सत्त्वगुणयुक्त होते. विषयवासनेचा ऱ्हास होऊ सर्वकाळ ईश्वराचे स्मरण राहू लागते. हठयोग व लययोग सुगम होतात. साधक पवित्र व प्रसन्न राहतो. दिवसेंदिवस वैराग्य वाढत जाते. ईश्वराशी मिळण्याकरिता मन उत्साहित व विरहाने व्याकूळ होते. आरंभावस्था व घटावस्था दोनही मिळून राहतात. शरीर हे आरंभावस्थेत दृढ होते व घटावस्थेत मन दृढ होते. या दोन्ही अवस्थांनी शरीर व मन शुद्ध व स्वस्थ होतात. म्हणून कुंडलिनी शक्तीचा ब्रह्मरंध्रांत जाण्याचा मार्ग सुगम व सहज होतो. याच्या योगाने प्राणवायू पश्चिममार्ग सुषुम्नेत प्रवेश करवून त्या ठिकाणी रोधून धरण्याची पात्रता साधकाला प्राप्त होते. आणि त्यामुळे प्राणरोध होऊ लागून मनाला स्थिरता येऊ लागते. ज्ञानी लोकांनी या स्थिरता प्राप्तीच्या अवस्थेला घटावस्था म्हटले आहे. या नंतर साधकाला परिचयावस्थेची प्राप्ती होते.

**परिचयावस्था**

न सजीवो न निर्जीवः काये तिष्ठति निश्चलम् ।
यत्र वायुः स्थिरः खे स्यात्सेयं प्रचयभूमिका ।।

परिचयावस्थेत साधकाचा प्राण अंतराकाशात लीन होतो. हृदयाकाशात प्राणाला स्थिरत्व प्राप्त करवून, प्राणशक्ती कुंडलिनी देवी सहस्रार चक्रात शिवाशी संलग्न होते. त्यामुळे जोपर्यंत प्राणाचा रोध असतो तोपर्यंत साधकाची शारीरिक अवस्था निष्क्रिय व निर्जीव अशी असते. म्हणून तो मृतवत म्हटला जातो. कारण बाह्य लक्षणांवरून देह निर्जीव – मृतवत प्रतीत होतो परंतु आतून तो सजीव असतो.

परिचयावस्थेत प्राणाबरोबर आत्मशक्ती मिळून जाते म्हणून महायोगात परिचयावस्था अथवा सिद्धावस्था याचे महत्त्व अत्यंत समजले जाते. या अवस्थेला

प्राप्त झालेला साधक सिद्ध म्हटला जातो. त्याला अलौकिक सामर्थ्य प्राप्त होते. कुंडलिनीदेवीच्या कृपेने व गुरूच्या अनुग्रहाने परिचयावस्था प्राप्त झाल्यावर त्याच्या शरीरातील प्राण संकल्पमात्राने खेचला जाऊन मूलाधारात एकत्र होतो. ज्या वेळी प्राण एकत्र होण्याला आरंभ होतो त्या वेळी साधकाला अनिर्वचनीय सुखाचा अनुभव येऊ लागतो. शरीराच्या ज्या ज्या भागातून प्राण खेचला जातो तो तो भाग मृतवत निश्चेष्ट व निष्क्रिय होऊन जातो.

सर्व शरीरातील प्राण एकत्र होऊन अंगूष्ठमात्र अतिसूक्ष्म होऊन सुषुम्ना विवरात प्रवेश करून, मूलाधार – स्वाधिष्ठान – मणिपूर – अनाहत – विशुद्ध आणि आज्ञा चक्रातून सहस्रार चक्रात जातो, त्या वेळी जठराग्नी व मनही प्राणात मिळून जातात, व बिंदू (वीर्य) स्वस्थानात भस्म होऊन ओजरूप होतो. त्या वेळी साऱ्या ब्रह्मांडाला क्रियाशील करविणारा अथवा सर्वांचा जीवनरूप जो प्राण त्याचा परिचय झाल्याने योगी कृतार्थ होतो. त्या अवस्थेत त्याच्या बुद्धीत आत्मबोधाची छाया पडते. त्या ज्ञानाला ''ऋतंभरा प्रज्ञा'' असे म्हणतात. सत्य ज्ञानाच्या साक्षात्काराने साधक सिद्ध होतो. आणि प्रकृतीवर आपले प्रभुत्व स्थापन करतो. त्या वेळी त्याला सर्व शक्तीचे भांडार खुले होते. कुंडलिनीशक्ती सरळ होऊ सुषुम्ना नाडीतच आपले स्थान करते. त्या साधक योग्याला आत्मज्ञानाची सर्व साधने सहज व सरळ होतात.

त्याला इच्छा झाली तर तो आपले आत्मसामर्थ्य कोणालाही देऊ शकतो व बद्धजीवांचे सामर्थ्य खेचून घेऊ शकतो. आपल्या प्राणाचा दुसऱ्या प्राण्यात प्रवेश करू शकतो व दुसऱ्यांचे प्राण आकर्षक करू शकतो. प्रकृती त्याला अनुकूल झाल्याने त्याच्या इच्छेनुसार दुसऱ्याच्या शरीरातील कुंडलिनीशक्ती जागृत होऊन क्रिया करू लागते. दुसऱ्याच्या प्रारब्धाची अदलाबदल करणे हा त्याचा सहज खेळ होतो. भोगरूप प्रारब्धाचा, व्याधीचा एका शरीरातून दुसऱ्या शरीरात संकल्पभावाने सहज प्रवेश करू शकतो. तो आपल्या शुद्ध संकल्पाच्या योगाने जड पाषाणादिकांकडून दुसऱ्याचे रोग भोग करवून घेतो.

त्याचे मन, प्राण, आत्मतत्त्वात आकर्षित होऊन राहतात. हृदयग्रंथी खुली होते. सर्व संशय छिन्न होतात. कर्मपाश तुटून जातात. परमेश्वराच्या कृपेने तो कृतार्थ होतो व पुष्कळांना कृतार्थ करतो. व्यावहारिक दृष्टीने तो कितीही दुराचारी असला तरी त्याचे ज्ञान आवरणाने अभ्राच्छादित होत नाहीत. निंदा करणारे त्याचे पाप घेऊन जातात. स्तुती करणारे त्याचे पुण्य घेऊन जातात. ब्रह्मलोकाचा मार्ग त्याने पाहिलेला असतो. ज्या वेळी या लोकातून तो प्रस्थान करील त्या वेळी तो सरळ

ब्रह्म लोकाला जाऊन पोहचेल. परिचयावस्थेला प्राप्त झालेला पुरुषच तुम्हाला माझी (परमात्म्याची) प्राप्ती करून देईल. कारण त्याने माझा परिचय करून घेतलेला आहे. म्हणून त्याच्या इच्छेला येईल त्याला तो माझी प्राप्ती करून देऊ शकतो.

**निष्पत्ती अवस्था**

यत्रात्मना सृष्टिलयौ जीवन्मुक्तिदशागतः
सहजः कुरुते योगं सेयं निष्पत्ति भूमिका ।।

ज्या अवस्थेत महासिद्धी आत्मज्ञानाचा उदय होतो त्या दशेत स्वतः आत्माद्वारा सृष्टिलय साधित होतात. त्या वेळी सिद्धयोगी आपल्या जीवतत्त्वाचा त्याग करून शिवतत्त्वाचा लाभ करून घेतो. त्या वेळी कुंडलिनीशक्ती आपल्या आधाररूपी परमशिवात विलीन होते व त्या वेळी योग्याला जीवन्मुक्ती दशा प्राप्त होते. त्या वेळी सृष्टिसंहारकर्त्या परमशिवाच्या ठिकाणी संपूर्ण अभेदरूपाने एकट्याला प्राप्त झालेला तो जीवन्मुक्त योगी आपल्या आत्म्याच्याच ठिकाणी सृष्टी व लयाचा अनुभव घेतो आणि त्याच वेळी योगी कुंडलिनीशक्तीला परमशिवात विलीन करण्याला समर्थ होतो व कुंडलिनीशक्तीचा परमशिवाच्या ठिकाणी सहज योग करतो.

# ✦ अष्टम प्रकाश ✦

## संप्रदायात दीक्षेचा विधी

शिवादिगुरुपर्यन्तं पारम्पर्यक्रमेण यः ।
अवाप्ततत्त्वसंभारः स गुरुर्नाऽपरः प्रिये ।।

वेदान्त, योग, मंत्र, तंत्र, भक्ती, आदि जितके ज्ञानमार्गाचे संप्रदाय आहेत, त्या सर्वांना दीक्षा दिली जाते. शिष्याची बुद्धी अतींद्रिय विषयाला ग्रहण करण्याला योग्य व्हावी म्हणून गुरू शिष्याचे ठिकाणी आपल्या शक्तीचा संचार करतात. म्हणून या क्रियेला शक्तिपात असे म्हणतात. शक्तिपातासहित प्राप्त होणाऱ्या दीक्षेचे नाना प्रकार आहेत, परंतु शक्तिमान गुरूचे सामर्थ्य व शिष्याची योग्यता यावरून त्याचा परिचय होतो.

हा शक्तिपाताचा विधी महेश्वरापासून परंपरेने सदा चालत आलेला आहे. परंतु वर्तमानयुगात याचा प्रकाश अत्यंत कमी दृष्टिगोचर होत असल्याने तुम्हाला या विषयाचे ज्ञान नाही. परंतु विद्येचे बीज कधीहि नष्ट होत नाही. अध्यात्मज्ञानाची महता या शक्तिपातरूपी श्रीशंकराच्या प्रसादाने तत्काल दाखविली जाते. ज्याप्रमाणे स्पर्शमणी (परिस) लोखंडाचे सोने करतो त्याप्रमाणे गुरू मलिन संस्कारयुक्त शिष्याला शुद्ध बनवितात व त्या योगाने शिष्य आपले कल्याण करण्याला समर्थ होतो. ज्या शिष्यांना केवळ त्यांच्या स्वतःच्या कल्याणाकरिता दीक्षा दिली जाते त्यांच्याकडून दुसऱ्यांचा फायदा होऊ शकत नाही. स्पर्शमणी लोखंडाचे सोने करतो, परंतु त्या सोन्याला परिसाचा गुण प्राप्त होत नाही. परंतु गुरूंचे असे सामर्थ्य आहे की ते आपल्याप्रमाणे शिष्याला दिव्य स्पर्शमणी बनवितात. जे गुरुद्वारा स्पर्शमणी बनलेले असतात, तेच दुसऱ्याचे मंगल करू शकतात. जोपर्यंत गुरू शिष्याला गुरुपदावर बसवीत नाहीत तोपर्यंत कोणीही शिष्य गुरू होऊ शकत नाही.

योग्य शिष्याचा गुरुपणाचा अधिकार गुरुपरंपरेने चालत येत असतो. म्हणून गुरूने योग्य शिष्याला शक्तिसंचारपूर्वक दीक्षा देऊन, शिवतत्त्व, जीवतत्त्व, प्रकृतितत्त्व, आत्मतत्त्व, आणि गुरुतत्त्व पर्यंत म्हणजे मूलाधार शिवतत्त्वापासून स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध, आज्ञा आणि सहस्रारातील गुरुतत्त्वापर्यंत आपल्याप्रमाणे दिव्य स्पर्शमणी बनवावे म्हणजे त्या योगाने विद्येचे बीज नष्ट न होता विद्येची गुरुशिष्यपरंपरा अखंड चालू राहील.

हा बोधक्रम श्रीमहेश्वरापासून गुरुपरंपरेने सदा चालत आलेला आहे. म्हणून गुरूंनी ज्या शिष्यांना आपल्याप्रमाणे स्पर्शमणी बनविले असेल तेच शिष्य गुरुपदाला प्राप्त झालेले असल्याकारणाने तेच पूजन करायला योग्य होत, दुसरे तसे योग्य नाहीत. गुरूकडून आपल्याच कल्याणाची दीक्षा घेऊन सुवर्णतत्त्वाला प्राप्त झालेले शिष्य दुसऱ्याचे कल्याण करण्याचे सामर्थ्याने गुरू असत नाहीत. गुरुकृपेने जे स्पर्शमणी बनलेले असतात तेच तुमचा उद्धार करण्याला समर्थ असतात. म्हणून ज्याच्या त्याच्या चरणावर मस्तक ठेवण्याने तुमचे मंगल होणार नाही.

## दीक्षेचा अर्थ

अथ दीक्षां प्रवक्ष्यामि श्रुणुष्व कमलानने ।
अस्यविज्ञानमात्रेण देवत्वं लभते नरः ।।

**विश्वसार शारदा तिलक तथा रूद्रयामल तंत्र**

श्रीमहेश्वर भगवतीला दीक्षेविषयी सांगतात – हे कमलानने, ज्या दीक्षेच्या ज्ञानाने मनुष्याला देवत्वाची प्राप्ती होते त्या दीक्षेसंबंधी तुला सांगतो : ऐक –

दिव्य ज्ञानं यतो दद्यात् कुर्यात्पापक्षयं ततः ।
तस्मात् दीक्षेति सा प्रोक्ता सर्व तंत्रस्य सम्मता ।।
ददाति शिवतादात्म्यं क्षिणोति च मलत्रयम् ।
अतो दीक्षेति संप्रोक्ता दीक्षातंत्रार्थवेदिभिः ।।
दीयते परमं ज्ञानं क्षीयते पाप पद्धतिः ।
तेन दीक्षोच्यते मंत्रे स्वागमार्थबलाबलात् ।।

या दीक्षा शब्दात दी अधिक (+) क्षा अशी दोन अक्षरे आहेत. त्याचा अर्थ– ज्या क्रियेच्या योगाने दिव्यज्ञान प्राप्त होते व जी (ज्या क्रियेमुळे) सर्व पापाचा क्षय होतो म्हणून सर्व तंत्रांनी त्या क्रियेला दीक्षा असे म्हटले आहे. शंकराशी तादात्म्य रूपसमाधी प्राप्त करून देते आणि आणव, कर्मण, मायिक तिन्ही मलांचा नाश करते म्हणून दीक्षातंत्राच्या अर्थज्ञात्या मुनींनी या क्रियेला दीक्षा असे नाव दिले आहे. परम ज्ञानाला प्राप्त करून देणारी व पापशृंखलेचा नाश करणारी अशी जी क्रिया तिला मंत्रशास्त्रात व आगमशास्त्रात 'दीक्षा' असे म्हटले आहे.

दीयते ज्ञानमत्यर्थ क्षीयते पाशबन्धनम् ।
अतो दीक्षेति देवेशि कथिता तत्त्वचिन्तकैः ।।

मनसा कर्मणा वाचा यत्पापं समुपार्जितम् ।
तेषां विशेषा करणी परमज्ञानदायतः ।।
तस्मात् दीक्षेति लोकेऽस्मिन् गीयते शास्त्रवेदकैः ।
विज्ञानफलदा सैव द्वितीया लयकारिणी ।।
तृतीया मुक्तिदा चैव तस्माद्दीक्षेति धीयते ।।

**योगिनी तंत्र ३-६**

जी महान ब्रह्मज्ञानाला देते आणि पाश व कर्मबंधनाचा नाश करते म्हणून तत्त्वचिंतन करणाऱ्या ज्ञानी लोकांनी तिला दीक्षा म्हटले आहे. मन, वाणी व कर्माने जो पापसंचय झालेला असतो त्याचा समूळ नाश करणारी व परमज्ञान प्रदायिनी असल्याचे शास्त्रवेत्त्यांनी इला (हिला) दीक्षा म्हटले आहे. प्रथम प्रत्यक्ष विज्ञान फल देणारी, दुसरे द्वैतभाव व मनाचा लय करणारी व तिसरे मुक्ती देणारी असल्यामुळे इला (हिला) दीक्षा असे म्हटले आहे.

## दीक्षेचे प्रकार

स्पर्शाख्या देवी दृक्संज्ञा मानसाख्या महेश्वरी ।
क्रियायासादिरहिता देवि दीक्षा त्रिधा स्मृता ।।
शांभवी चैव शाक्ती च मांत्री चैव शिवागमे ।
दीक्षोपदिश्यते त्रेधा शिवेन परमात्मना ।।

श्री गुरूपासून प्राप्त होणारी दीक्षा तीन प्रकारची आहे. स्पर्शदीक्षा, दृक्दीक्षा आणि मानसदीक्षा. सामर्थ्यवान गुरूने शिष्याला शिवहस्ताने स्पर्श केला असता होणारी स्पर्श दीक्षा. गुरूच्या दिव्य दृष्टिपाताने होणारी दृक्दीक्षा. आणि सिद्धगुरूच्या मानसिक सत्यसंकल्पाने होणारी मानसदीक्षा होय. दीक्षेच्या योगाने कुंडलिनी शक्ती जागृत झाल्याने तिच्याकडून सर्व साधन आपोआप होते. म्हणून साधकाला आपल्याकडून काहीही करावे लागत नाही.

**कुलार्णव तंत्र तथा वायवीय संहिता (अध्याय १५)**

परमात्मा शंकरांनी शिवागमात शांभवी, शक्ती आणि मांत्री अशा तीन प्रकारच्या दीक्षांचा उपदेश केला आहे. अलीकडील काळातील सांप्रदायिकांनी आपल्या अयोग्यतेमुळे या दीक्षांना निराळेच स्वरूप दिले आहे. ज्यांना परंपरेने या दीक्षा प्राप्त झाल्या नाहीत ते दुसऱ्याला देऊ शकत नाही, व सांगूही शकत नाहीत. या कल्याणकारी दीक्षा शास्त्रांत नाना प्रकारच्या सांगितल्या आहेत.

## नामक्रियेच्या भेदामुळे दीक्षेचे भेद

विश्वसार शारदा तिलक तथा प्राणतोषणी तंत्र
चतुर्विधातु सा दीक्षा ब्रह्मणा भाषिता पुरा ।
क्रियावती कलावती वर्ण वेधमयी पुनः ।।
ताः क्रमेण च कथ्यन्ते सर्वसम्पत्प्रदाः शुभाः ।।

ब्रह्मदेवाने पूर्वी क्रियावती, कलावती, वर्णमयी आणि वेधमयी असे दीक्षेचे चार प्रकार सांगितले आहेत. सर्व संपत्तिप्रद व शुभरूप अशा त्या क्रमाने सांगितल्या जातात.

स्मार्ती मानसिकी योगी चाक्षुषी स्पार्शिकी तथा ।
वाचिकी मांत्रिकी होत्री शास्त्री चेत्यभिषेचिका ।।
चतुर्विधा सा सन्दिष्टा क्रियावत्यादि भेदतः ।
आणवी बहुधा दीक्षा शांभवी च तथा पुनः ।
एकैका वापि विद्वद्भिः पठ्यते शास्त्रकोविदैः ।।

स्मार्तिदीक्षा, मानसिकी दीक्षा, योग दीक्षा, चाक्षुषी दीक्षा, स्पार्शिका दीक्षा, वाचिकी दीक्षा, मांत्री दीक्षा, होत्री दीक्षा, शास्त्री दीक्षा आणि अभिषेचिका इत्यादी दीक्षा आहेत. प्रथमतः ब्रह्मदेवाने क्रियावती आदि भेदाने चार प्रकारच्या दीक्षा सांगितल्या आहेत. परंतु त्या क्रियावती, वर्णमयी, कलात्मा, वेधमयी, आणवी आणि शांभवी इत्यादी दीक्षा कित्येक प्रकारच्या आहेत. म्हणून शास्त्र जाणणाऱ्या विद्वान पुरुषांनी त्यांचे वेगवेगळाले असे कित्येक प्रकार सांगितले आहेत.

श्रीमहेश्वराच्या कथनानुसार स्पर्शाने, दृष्टीने आणि मानस अशा तीन प्रकाराने दीक्षा होते, म्हणून तीनच प्रकारची आहे. तसेच ब्रह्मदेवाच्या कथनानुसार मनाने, वाणीने, दृष्टीने आणि स्पर्शाने अशा चार प्रकारांनी दीक्षा होत असल्यामुळे, मानसिक, वाचिक, चाक्षुषी, आणि स्पार्शिकी असे चार प्रकार आहेत. परंतु नाना प्रकारची नावे अशाकरिता दिली आहेत की स्थान, समय, आणि अधिकारी भेदाने, उपास्य देवता, उपासकाची रुची, आणि उपासनेचे भिन्नभिन्न प्रकार यामुळे सर्वांच्या क्रिया सारख्या नसल्याने आणि कर्मविधी पृथक् असल्याने नावामध्ये भिन्नपणा होतो.

तुम्ही समजत असाल की ज्ञान ही देण्याची चीज नसून, हल्ली जसे वाचिक वेदांती लोक सांगतात तशी सांगण्याची गोष्ट आहे. परंतु तुम्ही हे समजले पाहिजे की ज्या ठिकाणी सांगण्याने काम होत नाही त्या ठिकाणी देण्याने अवश्य होईल. याचप्रमाणे दीक्षाविषयक ज्ञान सांगण्याने होत नसून देण्यानेच होते. परंतु ज्यांना

याची प्राप्ती नाही ते तुम्हाला काय देऊ शकतील? म्हणून तुम्ही निश्चयपूर्वक समजा की दीक्षा अथवा ज्ञान सांगण्याचा विषय नसून देण्याची चीज आहे. म्हणून सांगण्याने भागत नाही तर द्यावेच लागते. ज्यांनी हे घेतले आहे व दिले आहे तेच सांगू शकतात. ही सांगण्याची व ऐकण्याची गोष्ट नसून देण्याची व घेण्याची आहे.

या दीक्षा देश, काल व पात्रतेनुसार दिल्या जातात. वेदान्त मार्गात शांभवी दीक्षा, योगमार्गात योग व शाक्ती दीक्षा, तंत्र मार्गात वेध दीक्षा, मंत्र मार्गात मांत्री दीक्षा तशीच आणवी दीक्षा, आणि भक्तिमार्गात वैष्णवी दीक्षा दिली जाते. याप्रमाणे वेदान्त, योग, मंत्र, तंत्र, भक्ती इत्यादी जितके संप्रदाय आहेत त्या सर्वांमध्ये दीक्षेचा विधी परंपरेने चालत आलेला आहे. याकरिता संसारबंधनापासून मुक्त होण्याकरिता लोक आपआपल्या गुरूपासून दीक्षा घेतात. परंतु कालाच्या प्रभावाने अथवा आपल्या दुर्भाग्याने म्हणा, श्रीमहेश्वर व ब्रह्मदेवाने सांगितल्याप्रमाणे दीक्षेचे फळ-ज्ञान व परम शांती, - याचा अनुभव क्वचित कोणा भाग्यवानाला येत असेल.

## वेदान्त मार्गात शांभवी दीक्षा

दर्शनात् स्पर्शनात् शब्दात् कृपया शिष्यदेहके ।
जनयेद्यः समावेशं शांभवं स हि देशिकः ।।

**वायवीय संहिता - (अध्याय १५)**

सामर्थ्यसंपन्न गुरू आपल्या कृपाकटाक्षाने, स्पर्शाने अथवा वाक्याने शिष्याच्या ठिकाणी आपल्या ज्ञानाचा समावेश करतात. अशा शांभव शंभुपद प्राप्त करून देणाऱ्या शिवभावापन्न गुरूची कृपा झाल्यावर शिष्याला काही करण्यासवरण्याची गरज नाही.

गुरोरालोकमात्रेण भाषणात्स्पर्शनादपि ।
सद्यः सञ्जायते ज्ञानं सा दीक्षा शांभवीमता ।।
देशिकानुग्रहेणैव शिवता व्यक्तकारिणी ।
सेयन्तु शांभवी दीक्षा शिवादेशस्यकारिणी ।।
चरणद्वय संभूता शांभवी शीघ्रसिद्धिदा ।।

परम कृपालू गुरूच्या दृष्टिमात्राने, त्यांच्या वाक्याने अथवा सिद्ध गुरूच्या स्पर्शानेच दीक्षाद्वारा गुरूची शक्ती शिष्याच्या ठिकाणी संक्रमण पावते. त्याच वेळी शिष्याचे ठिकाणी दिव्य ज्ञान उत्पन्न होते. गुरूची महत् कृपा आणि शिष्याचे परम भाग्य यांच्या योगाने जी महान आत्मसाक्षात्काराची अवस्था येते तिला तत्त्ववेत्त्यांनी

शंभुपद प्राप्त करून देणारी शांभवी दीक्षा मानली आहे. श्रीगुरूंच्या अनुग्रहाचे माहात्म्य सर्वच शास्त्रे सांगतात. त्यांच्या कृपेने शिवरूपता समाधीचे स्वरूप व्यक्त होते. ते प्रसन्न होऊन आपल्या शिष्यावर अनुग्रह करतात व दीक्षा द्वारा त्याला कृतार्थ करतात. जिच्या योगाने कृतार्थता येते ती मंगलमयी शांभवी दीक्षा शिवादेशकारिणी आहे. शिवशक्तीच्या समायोग चरणद्वयापासून उत्पन्न झालेली शांभवी दीक्षा शीघ्र सिद्धी देणारी आहे.

## योगमार्गात योगदीक्षा व शाक्ती दीक्षा

योगोक्तक्रमतो योगी शिष्येदेहं प्रविश्यतु ।
गृहीत्वा तस्य चात्मानं स्वात्मानं योजनात्मिका ।।
योग दीक्षेति सा प्रोक्ता मलत्रय-विनाशिनी ।।

**प्राण तोषणी तंत्र द्वि. कांड**

आता योगसाधनाकरिता योगदीक्षा सांगतात. तिचे कार्य शक्तिमान गुरूच्या सामर्थ्यावर अवलंबून आहे. ''निर्माण चित्तान्यस्मिता मात्रात्'' या सूत्रावरून सूचित केले जाते की योगी लोक आपले एकरूप कायम ठेवून आवश्यकतेप्रमाणे आपल्या संकल्पाने भिन्न भिन्न चित्ते निर्माण करतात आणि निर्माण केलेल्या चित्ताकडून वेगवेगळ्या व्यक्तीत विचित्र प्रकारच्या क्रिया उत्पन्न करतात. योगसामर्थ्य व प्रभाव श्रीमहेश्वराच्या अनुग्रहाने स्पष्ट व प्रसिद्ध आहे. 'आदि विद्वान्निर्माणचित्तमधिष्ठाय कारुण्याद्भगवान्परमर्षिरासुरये जिज्ञासमानाय तन्त्रं प्रोवाच'। पातंजलदर्शन. व्यास भाष्यात पंचशिखाचार्यांच्या सांख्यतंत्रोक्त प्रथम सूत्रावरून असे समजून येते की आदि विद्वान परमऋषी भगवान कपिल मुनींनी आपल्या आसुरी मुनी नायक जिज्ञासू शिष्याला सांख्य तंत्राच्या ज्ञानाचा उपदेश निर्माणचित्तद्वारा केला होता.

ज्यांनी प्रकृतीवर प्रभुत्व स्थापित केले अशा योग्यांना विश्वात कोणतेच कार्य असाध्य व असंभवनीय नाही. ते आपल्या योगबलाने वाटेल त्याला वाटेल तसा करू शकतात. हेच योगामध्ये विशेषत्व आहे. म्हणून योगशास्त्राशिवाय बाकीच्या शास्त्रांच्या साधनाच्या ज्ञानाचा विषय अनुमान व आगम प्रमाणावर अवलंबून असतो. त्यांचे फल कालांतराने अथवा जन्मांतराने प्राप्त होणारे असते. परंतु योगशास्त्रोक्त साधनाच्या ज्ञानाचे फळ तत्काळ अथवा क्रमाने याच जन्मात व मोजक्या काळात मिळते. योगशास्त्र व योगसाधन याला प्रत्यक्ष दर्शन म्हटले आहे.

श्री महेश्वरांनी सांगितलेल्या योगक्रमानुसार योगी शिष्याच्या शरीरात प्रवेश करून त्याच्या आत्म्याचे व आपल्या आत्म्याचे ऐक्य करतात व त्या योगाने -

अर्थात शिष्याला आपले सामर्थ्य देऊन त्यांचे निर्विकल्पाशी ऐक्य करतात. गुरूच्या आत्मसामर्थ्याने शिष्यांचे ज्ञान व समाधी सिद्ध होते. आणि अणिमादि महाऐश्वर्याची प्राप्ती होते. अशा प्रकारची व तीन मलांचा नाश करणारी जी दीक्षा तिला योग दीक्षा म्हणतात.

शाक्ती ज्ञानवती दीक्षा शिष्यदेहे प्रविश्यतु ।
गुरुणा योग–मार्गेण क्रियते ज्ञानचक्षुषा ।।
सिद्ध्यैच शक्तिमालोक्य त्वया केवलया शिशोः ।
निरुपायं कृता दीक्षा शाक्तेयी परिकीर्त्तिता ।।
अभिसन्धिं विनाचार्य शिष्ययोरुभयोरपि ।
देशिकानुग्रहेणैव शिवता वक्तकारिणी ।।

**वायवीय संहिता, अ. १५ तथा रुद्रयामल तंत्र.**

योगमार्गाने शिष्याच्या शरीरात प्रवेश करून दिव्य दृष्टीने गुरुजी दीक्षा देतात ती ज्ञानवती शक्ती दीक्षा होय. शक्ती दीक्षेत शिष्य या दीक्षेला योग्य आहे किंवा नाही हे पाहून गुरूने ही दीक्षा दिली पाहिजे. कारण इतर दीक्षा आहेत त्या सर्वांमध्ये शिष्याला गुरूच्याजवळ जाणे आवश्यक असते. परंतु या शक्ती दीक्षेत त्याची आवश्यकता नसते. शक्ती दीक्षा गुरूच्या योगशक्तीने होत असल्याने दुसऱ्या कोणत्याही उपायाची गरज पडत नाही. शक्ती दीक्षेचे हे विशेषत्व आहे की ज्या ठिकाणी गुरुशिष्याचे एकत्र येणे शक्य नाही, अशा निरुपायावस्थेत शक्तीने ही दीक्षा होते. म्हणून हिला शक्ती दीक्षा म्हणतात. गुरूचे व शिष्याचे काही कारणामुळे एकत्र येणे शक्य नाही, शिष्य दूर देशात असून गुरू यथेष्ट संचार करणारा असेल, परंतु दीक्षा घेण्याची शिष्याची इच्छा आहे व गुरूचीही दीक्षा देण्याची इच्छा आहे. आणि एकत्र गाठ पडणे संभवनीय नसेल अशा प्रसंगी गुरू शिष्याच्या भेटीशिवायही गुरूच्या अनुग्रहाने शिवभावाला व्यक्त करणारी ज्ञानवती शक्ती दीक्षा होऊ शकते. श्रीमहेश्वर कृपेने योगात असे होणे स्वाभाविक आहे. म्हणून याविषयी शंका घेण्याचे कारण नाही. ज्या ठिकाणी या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव येतो त्या ठिकाणी अनुमानाची काय गरज आहे ? देश, काल व पात्र यांचा शुभसंयोग झाल्यावर योगशास्त्रात सर्व काही होऊ शकते.

शाक्ती शक्तिभवा दीक्षा शक्तिः श्रीपरकुण्डली ।
तस्याः प्राण विलोमेन प्रवेशः परशम्भवे ।।

श्रीमहेश्वर सांगतात की योगशक्तीने होणारी ही शक्ती दीक्षा आहे आणि शक्ती

पराकुंडलिनी देवी आहे. गुरू अनुग्रह करून दीक्षा देतात व त्यामुळे कुंडलिनी शक्ती जागृत झाल्याने सर्व शक्तीचे भांडार खुले होते.

शिष्याला आपल्यापासून काहीही करावे लागत नाही. स्वतः कुंडलिनी देवी सर्व क्रिया करवते व त्यामुळे शिष्याचा प्राणप्रवाह पश्चिम मार्गात सुषुम्नेत होऊ लागतो आणि कुंडलिनी शक्ती प्राणासह ब्रह्मनाडीत प्रवेश करून सहस्रार चक्रात परमशिवाशी संलग्न होते. त्या वेळी प्राणाचा ब्रह्मरंध्रात लय होतो. सुषुम्ना मार्गाने कुंडलिनी शक्तीचा परशिवात प्रवेश हीच शक्ती दीक्षा आहे. शक्ती शंभूत लीन झाल्यानंतर शिष्याला दुसऱ्या कोणत्याही उपायाची गरज नाही. त्याच वेळी गुरूचा गुरूपणा व शिष्याचा शिष्यपणा याचे सार्थक होते. शिष्य गुरूच्या जवळ असो अथवा दूर असो परंतु शिष्याला गुरूच्या शक्तीचा आदेश, ज्ञान सर्वदा अथवा आवश्यकतेनुसार मिळत राहते. शिष्याला ज्ञानाचा बोध करून देणारी अशी ही गुरूच्या सामर्थ्याने होणारी ज्ञानवती शाक्ती दीक्षा आहे.

## मंत्र मार्गातील मांत्री व आणवी दीक्षा

मंत्र मार्गानुसारेण साक्षात् कृतेष्टदेवताम् ।
गुरुश्चोद्बोध्येच्छिष्यं मंत्रदीक्षेति सोच्यते ।।
स्वयं मंत्रतनुर्भूत्वा संक्रमं मंत्रमादरात् ।
दद्यात् मंत्रोद्भवादीक्षा तच्छक्तिः स्वात्मसम्भवा ।
मंत्र यंत्रार्चनादुक्तक्रियाभिर्भोगमोक्षदा ।।

**प्रयोग सार तथा रुद्रयामल तंत्र**

गुरू मंत्रमार्गानुसार आपल्या इष्ट देवतेचा साक्षात्कार करून त्याचा शिष्याला उपदेश करणे याला मंत्रदीक्षा म्हणतात. गुरूने स्वतः मंत्रमूर्ती होऊन प्रेमपूर्वक शिष्याचे ठिकाणी मंत्रशक्तीचे असे संक्रमण करावे की त्याच्या योगाने शिष्याचा मंत्र चैतन्यमुक्त (चैतन्ययुक्त) होईल व मंत्रप्रतिपाद्य शक्तिकुंडलिनी जागृत होईल. आणि शिष्यालाही आपल्या उपास्य देवतेची सिद्धी होईल आणि शिष्याला दिली जाणारी व विशेषेकरून मलाचा नाश करणारी जी दीक्षा तिला मांत्री दीक्षा म्हणतात. ही मांत्री दीक्षा मंत्राच्या योगाने होते व हिची शक्ती गुरूच्या आत्मबलाने प्रकाशित होते. त्या वेळी शिष्याची गात्रे कंप पावू लागतात. इष्ट देवतेच्या आवेशाने शिष्य व्याप्त होतो. त्याचे मन, प्राण व शरीर यांना विकृती येते आणि भावसमाधी होते. ही मांत्री दीक्षा मंत्र, यंत्र, गुरुपूजन, अर्चादि क्रियेच्या योगाने नेली जाते व तिचे फळ प्रवृत्तिपरायण असणाऱ्यांना भोग व निवृत्तिपरायण असणाऱ्यांना मोक्ष प्राप्त होणे हे आहे. म्हणून मांत्री दीक्षा भोग व मोक्ष दोन्ही देणारी आहे.

## आणवी दीक्षा

मंत्रार्चनासनन्यासध्यानोपचारकादिभिः ।
दीक्षा सा आणवी प्रोक्ता यथाशास्त्रोक्तरूपिणी ।।
शिवशक्तिसमायोगज्जन्मान्तरकृतात् शुभात् ।
शिवपूजानुसन्धानात् कर्मसाम्यं यदा भवेत् ।।
शिव एव तदा साक्षादाणव्यादीक्षया भवेत् ।
सर्वेषामेव दीक्षाणां मुक्तिः फलमखण्डितम् ।।

मंत्रशास्त्रात सांगितल्याप्रमाणे मंत्र, अर्चन, आसन, न्यास, ध्यान, उपचार आदि विधिपूर्वक दिली जाणारी दीक्षा आणवी दीक्षा होय. शिवशक्तीच्या समायोगाने पूर्वजन्मीच्या प्रबळ पुण्यप्रतापाने अथवा शिवपूजनाच्या अनुसंधानाने ज्या वेळी साधकाचे कर्म साम्यतेला प्राप्त होते त्या वेळी साधक आणवी दीक्षेच्या योगाने शिवरूप होऊन जातो. म्हणून निष्काम परमार्थ बुद्धी ठेऊन शास्त्रविधीप्रमाणे सामर्थ्यसंपन्न गुरूकडून त्यांची प्रसन्नता संपादन करून ज्या ज्या दीक्षा घेतल्या जातात त्या सर्वांचे फळ अंती अखंड मुक्ती प्राप्त होणे हे होय.

## तंत्र मार्गातील वेध दीक्षा

ततो वेधमयीं वक्ष्ये दीक्षां संसारमोचिनीम् ।
ध्यायेच्छिष्यतनोर्मध्ये मूलाधारे चतुर्दले ।
त्रिकोणमध्ये विमले तेजस्त्रयविजृम्भिते ।
वलत्रयसंयुक्तां तडित्कोटिसमप्रभाम् ।।
शिवशक्तिमयीं देवीं चेतनामात्रविग्रहाम् ।
सूक्ष्मां सूक्ष्मतरां शक्तिं भित्त्वा षट्चक्रमञ्जसा ।।
गच्छन्ति मध्यमार्गेण दिव्यां परशिवावधि ।
सहैवमात्मनः शक्तिं वेधयेत्परमेश्वरे ।।

**शारदातिलक तंत्र पंचम पटल**

संसारबंधनाचा नाश करणारी वेधमयी दीक्षा सांगतात. गुरूने शिष्याच्या शरीरातील चतुर्दल मूलाधार कमलात तीन प्रकारच्या रंगयुक्त विमल तेजत्रयाने देदीप्यमान त्रिकोण योनिस्थानाच्या मध्यात निवास करणारी त्रिवलयाकार कोट्यावधी विद्युत् पुंजाप्रमाणे महाप्रकाशयुक्त शिवशक्तिमयी कुंडलिनी देवीचे ध्यान करून जिचे चेतनामात्र दिव्य शरीर आहे व जी अत्यंत सूक्ष्माहूनही सूक्ष्म शक्ती आहे, तिच्या

मध्यमार्गांत–सुषुम्नेत प्रवेश करवून व षट्चक्रांचा वेध करून त्या दिव्य शक्तीला परम शिवात लीन करावे. याप्रमाणे गुरूने आपली आत्मशक्ती संचार करून शिष्याला परमेश्वराच्या स्वरूपाचा बोध करून त्याला त्यात स्थित करावे.

गुरूपदिष्ट मार्गेण वेधं कुर्याद्विचक्षणः ।
पापमुक्तः क्षणाच्छिष्यश्छिन्नपाशस्तथा भवेत् ।।
बाह्यव्यापार निर्मुक्तो भूमौ पतति तत्क्षणात् ।
सञ्जादिव्यभावोऽऽसौ सर्वं जानाति शाम्भवी ।
यदस्ति वेधकं तत्तत्स्वयमेवानुभूयते ।।

**कुलार्णव तंत्र चतुर्दश उल्लास**

श्रीमहेश्वरापासून चालत आलेल्या गुरुपरंपरेच्या मार्गानुसार ज्या वेळी ज्ञानी पुरुष वेध दीक्षा देतात त्या वेळी गुरूच्या शक्तिपाताने शिष्य पापरहित होऊन पापमुक्त होतो आणि तो बाह्य व्यापारशून्य होऊन भूमीवर पडतो. व दिव्यभावाला प्राप्त झालेला असतो. तो सर्व जाणतो. याप्रमाणे दीक्षेत गुरूचा जो भाव असतो त्याचा शिष्याला स्वतः अनुभव येतो.

प्रबुद्धः सहसा शिष्यस्तत्सौख्यं बहुधेश्वरि ।
वेधविद्धः शिवः साक्षान्न पुनर्जन्मतां व्रजेत ।।

एषा तीव्रतरा दीक्षा भवबन्धविमोचिनी ।
शिवभावप्रदा देवि त्वां शपे कुलनायिके ।।

म्हणून तत्काल शिष्याला बोध होतो व त्यामुळे महासुखाचा अनुभव येतो. अशा सुखकर वेधदीक्षेला प्राप्त करून घेणारा साक्षात शिवरूप होतो. त्याचा पुनर्जन्म होत नाही. श्रीमहेश्वर शपथपूर्वक सांगतात की अशी तीव्रतर वेधदीक्षा भवबंधाचा नाश करणारी व कल्याणप्रद शिवभावाला प्राप्त करून देणारी आहे.

आनन्दश्चैव कम्पश्चोद्भवो घूर्णा कुलेश्वरि ।
निद्रा मूर्च्छा च वेधस्य षडवस्थाः प्रकीर्तितः ।।
दृश्यन्ते षडगुणा ह्येते वेधेन कुलेश्वरि ।
वेधितो यत्र कुत्रापि तिष्ठेन्मुक्तो न संशयः ।।
वेधदीक्षाकरो लोके सद्गुरुर्दुर्लभः प्रिये ।
शिष्योऽपि दुर्लभस्तादृक् पुण्ययोगेन लभ्यते ।।
न दद्यादस्य कस्यापि इत्याज्ञा परमेश्वरि ।।

गुरूच्या अनुग्रहाने वेधदीक्षा होते. त्या वेळी आनंद, कंप, उद्भव, घूर्णा (डोलणे), निद्रा व मूर्च्छा अशा सहा अवस्था शिष्याच्या ठिकाणी उत्पन्न होतात. असा अनुभव येऊ लागला म्हणजे समजावे की वेधदीक्षा झाली. वेधदीक्षा प्राप्त झालेला शिष्य कोठेही राहिला तरी निःसंदेह मुक्त होतो. अशी कल्याणकारक वेधदीक्षा देणारा सद्गुरू ह्या लोकी दुर्लभ आहे व असा अधिकारी शिष्यही दुर्लभ आहे. पुण्ययोगानेच असा शिष्यही प्राप्त होतो. म्हणून ज्याला त्याला ही वेधदीक्षा देऊ नये अशी श्रीमहेश्वराची आज्ञा आहे.

शक्तिपातानुसारेण शिष्योऽनुग्रहमर्हति ।
यत्र शक्तिर्न पतति तत्र सिद्धिर्न जायते ।।

शक्तिपातानुसार शिष्याला अनुग्रह प्राप्त होतो. ज्या ठिकाणी शक्तिपात होत नाही त्या ठिकाणी सिद्धी होत नाही. म्हणून सामर्थ्यहीन गुरूकडून शिष्याचे मंगल होऊ शकत नाही. शांभवी दीक्षा, योगदीक्षा आणि वेधदीक्षा यात शक्तिपात केला जातो. फलस्वरूप आत्मज्ञानाचा अभ्युदय होतो म्हणून शिष्य लक्ष्यार्थ बोध करण्याला समर्थ होतो. वेदान्त शास्त्रात आणि तंत्र शास्त्रात सांगितलेल्या दीक्षेचा विषय शक्तिपात, याचे कार्य अत्यंत आश्चर्यजनक प्रभावशाली व प्रत्यक्ष फल देणारे आहे.

## वसिष्ठ मुनींचे गुरुत्व आणि शक्तिपाताचे लक्षण

हे वशिष्ठ महाभाग ब्रह्मपुत्र महानसि ।
गुरुत्वं शक्ति-पातेन तत्क्षणादेव दर्शितम् ।।

**योगवाशिष्ठ**

श्री शंभूच्या या महाप्रसादाचा परिचय महाज्ञानी वसिष्ठ मुनींनी भगवान श्रीरामचंद्राला करविला होता. श्रीरामचंद्र यांना संसारात जेव्हा वैराग्य उत्पन्न झाले त्या वेळी त्यांनी खाणेपिणे, वस्त्रप्रावरणे वगैरे सर्व राजवैभवाचा त्याग केला होता व त्यांचे शरीर अत्यंत कृश झाले होते. त्या वेळी ऋषीमुनी एकत्र येऊन त्यांनी श्रीरामचंद्रांना उपदेश करण्यास सुरुवात केली. त्या वेळीच वसिष्ठांनी आपल्या सामर्थ्याने श्रीरामचंद्रांची निर्विकल्प समाधी लावून दिली. त्या वेळी विश्वामित्र म्हणतात, हे महाभाग, आपण ब्रह्मदेवाचे ज्येष्ठपुत्र असून श्रीरामचंद्रांना शक्तिपात करून तत्काळ आपण आपल्या गुरुत्वाचा अनुभव आणून दिलेला आहे. नंतर त्याचाच फलस्वरूप बृहत् योगवसिष्ठ नावाचा वेदान्ताचा ग्रंथ झाला.

अधर्मधर्मयोः साम्ये जाते शक्तिः पतत्यसौ ।
ज्ञानात्मिका पराशक्तिः शंभोर्यास्मिन्निपातिता ।।

ज्या वेळी गुरूच्या अनुग्रहाने अथवा तुझ्या प्रबळ पुण्यप्रभावाने धर्माधर्मस्वरूप संस्कार साम्यतेला प्राप्त होतात, त्या वेळी श्रीशंभूपासून आलेल्या ज्ञानात्मिकापराशक्तीचा गुरुद्वारा तुमच्या ठिकाणी पात होतो. त्या वेळी ही लक्षणे होतात -

देहपातस्थः कम्पः परमानन्दहर्षणे ।
स्वेदो रोमाञ्च इत्येतच्छक्तिपातस्य लक्षणम् ।।
शिष्यस्य देहे विप्रेन्द्राः धरण्यां पतिते सति ।
प्रसादः शाङ्करस्तस्य द्विजाः सञ्जात एव हि ।।
यस्य प्रसादः सञ्जातो देहपातावसानकः ।
कृतार्थ एव विप्रेन्द्रा न स भूयोऽभिजायते ।।

शक्तिपात होताच शरीर भूमीवर पडते, कंप होऊ लागतो, मन अत्यंत प्रसन्न होते आणि परम आनंद होतो. त्यामुळे रोमांच येतात. अंगाला घाम येतो. अशा प्रकारची शक्तिपाताची देहपातादि लक्षणे प्रकट झाली असता समजावे की मंगलमय महेश्वराची कृपा झाली. ज्या वेळी गुरूंच्या शक्तिसंचाराने देहपातादि शुभलक्षणे होऊ लागतील त्या वेळी आपण कृतार्थ झालो असे समजावे. पुनः तो जन्माला येत नाही.

तस्य प्रसादयुक्तस्य विद्यावेदान्तवाक्यजा ।
दहत्यविद्यामखिलां तमः सूर्योदये यथा ।।
शक्तिपातविहीनोऽपि सत्यवाग्गुरुभक्तिमान् ।
आचार्याच्छ्रूतवेदान्तः क्रमान्मुच्येत बन्धनात् ।।
शक्तिपातेन संयुक्ता विद्या वेदान्तवाक्यजा ।
यदा यस्य तदा तस्य विमुक्तिर्नात्र संशयः ।।

ज्या सूर्योदयाने अंधकाराचा नाश होतो तसा श्री शंकर प्रसाद प्राप्त झालेल्या शिष्याच्या वेदान्त वाक्यजनित (विद्या जनित) ब्रह्मज्ञानाने समस्त अविद्यारूपी अंधकाराचा नाश होतो. जो शिष्य शंभुप्रसादरूपी शक्तिपातरहित तो सत्यवादी गुरू भक्तिमान शिष्य आचार्यापासून वेदान्त वाक्याने क्रमाने मुक्त होतो. परंतु शक्तिपातपूर्वक प्राप्त झालेली वेदान्त वाक्यापासून उत्पन्न झालेली विद्या ज्या क्षणाला प्राप्त होते त्याचक्षणी तो शिष्य निःसंदेह मुक्त होतो. म्हणून वेदान्तात सांगितलेल्या साधनांनी याच जन्मात जीवन्मुक्ती प्राप्त करून घेण्याला श्रीमहेश्वराचा प्रसाद गुरुकृपा होणे अत्यंत आवश्यक आहे.

❖ ❖

## अधिकारी भेदाने शक्तिपाताच्या फळात तारतम्य

आदिमध्यावसानेषु योग्ये शक्तिर्निपातिता ।
अधमा मध्यमा श्रेष्ठाः शिष्या देवि प्रकीर्तिताः ।।
आदौ भक्तिर्भवेद्देवि दीक्षार्थं समुदन्ति ये ।
पुनर्विह्वलहृष्टास्तेआदि योग्या इतीरिता ।।
यथा विहङ्गमः शीघ्रं फल एव निषीदति ।
तथा ज्ञानोपदेशश्च कथितः कुल नायिके ।।

श्रीशंकरापासून परंपरेने चालत आलेल्या शक्तीचे सामर्थ्य एकसारखेच असूनही शिष्यांच्या उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ अधिकाराप्रमाणे त्यांना दीक्षेच्या वेळी शक्तिपाताच्या विकासाची लक्षणे तीन प्रकारची होतात व त्यांचे फळ तत्काळ अथवा क्रमाक्रमाने मिळते. ज्याच्या ठिकाणी पहिल्यापासूनच भक्ती असते व जे दीक्षाग्रहणार्थ प्रसन्नतापूर्वक उत्सुक असतात आणि दीक्षेनंतर आनंदाने जे विव्हल होतात ते आदि योग्य अधिकारी उत्तम म्हटले जातात. ज्याप्रमाणे पक्षी एकदम फळावर जाऊन बसतो तसे त्यांना दीक्षाजनित ज्ञानाचे फल तत्काळ मिळते.

दीक्षासमयसम्प्राप्ता ज्ञानाज्ञानविवर्जिताः ।
भक्त्या प्रध्वस्त सुधियो मध्य योग्याश्चेते स्मृताः ।।
यथा कपिश्च शाखायाः शाखामुलङ्घ्य यत्रतः ।
फलं प्राप्नोति धर्मस्य चोपदेशस्तथा प्रिये ।।

दीक्षेचा समय आल्यावर जो ज्ञानाज्ञानरहित असतो, ज्याला दीक्षा अथवा योगासंबंधी विशेष ज्ञान नाही परंतु दीक्षा प्राप्त होताच ज्यांच्या ठिकाणी भक्तीचा उदय होतो व ज्या योगाने बुद्धी निर्मळ होते, अशा शिष्यांना मध्य, योग्य अथवा मध्यम अधिकारी म्हणतात. त्यांना उपदेशाचे फळ क्रमाने मिळते. वानर एका शाखेवरून दुसऱ्या शाखेवर उडी मारून शेवटी फळ ग्रहण करतो त्याप्रमाणे.

आदौ भक्तिविहीना ये मध्य भक्तास्तु ये नराः ।
अन्ते भक्ताः प्रबुद्धा स्युहुर्अन्तयोग्या भवन्ति ते ।।
यथा पिपीलिका मन्दं मन्दं वृक्षाग्रमं फलम् ।
चिरेणाप्नोति धर्मोपदेशपश्चापि तथा स्मृतः ।।

ज्यांच्या ठिकाणी आरंभी भक्ती असतच नाही, दीक्षेनंतर उत्पन्न होते, असे शेवटी भक्तियुक्त होणारे अंत योग्य अधिकारी अथवा कनिष्ठ म्हटले जातात.

ज्याप्रमाणे मुंगी मंद मंद गतीने वृक्षावरील फळाला दीर्घकाळानंतर जाऊन पोचते त्याप्रमाणे गुरुपदकृपेचे फळ अशा मंद अधिकाऱ्यांना दीर्घ काळाने मिळते. अधिकाराच्या भेदाने गुरुकृपेच्या फळात समयांतर होते.

## भक्तिमार्गातही शक्तिपात आहे

ज्याप्रमाणे वेदान्त संप्रदायात अथवा योगात दीक्षा झाल्याने गुरुकृपेने आत्मशक्ती जागृत होऊन मन, प्राण व शरीरात नाना प्रकारच्या क्रिया उत्पन्न होऊन शिष्य आत्मज्ञानाकरिता आवश्यक साधने करू लागतात, त्याचप्रमाणे भक्तिमार्गातही श्री शंभूच्या प्रसादकृपेने अथवा पूर्वसंस्काराने किंवा आपल्या पुरुषार्थाने आत्मशक्ती कुंडलिनी देवी जागृत होते.

अनुभावास्तु चित्तस्थभावानामवबोधकाः ।
ते बहिर्विक्रियाप्राया प्रोक्ता उद्भास्वराख्यया ।।
नृत्यं विलुंठितं गीतं क्रोशनं तनुमोटनम् ।
हुङ्कारो जृम्भणं श्वास भूया लोकानपेक्षिता ।।
लालास्त्रावोऽट्टहासश्च घूर्णा हिक्कादयोऽपि च ।
ते शीताः क्षेपणाश्चेति यथार्थाख्या द्विधोदिताः ।।

**भक्तिरसामृत सिंधु**

त्या वेळी भक्तिसाधनात ही शक्तिपाताने चित्तातील भाव दाखविणारी बाह्य लक्षणे प्रकट होतात. नाचणे, लोटांगण घेणे, गाणे, गडबडा लोळणे, उच्च स्वरात भगवन्नामसंकीर्तन करणे, अंगाला आळोखे पिळोखे देणे, हुंकार देणे, जांभई देणे, दीर्घश्वास घेणे व सोडणे, लोकांच्या निंदास्तुतीची उपेक्षा करणे, तोंडातून लाळ गळणे, गदगदा हसणे, चक्कर येणे, उचकी लागणे, थंडी वाजणे, हातपाय झाडणे इत्यादी लक्षणे प्रकट होतात.

चित्तं सत्त्वीभवत् प्राणे न्यस्यत्यात्मानमुद्भटम्
प्राणस्तु विक्रियां गच्छन् देहं विक्षोभयत्यलम् ।।
तदा स्तंभादयो भावा भक्तदेहे भवन्त्यमी ।
ते स्तम्भस्वेदरोमाञ्चाः स्वरभेदोऽथवेपथुः ।
वैवर्णमश्रुप्रलय इत्यष्टौ सात्त्विकाः स्मृताः ।।

ज्या वेळी चित्त स्थिर होऊन प्राणात लीन होते अर्थात प्राणायाम होतो, तसेच प्राणाच्या नाना प्रकारच्या आभ्यांतरिक क्रिया होऊ लागतात त्या वेळी प्राणाच्या

क्रियाशक्तीने शरीरात विशेष प्रकारचा क्षोभ उत्पन्न होतो आणि योगाने साधक भक्ताच्या शरीरात स्तंभादि भावसमूह प्रकाशित होतात, ते असे – स्तंभ, स्वेद, रोमांच, स्वरभेद, कंप, शरीर फिके पडणे, अश्रू आणि निद्रा असे अष्टसात्त्विक भाव होऊ लागतात.

चत्वारि क्ष्मादि भूतानि प्राणो जात्ववलम्बते ।
कदाचित् स्वप्रधानः सन्देहे चरति सर्वतः ।।
स्तम्भन्भूमिस्थितः प्राणस्तनोत्यश्रूं जलाश्रयः ।
तेजस्थः स्वेदवैवर्ण्यें प्रलयं वियदाश्रितः ।।
स्वस्थ एव क्रमान्मन्दमध्यतीव्रत्व भेदभाक् ।
रोमाञ्च कम्पवैस्वर्यान्यत्र त्रीणि तनोत्यसौ ।।

देहामध्ये प्राण, पृथ्वी, जल, तेज व आकाश यांचा अवलंब करून व कधी स्वप्रधान होऊन सर्वत्र संचार करीत असतो. प्राण भूमितत्त्वाचा अवलंब करून असतो. तेव्हा स्तम्भ भाव प्रकट होतो. जलतत्त्वाचा आश्रय केल्याने अश्रुपात, तेजतत्त्वाचा आश्रय केल्याने स्वेद (स्पंद) आणि वर्णविकृती, आकाशतत्त्वात स्थित झाल्याने भावसमाधी, मूर्च्छा, तंद्रा अथवा निद्रा येते. आणि ज्या वेळी आपल्या तत्त्वात स्थित होतो त्या वेळी मंद, मध्य आणि तीव्रभेदाने यथाक्रम रोमांच, कंप व स्वरविक्रिया हे तीन भाव प्रकट होतात.

म्हणून श्रीगुरूच्या शक्तिपाताने मन, प्राण व शरीरात अध्यात्मप्रसादाच्या आनंदाचा आविर्भाव होतो. साधक शिष्य वेदान्ती असो, योगी असो, साकार उपासना करणारा भगवद्भक्त असो अथवा यापैकी काही न करणारा असो, तथापि आत्मशक्ती, प्राणकलेच्या जागृतीची लक्षणे सर्वांच्याच ठिकाणी प्रकट होतात. याकरिता श्रीमहेश्वरकथित महायोगसाधन समजून अथवा न समजून ज्ञानी, ध्यानी, योगी, यति, इत्यादी सर्वांनाच करावे लागते. म्हणून योग, भक्ती व ज्ञान ही वेगवेगळी नाही असे निश्चयपूर्वक समजावे.

## ज्ञानबीजाचा गर्भ

श्री शंभूचा प्रसाद सर्वांना एकसारखाच आहे. शक्तिपाताने शिष्याला लक्ष्यार्थाचा बोध होतो. त्याच्या बुद्धीत ज्ञानाच्या बीजाचा अंकुर उत्पन्न होतो. पुष्कळ परीक्षा करून असे पाहिले आहे की जर शिष्य वास्तविक शास्त्रात सांगितल्याप्रमाणे योग्य अधिकारी असेल तर त्याला सांगितल्याप्रमाणे दीक्षेचे फळ तत्काळ मिळते. नाहीतर त्या शास्त्रात सांगितल्याप्रमाणे अनुभव आले तरी त्याला साधन करीत

रहावे लागते. शिष्याचे शरीर, मन, प्राण आत्मज्ञानाला उपयुक्त व्हावे म्हणून शरीरातील जागृत झालेली शक्ती त्याच्या संस्कारानुसार स्वतः वेदान्त, योग अथवा भक्तिमार्गानुसार त्याच्याकडून साधन घडविते. म्हणून केवळ शक्तिपातमात्रानेच शिष्य साधनापासून सुटत नाही. तथापि त्याच्या शरीरात, मनात व प्राणात एक प्रकारचे विशेष परिवर्तन होते.

ज्याप्रमाणे केवळ गर्भस्थापनामात्रानेच मुलाचा जन्म होत नाही, परंतु स्त्री आपल्या ठिकाणी गर्भधारणा झाल्याची लक्षणे समजू शकते, त्याप्रमाणे गुरूच्या शक्तिपाताने आपल्या ठिकाणी ज्ञानाच्या बीजाचा गर्भ स्थापन झाला आहे, याचा प्रत्येक शिष्याला अनुभव येतो. योग्य वेळी ज्ञान उत्पन्न होईल. ज्याप्रमाणे गर्भवती स्त्रीला गर्भवृद्धीची लक्षणे अनुभवाला येतात त्याप्रमाणे प्रत्येक शिष्याला कुंडलिनीशक्तीच्या क्रियेमुळे ज्ञानवृद्धी होत असल्याचा अनुभव येतो. ज्याप्रमाणे जननी गर्भस्थ संतानाच्या सुरक्षिततेकरिता आवश्यक नियमांचे पालन करते त्याप्रमाणे शिष्यालाही ज्ञान-रक्षार्थ शास्त्रोक्त नियमपालन केले पाहिजेत.

ज्याप्रमाणे गर्भवती स्त्री उदरस्थ संतानाचे रक्षण न करता दुष्ट बुद्धीने गर्भाचा नाश करू इच्छील तर गर्भ नष्ट होऊ शकतो. त्याप्रमाणे गुरूने शक्तिपातरूप स्थापन केलेला गर्भ शिष्याच्या दुराचरणाने अथवा शास्त्रात सांगितलेले आवश्यक धर्मपालन न केल्याने नष्ट होऊ शकतो. जोपर्यंत ज्ञान उत्पन्न होत नाही तोपर्यंत धर्माधर्मरूप संस्कार नष्ट होत नाहीत. म्हणून ज्ञान उत्पन्न होईपर्यंत शास्त्रोक्त विधिवाक्यांचे पालन करणे आवश्यक आहे. वास्तविक सद्विद्येचे बीज नष्ट होत नाही. पुनः जन्मांतरात बीजांकुर प्रकट होण्याचा समय उत्पन्न होतो. तथापि ज्ञान परिपक्व होईपर्यंत स्वेच्छापूर्वक शास्त्रबाह्य वर्तन करणे चांगले नाही.

श्रीमहेश्वर कृपेने गुरुद्वारा अथवा तुमच्या प्रबळ पुण्यप्रतापाने तुमची आत्मशक्ती जागृत होते. तिला योगी लोक कुंडलिनी शक्ती म्हणतात. भक्तिमार्गी लोक आल्हादिनी शक्ती म्हणतात. वेदान्ती लोक चितिशक्ती अथवा आत्मसत्ता म्हणतात आणि तंत्र मंत्र मार्गी लोक महामाया आद्याशक्ती, कुलकुंडलिनी इत्यादी नाना प्रकारच्या नावांनी संबोधितात. तिच्या अनुग्रहाची सर्व इच्छा करतात कारण हिच्याच साहाय्याने तुम्ही परमात्म्याशी ऐक्य पावू शकाल. ज्ञान, योग आणि भक्ती हे माझ्या प्राप्तीचे तीन मार्ग मीच सांगितले आहेत. दीक्षाद्वारा या तिहींच्या योगाने तुम्ही माझ्या सायुज्यतेला प्राप्त व्हाल.

## दीक्षेचे फळ मोक्ष आहे

यया दीक्षितमात्रेण जायन्ते प्रत्ययाः प्रिये ।
सा दीक्षा मोक्षदा ज्ञेया शेषास्तु जनसेविकाः ।।
उपासनाशतेनापि या चिन्ता नैव नश्यति ।
तां दीक्षामाश्रयेद्यत्नात् श्रीगुरोर्मन्त्रसिध्दये ।।
रसेन्द्रेण यथा विध्दमयः सुवर्णतां व्रजेत् ।
दीक्षान्वितस्तथा ह्यात्मा शिवत्वं लभते प्रिये ।।

**कुलार्णव तंत्र चतुर्दश उल्लास**

ज्या दीक्षेमध्ये दीक्षा होताच तत्काळ अनुभव येऊन आत्मविश्वास उत्पन्न होतो ती दीक्षा मोक्ष देणारी समजावी. जिच्यात उक्त अनुभव येत नाही ती केवळ नाममात्र दीक्षा समजावी. तिच्यापासून काही फळ उत्पन्न होत नाही. शेकडो प्रकारच्या उपासना करूनही ज्या चिंतेचा नाश होत नाही, ती चिंता यत्नपूर्वक गुरूपासून दीक्षित झाल्यावर नष्ट होते. ज्याप्रमाणे रासायनिक क्रियेच्या योगाने पारद निकृष्ट धातूचा भेद करून त्याचे सुवर्ण बनवितो त्याप्रमाणे दीक्षेच्या योगाने जीवात्मा शिवस्वरूप होतो.

दीक्षाग्निदग्ध कर्माऽसौ मायाविच्छिन्नबन्धनः ।
गतां परां ज्ञाननिष्ठां निर्बीजस्तु शिवो भवेत् ।।
गतं शूद्रस्य शूद्रत्वं विप्रस्यापिच विप्रता ।
दीक्षासंस्कार-सम्पन्ने जातिभेदो न विद्यते ।।
येन पूजितमात्रेण चाब्रह्मभुवनान्तिकम् ।
पूजितंह्यतेन सर्वं स्याद्दीक्षितेन न संशयः ।।

दीक्षारूपी अग्नीने जीवाचे कर्मसमूह दग्ध झाल्याने व कर्माचे बीज नष्ट झाल्याने मायेचे बंधन तुटून जाते आणि ज्ञानाची पराकाष्ठा जी निर्बीज समाधी तिला प्राप्त होऊन, तो शिवस्वरूप होऊन जातो. या अवस्थेत शूद्राची शूद्रता व विप्राची विप्रता याचा अभिमान निघून जातो. कारण दीक्षा संस्कारसंपन्न झाल्यावर जातिभेद रहात नाही. परमशिवाची पूजा करण्याने येथपासून ब्रह्मलोकापर्यंतची पूजा होते. म्हणून दीक्षित झालेल्या व्यक्तीने त्या सर्वांची पूजा केली असे होते, यात मुळीच संशय नाही. शक्तिजागृती करता पूजा केली जाते आणि दीक्षेच्या योगाने शक्ती जागृत होते.

दीक्षितस्य न कार्यं स्यात्तपोभिर्नियमव्रतैः ।
न तीर्थक्षेत्रगमनैर्न च शारीरयन्त्रणैः ।।
अदीक्षिता ये कुर्वन्ति जपपूजादिकाः क्रियाः ।
न फलन्ति प्रिये तेषां शिलायामुप्तबीजवत् ।।

विधिपूर्वक दीक्षेने संस्कृत झाल्यानंतर त्याला नित्यनैमित्तिक कर्म करण्याची आवश्यकता रहात नाही. तसेच कष्टपूर्वक जप, तप, नियम, व्रत, तीर्थयात्रा आदि शारीरिक कष्ट करण्याची आवश्यकताही राहत नाही. कारण दीक्षेच्या योगानेच जपतप आदीच्या फळाची प्राप्ती होते. जे लोक अदीक्षित आहेत, त्यांनी जप, पूजादि क्रिया केल्या तरी त्या खडकावर पेरलेल्या बीजाप्रमाणे निष्फळ होतात.

# ✦ दशम प्रकाश ✦

## दीक्षेचे स्थान

गोशालायां गुरोर्गेहे देवागारे च कानने ।
पुण्यक्षेत्रे तथोद्याने नदीतीरे च दीक्षणम् ।।
धात्रीबिल्वसमीपे च पर्वताग्रगुहासु च ।
गङ्गायास्तु तटे वापि कोटिगुणं फलं भवेत् ।।
अथवा गुरुरेवास्य दीक्षयेद् यत्र तच्छुभम् ।
गुरोः परतरं नास्ति तद्वाक्यं श्रुतिसन्निभम् ।।

**मंत्रयोग संहिता**

गुरूकडून दीक्षा घेण्याला स्थळ व काळ यांचे शास्त्रात विधान आहे. म्हणून उत्तम स्थळी व उत्तम समयी दीक्षा ग्रहण करण्याने शिष्याच्या सर्व अभीष्टार्थाची सिद्धी होते.

## दीक्षेकरिता प्रशस्त स्थाने

गोशाला, गुरुगृह (ज्या ठिकाणी गुरू निवास करतात), देवालय, वन, पुण्यक्षेत्र, उद्यान, नदीतीर या ठिकाणी दीक्षा घ्यावी. अथवा आवळ्याच्या किंवा बेलाच्या झाडाखाली, पर्वतावर अथवा गुहेत दीक्षा घ्यावी. गंगातटाकी कोणत्याही ठिकाणी दीक्षा ग्रहण करण्याचे अत्यंत पुण्य आहे. म्हणून गंगातीरावर दीक्षा घेणे सर्वोत्तम आहे. कारण गंगातटाकावरील सर्वच स्थाने तीर्थरूप आहेत. अथवा गुरू आपल्या इच्छेने ज्या कोणत्याही (कोण्याही) ठिकाणी दीक्षा देतील तेच स्थान सर्वात श्रेष्ठ आहे. कारण गुरूपेक्षा अधिक कोणतेही तीर्थ नाही व गुरुवाक्य श्रुतितुल्य आहे.

## दीक्षेचा समय

यदि भाग्यवशेनैव सिद्धो हि पुरुषो मिलेत् ।
तदैव दीक्षां गृण्हियात् त्यक्त्वा काल विचारणाम् ।।
दुर्लभे सद्गुरुणाञ्च सकृत् संग उपस्थिते ।
तदनुज्ञा यदा लब्धा स दीक्षावसरो महान् ।।
यदैवेच्छा तदा दीक्षा गुरोराज्ञानुरूपतः ।।
न तीर्थं न व्रतं होमो न स्थानं न जपक्रिया ।
दीक्षायाः कारणं किन्तु स्वेच्छा प्राप्ते तु सद्गुरौ ।।

**मंत्रयोग संहिता तथा तत्त्वसागर**

व्यवहारात साधारणपणे सर्व शास्त्रांत सांगितल्याप्रमाणे व्रतबंध, विवाहादि शुभकार्याकरिता तिथी, वार, नक्षत्र, लग्न, करण, योग यावरून मुहूर्त पाहून मग कार्य करतात. तसेच तीर्थयात्रा, यज्ञ, दान, तप, जप, दीक्षा आदि शुभकर्मांमध्ये शुभाशुभ निर्णय करून कार्य करतात. चांगल्या वेळी उत्तम तिथिवार नक्षत्रावर आपले नाव व राशीच्या अनुसाराने केलेले शुभकर्माचे अनुष्ठान निर्विघ्नपणे तडीस जाते व इच्छेनुसार त्याचे वांछित फळ मिळते. म्हणून ज्योतिषद्वारा कालनिर्णय करून सर्व धर्मकर्मे केली जातात व तशी केलीही पाहिजेत. ते कसेही असो, परंतु भाग्यवशात् जर गुरू सिद्ध पुरुष मिळेल तर विचार न करता तत्काळ त्याच्यापासून दीक्षा घेतली पाहिजे. कारण ज्या वेळी सद्गुरूचा दुर्लभ संग मिळेल व ज्या वेळी ते प्रसन्नतापूर्वक कृपा करण्याला तयार होतील तोच काल शिष्याला दीक्षा ग्रहण करण्याला अत्यंत श्रेष्ठ आहे. म्हणून गुरूच्या आज्ञेनुसार ज्या वेळी गुरू व शिष्य दोघांची इच्छा होईल त्याच वेळी दीक्षा होऊ शकते. ज्या वेळी गुरू स्वतः कृपा करतात त्या वेळी त्यांच्या कृपेचा लाभ करून घेण्याला कालाकालाचा काहीही नियम नाही.

सामर्थ्यसंपन्न गुरू शास्त्र व लौकिक व्यवहारातील विधिनिषेधाच्या पलीकडचे असतात. आणि ते ज्यांच्यावर कृपा करतात त्यांनाही विधिनिषेधाच्या बंधनापासून मुक्त करतात. असे गुरू क्वचित् कोणाला भाग्यवशात् प्राप्त होतात. म्हणून साधारणपणे लोक सामर्थ्यहीन बाह्य क्रियाकर्म करणाऱ्या गुरूकडून दीक्षा घेतात. आणि शास्त्रात सांगितल्याप्रमाणे दीक्षेच्या पूर्वी तीर्थादि पवित्र स्थान पाहून व दीक्षेकरिता व्रत ग्रहण करून स्नान, जप, पूजा, हवन आदी पुष्कळशा बाह्य क्रिया करतात. परंतु वास्तविक या सर्व क्रिया दीक्षेचे मुख्य कारण नाही. सद्गुरूची कृपा झाल्याने शिष्याला प्रायश्चित्त करण्याकरिता तीर्थ, स्नान, व्रत, जप हवनादि क्रिया करण्याची आवश्यकता नाही. परंतु सद्गुरू प्राप्त झाल्यावर शिष्यावर त्यांची कृपा व त्यांची इच्छा हेच दीक्षेचे मुख्य कारण आहे.

शिष्यानाहूय गुरुणा कृपया यदि दीयते ।
तदा लग्नादिकं किञ्चिन्न विचार्यं कथञ्चन ।।
सर्वे वारा ग्रहाः सर्वे नक्षत्राणि च राशयः ।
यस्मिन्नहनि सन्तुष्टो गुरुः सर्वे शुभावहाः ।।

### संमोहन तंत्र

गुरू जर कृपा करून शिष्याला आपल्याजवळ बोलावून दीक्षा देतील तर त्या वेळी लग्न, तिथी, वार, नक्षत्र, ग्रह, राशी आदि मुहूर्ताबद्दल कोणत्याही प्रकारचा

विचार करण्याचे कारण नाही. कारण ज्या दिवशी गुरू प्रसन्न होऊन दीक्षा देतील तोच दिवस, तिथी, वार, नक्षत्र, ग्रह, राशी, वेळ आदि सर्व जरी निषिद्ध असली तथापि ते सर्व गुरूच्या कृपेने शिष्याला शुभ होतात.

लग्ने वाप्यथवाऽलग्ने यत्र तत्र तिथावपि ।
गुरोराज्ञानुरूपेण दीक्षा कार्य विशेषतः ॥
न तिथि न व्रतं पूजा न सन्ध्या न जपक्रिया ।
दीक्षायां कारणं ज्ञानं स्वेच्छा प्राप्ते च सद्गुरौ ॥
सर्वे वारा ग्रहाः सर्वे नक्षत्राणि च राशयः ।
यस्मिन्नहनि सन्तुष्टो गुरुः सर्वे शुभावहाः ।
यदैवेच्छा तदा दीक्षा गुरोराज्ञानुरूपतः ॥

**शक्तानंद तरिंगिणी**

याकरिता सामर्थ्यसंपन्न गुरूच्या आज्ञेनुसार शुभ अथवा अशुभ लग्नावर कोणत्याही तीर्थाच्या ठिकाणी विशेष प्रकारच्या दीक्षा कार्याने संपन्न व्हावे. त्या वेळी शुभ तिथी, व्रत, पूजा, इत्यादिकांची आवश्यकता नाही. तसेच स्नान, संध्या, तर्पण, जपहवनादि क्रियांचीही गरज नाही. कारण ही सर्व बाह्य साधनेच ज्ञानाला कारण नाहीत. सिद्ध पुरुषाची कृपादीक्षा हेच ज्ञानाचे कारण आहे. म्हणून ज्या दिवशी गुरू प्रसन्न होऊन दीक्षा देतील व शिष्य ग्रहण करील तोच दिवस, तिथी, वार, नक्षत्र, ग्रह, राशी आदि सर्व शिष्याला मंगलप्रद आहे. गुरूची दीक्षा देण्याची इच्छा व शिष्याची ग्रहण करण्याची इच्छा ज्या वेळी होईल तोच दिवस गुरूच्या कृपेचा अत्यंत उत्तम समय समजावा. गुरू आणि शिष्याची इच्छाच दीक्षेचा शुभ काल आहे.

## दीक्षाग्रहणाचा विधी

उपगम्य गुरुं विप्रमाचार्य तत्त्ववेदिनम् ।
जापिनं सद्गुणोपेतं ध्यानयोगपरायणम् ॥
तोषयेत् तं प्रयत्नेन भावशुद्धिसमन्वितः ।
वाचा च मनसा चैव कायेन द्रविणेन च ॥
आचार्यं पूजयेत् शिष्यः सर्वदा हि प्रयत्नतः ।
हस्त्यश्वरथरत्नानि क्षेत्राणि च गृहाणि च ॥
भूषणानि च वासांसि धान्यानि च धनानि च ।
एतानि गुरवे दद्यात् भक्त्या च विभवे सति ॥

**वायवीय संहिता अध्याय १४.**

सर्व सद्गुणानियुक्त महासामर्थ्यसंपन्न जप, तप, ध्यान, योग-परायण अशा तत्त्ववेत्त्या गुरूजवळ जाऊन शुद्ध मनाने, कर्माने, वाचेने, शरीराने व धनाने प्रयत्नपूर्वक सदा गुरूची प्रसन्नता करून घेण्याकरिता दीक्षेच्या पूर्वी विशुद्ध भावपूर्वक गुरूचे पूजन केले पाहिजे व आपल्या सामर्थ्यानुसार भक्तियुक्त होऊन हत्ती, घोडे, रथ, रत्ने, गृह, भूषणे, वस्त्रे, धन, धान्य आदि वैभव देऊन गुरूची सेवा करावी.

## शिष्याचे कर्तव्य

वित्तशाठ्यं न कुर्वीत यदीच्छेत् सिद्धिमात्मनः ।
पश्चान्निवेदयेद्देवि स्वात्मानं सपरिच्छदम् ।।
एवं संपूज्य विधिवद् यथाशक्ति त्ववञ्चयन् ।
आददीत गुरोर्मन्त्रं ज्ञानञ्चैव क्रमेण तु ।।

म्हणून आत्मकल्याणाची इच्छा करणाऱ्या शिष्याने वर सांगितल्याप्रमाणे सामर्थ्य असल्यास सेवा करावी अथवा धनादि वैभवाने सेवा करणे शक्यच नसल्यास पत्र, पुष्प, फळ, जल इत्यादी ते काही आपल्याला मिळण्यासारखे असेल ते घेऊन गुरूला शरण जावे. परंतु धन असताना केव्हाही त्याचा अभाव दाखवू नये. गुरूला अभाव दाखविल्याने कोणत्याही धर्मकर्माची सिद्धी होत नाही. याकरिता गुरूजवळ कोणत्याही प्रकारची आत्मप्रतारणा न करिता, कपटरहित होऊन आपली जी परिस्थिती असेल ती गुरूजवळ उघड करून यथाशक्ति पुष्प, पत्राने गुरूचे पूजन करून नंतर सरळ मनाने वास्तविक भाव, कर्म, अकर्म, पाप-पुण्य, जे काही केले गेले असेल अथवा करण्याची इच्छा असेल ते सर्व गुरूला निवेदन करून, त्यांच्या मनाची प्रसन्नता प्राप्त करून घेऊन त्यांच्यापासून मंत्र ग्रहण करावा व क्रमाने ज्ञानलाभ करून घ्यावा.

भक्त्या तुष्टेन गुरुणा यः प्रदिष्टः कृपालुना ।
कर्ममुक्तो भवेच्छिष्यो भुक्तिमुक्त्योः स भाजनम् ।।
गुरुसन्तोषमात्रेण सिद्धिर्भवति शाश्वती ।
अन्यथा नैव सिद्धिः स्यादभिचाराय कल्पते ।।
आचार्यं मां विजानीयान्नावमन्येत् कर्हिचित् ।
न मर्त्यबुद्ध्याऽसूयेत् सर्वदेवमयो गुरुः ।।

**कुलार्णव तंत्र**

भक्तीने प्रसन्न होऊन कृपाळू गुरू दीक्षा देतील, त्या वेळी गुरुप्रदत्त योगसाधनाने शिष्य कर्ममुक्त होऊन भुक्ती व मुक्ती प्राप्त करण्याला समर्थ होतो. म्हणून गुरूची कृपा संपादन करणे शिष्याला अत्यंत आवश्यक आहे. कारण गुरू संतुष्ट होण्यानेच सर्व

धर्मकर्माच्या सिद्धी व शाश्वत मुक्तीचा लाभ होतो. गुरूच्या प्रसन्नतेशिवाय कोणतीही सिद्धी होत नाही. गुरू असंतुष्ट राहिल्याने शिष्याची सर्व धर्मकर्माच्या ठिकाणी द्वेष व दोषरूप विपरीत बुद्धी होते व त्यामुळे साधकाचे पतन होते. गुरूला साक्षात् भगवान स्वरूप समजावे. त्याचा कधी अनादर करू नये व गुरूला मनुष्य समजून त्याची कोणत्याही प्रकारे अवहेलना करू नये. कारण गुरू सर्वदेवमय आहे. म्हणून अनुग्रह घेतल्यावरही शिष्याने गुरूच्या प्रसन्नतेकरता सदा तत्पर राहून सेवापरायण व्हावे.

त्रिदिनं निवसेद् भक्त्या सिद्धये गुरुसन्निधौ ।
अन्यथा तद्गतं तेजो गुरुमेति न संशयः ।।
तस्य छायानुसारी च निकटे त्रिदिनं वसेत् ।
न चेत् सञ्चारिणी शक्तिर्गुरुमेति न संशयः ।।

**वृहन्नील तंत्र तथा गौतमीय तंत्र**

दीक्षा घेतल्यानंतर शिष्याने सिद्धी प्राप्त होण्याकरिता कमीतकमी तीन दिवस तरी भक्तियुक्त होऊन गुरूच्या सन्निध राहावे. नाहीतर दीक्षेच्या योगाने शरीरात प्रविष्ट झालेले गुरूचे तेज निःसंशय गुरूच्या ठिकाणी परत जाते. म्हणून दीक्षा ग्रहण केल्यानंतर तीन, पाच, सात अथवा अधिक दिवसपर्यंत आपल्या क्रियाशक्तीचा विकास होईपर्यंत गुरूजवळ त्यांच्या आज्ञेनुसार राहून एकांतात बसून साधन करीत राहावे. ज्या वेळी गुरू प्रसन्न होऊन आज्ञा देतील अथवा आपली इच्छा पूर्ण होईल व गुरुशक्तीचा अनुभव येईल त्या वेळी गुरूपासून दूर जावे. असे न केले तर गुरूची संचारिणी शक्ती पुनः गुरूच्या ठिकाणी निःसंशय परत जाते. दीक्षा घेऊन परत गेल्यावरही नित्य योगाभ्यास न केला तर अथवा गुरूबद्दल उदासीन राहिल्याने किंवा गुरूशी संबंध न ठेवल्याने गुरूच्या संचारिणी शक्तीच्या क्रिया मंद होतात आणि शरीरात नाना प्रकारचे रोग उत्पन्न होतात व धर्मकर्मात साधकाची विपरीत बुद्धी होते व त्यामुळे दुर्भाग्य प्राप्त होते. या करता आपल्या साधनोन्नतीसाठी आवश्यकतेनुसार गुरूच्या सान्निध्यात राहण्याचा समय निर्दिष्ट करून वर्षातून एक महिना, एक पक्ष, निदान एक सप्ताह तरी गुरूच्या निकट सहवासात राहिल्याने साधनात यथेष्ट उन्नती होते व आपल्या अभीष्टाची शीघ्र सिद्धी होते. याशिवाय नित्य ध्यानद्वारा अथवा पत्रव्यवहारद्वारा गुरूशी नेहमी संपर्क राहिल्याने शिष्याच्या साधनात कोणत्याही प्रकारची बाधा अथवा विघ्न उत्पन्न होत नाही.

## गुरुदक्षिणा

गुरवे दक्षिणां दद्यात् प्रत्यक्षाय शिवात्मने ।
न चेत् सञ्चारिणी शक्तिः कथमस्य भविष्यति ।।

तत उत्थाय गुरवे यथाशक्त्यनुसारतः ।
दक्षिणां स्व फलं वापि दद्यात् साधक सत्तमः ।।

**बृहन्नील तंत्र तथा महानिर्वाण तंत्र**

ज्या गुरूच्या महाशक्तीच्या प्रभावाने शिष्याला आपल्या ठिकाणी आश्चर्यजनक अनुभव येतो; ज्याच्या कृपेने शिष्य धर्म, अर्थ, काम व मोक्ष प्राप्त करून घेण्याला समर्थ होतो, अशा प्रत्यक्ष अनुभव करून देणाऱ्या गुरूपासून दीक्षा घेतल्यानंतर त्यांना दक्षिणा दिली पाहिजे. गुरूपासून दीक्षा घेतल्यानंतर आपल्या सामर्थ्यानुसार गुरुदक्षिणा दिली नाही तर गुरूची संचारिणी शक्ती शिष्याच्या ठिकाणी राहू शकत नाही. कदाचित राहिली तर शिष्याचे अमंगल होते. म्हणून उत्तम साधकाने दीक्षेचा विधी पुरा झाल्यावर गुरूच्या आज्ञेने उठल्यावर आपल्या योग्यतेनुसार अर्थ, सुवर्ण, वस्त्र अथवा फलमूल यथाशक्ति गुरूला नम्रतापूर्वक भक्तिभावाने दक्षिणारूपाने अर्पण करावे.

गुरवे दक्षिणां दद्यात् वित्तार्धं भक्तितत्परः ।
तदर्थं वा ततो दद्यात् यथाशक्त्यायभक्तिः ।।
वित्तशाठ्यं न कुर्वीत कृतेऽनर्थं समाहरेत् ।
गोभूहिरण्यवस्त्रादीन् गुरवेऽथ निवेदयेत् ।।
गुरुपुत्रेऽपि तत्पत्न्यै तच्छिष्येऽपि स्वशक्तितः ।
वस्त्रालंकरणं दद्यात् भोज्यं मिष्टं यथारुचि ।।

**गौतमीय तंत्र पटल १३**

गुरूला दक्षिणा दिली पाहिजे. न्यायाने संपादन केलेल्या आपल्या संचित धनाचा अर्धा भाग, चौथा भाग अथवा यथाशक्ति भक्तिसहित गुरूला अर्पण करावे. धन असताना अभाव दाखवू नये. परंतु जे लोक वित्तशाठ्य करतात – धन असूनही द्यावे लागेल म्हणून, लोभ-वृत्तीने गुरूला अभाव दाखवितात व आपले धर्म, कर्म व मनाचे वास्तविक भाव गुरूपासून लपवून ठेवतात, त्यापासून अनर्थ होतो. त्यांना दीक्षाजनित ज्ञानाचे काही फल मिळत नाही. म्हणून आपल्या शक्त्यनुसार गुरूला गाय, भूमी, सुवर्ण, वस्त्रादि निवेदन करावे. गुरुपुत्राला व गुरुपत्नीलाही वस्त्रभूषणादि शक्त्यनुसार द्यावे. गुरूला स्त्रीपुत्रादिक नसतील तर त्याच्या मुख्य शिष्याला द्यावे व दीक्षेच्या दिवशी सर्वांना यथाशक्ति यथारुचि मिष्टान्न भोजन घालावे.

पित्रोरभरणं कृत्वा ह्यदत्त्वा गुरुदक्षिणाम् ।
कृतघ्नताञ्च संप्राप्य मरणान्ता हि निष्कृतिः ।।

विद्यां प्राप्यापि यो मोहात् स्व गुरोः पारितोषिकम् ।
न प्रयच्छन्ति निरयंते यान्त्याचन्द्रतारकम् ।।

**स्कन्दपुराण तथा ब्रह्मपुराण**

ज्याप्रमाणे जन्मदात्या मातापित्याचे भरणपोषण करणे पुत्राचे परम कर्तव्य आहे, त्याचप्रमाणे संसारबंधनापासून मुक्त करणाऱ्या ज्ञानदात्या गुरूची सेवा करणेहि शिष्याचे कर्तव्य आहे. कर्तव्याची अवहेलना करून मातापित्याचे भरणपोषण न केल्याने व त्याचप्रमाणे गुरूपासून विद्या प्राप्त करून घेतल्यानंतर दक्षिणा न दिल्याने मनुष्य मरेपर्यंत कृतघ्नतादोषाने लिप्त राहतो. त्या कृतघ्नाची मरण हीच निष्कृती आहे. म्हणून जे लोक गुरूपासून विद्या प्राप्त करून घेतल्यावर मोहाने त्याला पारितोषिक, दक्षिणा देत नाहीत ते प्रलयापर्यंत नरकाचे दुःख भोगतात.

कस्मिन्नु यज्ञः प्रतिष्ठितः दक्षिणायामिति ।
कस्मिन्नु दक्षिणा प्रतिष्ठिता, श्रद्धायामिति ।।
यदाह्येव श्रद्धत्ते अथ दक्षिणां ददाति ।
श्रद्धायां ह्येव दक्षिणा प्रतिष्ठिता ।।
दक्षिणा विहिनो यज्ञः सिद्धिदो न च मोक्षदः ।
दक्षिणा यज्ञ पत्नी च दीक्षा सर्वत्र पूजिता ।।
यया विना च विश्वेषु सर्व कर्म च निष्फलम् ।।

**बृहदारण्यक उपनिषद् अ. ३-२१**

यज्ञ कशात प्रतिष्ठित आहे? दक्षिणेत. दक्षिणा कशात प्रतिष्ठित आहे? श्रद्धेत. अर्थात यज्ञ कशाने फलप्रद होतो? दक्षिणा देण्याने. दक्षिणा कशाने फलप्रद होते? श्रद्धेच्या योगानेच फलप्रद होते. म्हणून यज्ञ करणारे यजमान वैदिक यज्ञ करविणाऱ्या ब्राह्मणांना श्रद्धेने दक्षिणा देतात. श्रद्धापूर्वक दिलेली दक्षिणा सर्व यज्ञाचे फळ देते. श्रद्धाविहीन यज्ञ वांछित फल देत नाही व तो मोक्षदायकही होत नाही. शास्त्रकथनानुसारही दीक्षा ही एक प्रकारचा यज्ञ आहे. क्रियावती दीक्षा बाह्य यज्ञ असून ती बाहेरच्या हवनादि कर्माने संपादित होते व ज्ञानवती दीक्षा आंतर यज्ञ आहे. आणि तो गुरूच्या आत्मशक्तीने संपादित होतो. हिची दक्षिणा न दिलीत तर ती निष्फळ होईल. याकरिता दीक्षेची दक्षिणाही दिलीच पाहिजे. दीक्षा व दक्षिणा या यज्ञपत्नी आहेत. यांच्या संयोगाने यज्ञ वांछित फळ देतो म्हणून संसारात दीक्षा व दक्षिणा याशिवाय जे धर्मकर्म केले जाते ते ते निष्फळ होते. वैदिक यज्ञकर्मात

दीक्षित होऊन यज्ञ केल्यावर दक्षिणा देऊन फळ प्राप्त केले जाते. श्रद्धा, भक्तीशिवाय दक्षिणाही निष्फळ होते.

सर्वस्वमपि यो दद्यात् गुरौ भक्तिविवर्जितः ।
शिष्यो न फलमाप्नोति भक्तिरेव हि कारणम् ।।
आज्ञाहीनं क्रियाहीनं श्रद्धाहीनं वरानने ।
आज्ञार्थं दक्षिणाहीनं सदा जप्तं च निष्फलम् ।।

**कुलार्णव तंत्र तथा वायवीय संहिता**

जो शिष्य गुरुभक्तिरहित आहे त्याने जरी गुरूला सर्वस्व अर्पण केले तरी त्याला दीक्षेचे फळ मिळत नाही. कारण फळप्राप्तीचे कारण गुरुभक्तीच आहे. म्हणून जो शिष्य गुरूची आज्ञा मानीत नाही, जो क्रिया करीत नाही व जो श्रद्धाहीन आहे, तसेच जो गुरुकृपारूप आज्ञाशक्तीचे ग्रहण करून दक्षिणा देत नाही अशा लोकांचे जपतपादि सर्व कर्म निष्फळ होते.

याकरिता शास्त्रकथनानुसार गुरूची सेवा करून, प्रसन्नता लाभ करून घेतल्याने गुरुकृपेचे फळ पूर्णज्ञानामध्ये परिणत होते व शिष्य आपली अभीष्ट सिद्धी निर्विघ्नतापूर्वक सहज प्राप्त करून घेतो. परंतु अन्यायाने व आत्मप्रतारणा करून गुरूचा महान उपकार घेऊन प्रत्युपकार करण्याने शिष्याच्या ठिकाणची गुरूची संचारिणी शक्ती नष्ट होते. अथवा तिचा भलताच परिणाम होतो. शिष्याचे मन भ्रांत व विक्षिप्त होते आणि शांतिरहित होऊन त्यात नाना प्रकारचे विकल्प उत्पन्न होतात. याप्रमाणे गुरुभक्तीची अवज्ञा अथवा तिरस्कार केल्याने किंवा गुरूच्या ठिकाणी अनास्था होण्याने शिष्याला शारीरिक, मानसिक आणि आर्थिक दुःख प्राप्त होते. तसेच बलात्काराने त्याच्या साधनाचा नाश होतो आणि पुष्कळशा आपत्ती येतात. कारण अन्यायाने प्राप्त करून घेतलेल्या दीक्षेच्या ज्ञानाचे फळ विपरीतच होते.

ज्या गुरूची आत्मशक्ती अष्टप्रहर शिष्याच्या ठिकाणी क्रिया करीत आहे, ज्या गुरुशक्तीच्या स्मरणमात्राने अष्टांग योगाच्या क्रिया आपोआप होतात, ज्याच्या शक्तीच्या कार्याने शिष्याचे शरीर, मन, प्राण, बुद्धी विवश होऊन आपले अस्तित्व विसरून जातात, ज्या गुरूच्या शक्तिसाधनामुळेच कार्याकार्याचा काही विकार नाही, अथवा दुसऱ्या कोणत्याही गुरूची किंवा अन्य ज्ञानाची आवश्यकता नाही. शिष्य स्वतः आपला गुरू होतो. ज्या गुरूच्या कृपेने साधक सुखपूर्वक संसारातच राहून अनायासाने धर्म, अर्थ, काम व मोक्ष प्राप्त करून घेण्याला समर्थ होतो. अशा महाकल्याणकारी

साधन देणाऱ्या निर्व्याज करुणाकर गुरूपासून दीक्षा घेऊन जर प्रत्युपकार्या शिष्य गुरूची काहीही सेवा न करील तर तो महादुर्भागी आहे. तो कसा सुखी होणार ?

शिष्याला दीक्षा देण्याने गुरूला आपल्या आत्मतेजाची हानी करून घ्यावी लागते. ज्याप्रमाणे सर्पाचे विष नष्ट झाल्याने तो बलहीन होतो अथवा वीर्यनाशाने जसा पुरुष तेजहीन होतो तसेच गुरूही आपले सामर्थ्य व्यय करीत राहिल्याने त्या वेळी प्रभाहीन होतो. कारण गुरूच्या दीक्षाशक्तीने शिष्याच्या पापसंस्कारावर आघात होऊन त्यांचा नाश होतो. म्हणून ते संस्कार गुरूवर आक्रमण करतात. गुरू शक्तिमान असल्यामुळे त्यांचा नाश व प्रशमनहि करू शकतो. तथापि प्रत्याघातामुळे काही वेळेपर्यंत गुरू व्याधिग्रस्तहि होतो. अशा अवस्थेत जर गुरुकृपापात्र शक्तिमान शिष्य त्याची सेवा करणार नाही तर त्या शिष्याबद्दल गुरूच्या मनात अनास्था व तिरस्कार उत्पन्न होतो व त्यामुळे शिष्याचे अमंगल होते व गुरूचे मनही दीक्षा व्यापाराबद्दल उदासीन होते. एकाच सिद्ध गुरूचे पुष्कळसे शिष्य जरी शक्तिसंपन्न गुरुपदाला प्राप्त झाले असले तरी सर्वच सारखेच शक्तिसंपन्न असतात असे नाही. म्हणून त्यांच्या शिष्यांच्या ठिकाणीही त्याच्या क्रियाशक्तीचेही तारतम्य असते. जे गुरू सर्वत्यागी व एकाच ठिकाणी वास न करणारे असतात त्यांना सेवेची आवश्यकता फार कमी असते. परंतु जे गुरू संसारी गृहस्थ आहेत अथवा मठादिक करून एका निर्दिष्ट ठिकाणी राहतात अशा पुरुषांना परस्परांच्या सहायतेची आवश्यकता असते. म्हणून शास्त्रात गुरुसेवा करण्याबद्दल सांगितले आहे. पूर्वी वसिष्ठादि मुनी व याज्ञवल्क्यादि योगी गृहस्थाश्रमी गुरू होते. वर्तमानकाळी बहुतकरून साधनसंपन्न शक्तिमान गुरूच मिळू शकतात. परंतु साधनमुक्त सिद्ध गुरू मिळणे अतीव दुर्लभ आहे. म्हणून दुर्बुद्धी न करिता ज्या गुरूचे आपण उपकृत आहोत त्याच्यावर प्रत्युपकार करणे अत्यंत आवश्यक आहे.

## गुरूचे कर्तव्य

वृथा परिश्रमस्तस्य निरयवैव केवलम् ।
शक्तिपात समायोगाद् ऋते तत्त्वानि तत्त्वतः ।
तद्व्याप्तिस्तद् विशुद्धिश्च ज्ञातुमेव न शक्यते ।।

**वायवीय संहिता अध्याय ११**

शास्त्रकथनानुसार आपल्या कल्याणाकरिता शिष्य गुरूला तन, मन, धन अर्पण करून ज्या वेळी केवळ त्यांचा कृपाकांक्षी होऊन राहतो त्या वेळी तो आपल्या

कर्तव्यापासून मुक्त होतो. परंतु गुरूचे हे मोठे कर्तव्य आहे की त्याने ही दीक्षाद्वारा आपल्या सामर्थ्याने शिष्याला कृतार्थ करावे. कारण एकवार शिष्याचे ग्रहण केल्यावर गुरूवर गुरुत्वाचा भार पडतो. म्हणून शिष्याकडून सेवा घेऊन जर गुरू त्याचा उद्धार करणार नाहीत तर तो महापापभाग शिष्याला मोक्ष प्राप्त होईपर्यंत त्याच्या मनाच्या व भोगाच्या गतीवर लक्ष ठेवून आवश्यकतेनुसार आपल्या आत्मसामर्थ्यानुसार त्याला साहाय्य करीत राहणे हे गुरूंचे परम कर्तव्य आहे. केवळ शिष्याला दीक्षा दिल्यानेच गुरूचे कर्तव्य संपत नाही. परंतु शिष्याला निर्विघ्नतापूर्वक त्याची अभीष्टसिद्धी ज्ञान प्राप्त करून देण्यानेच गुरूचे कर्तव्य निःशेष होते. हे कर्तव्यपालन करण्यासाठी गुरूच्या ठिकाणी शक्तिसंचार करण्याचे सामर्थ्य असले पाहिजे. कारण शिष्याच्या ठिकाणी शक्तिसंपात न झाला तर तत्त्वसमूहाचे यथार्थ स्वरूप, व्याप्ती व विशुद्धी यांचे वास्तविक ज्ञान कोणाही शिष्याला होणार नाही. हे प्रत्यक्ष सत्य आहे की ईश्वराची शक्ती गुरुद्वारा शिष्याच्या शरीरात प्रवेश करते त्या वेळी शिष्याच्या ठिकाणी शक्तिपाताने श्री महेश्वरकथित महायोगाचे ज्ञान स्वयंप्रकाशित होते.

शक्तिपातानुसारेण शिष्योऽनुग्रहमर्हति ।
शैवधर्मानुसारस्य तन्मूलत्वात् समासतः ।।
यत्र शक्तिर्न पतिता तत्र शुद्धिर्न जायते ।
न विद्या न शिवाचारो न मुक्तिर्न च सिद्धयः ।।
तस्माल्लिङगानि संवीक्ष्य शक्तिपातस्य भूयसः ।
ज्ञानेन क्रिययावाथ गुरुः शिष्यं विशोधयेत् ।।
योऽन्यथा कुरुते मोहात् स विनश्यति दुर्मतिः ।
तस्मात् सर्वप्रकारेण गुरुः शिष्यं परीक्षयेत् ।।

**वायवीय संहिता अध्याय १५**

याकरिता शैवधर्मात हे प्रत्यक्ष आहे की शिष्यामध्ये श्री महेश्वराच्या शक्तीचा प्रकाश हेच शिष्याच्या कल्याणाचे मुख्य कारण आहे. म्हणून शक्तिसंचारानुसारच शिष्याला फललाभ होतो. शक्तिपात झाला नाही तर शिष्याला बुद्धी (शुद्धी) व विद्या यांची प्राप्ती होत नाही. तसेच शैवधर्माचा आचार अष्टांग योगही प्राप्त होत नाही. ज्या ठिकाणी शक्तिपात होत नाही त्या ठिकाणी मुक्तिलाभही होत नाही. अगर कोणत्याही प्रकारच्या धर्मकर्माची सिद्धी होत नाही. म्हणून गुरूने शिष्याला दीक्षा देऊन शक्तिपाताने होणाऱ्या नाना प्रकारच्या योगक्रिया तसेच आनंद व प्रबोध ही लक्षणे शिष्याचे ठिकाणी होतात किंवा नाही हे पहावे. जर होत नसतील तर प्रयत्नपूर्वक अनुभव आणून

दिला पाहिजे. जे त्या योगाने शिष्याला आत्मप्रतीती, गुरुवाक्य व शास्त्र यांचे निःसंदेह भ्रांतिरहित ज्ञान होईल, हे गुरूने वारंवार पाहिले पाहिजे व शिष्याच्या स्वाधीन करून दिले पाहिजे. म्हणजे त्या योगाने त्याचे त्याला नेहमी ज्ञान राहील. म्हणून गुरूचे हे कर्तव्य आहे की ज्ञानाने अथवा योगक्रियांनी शिष्याच्या अंतःकरणाची शुद्धी करून त्याच्या ठिकाणी ज्ञानयोग प्रकाशित करावा. जोपर्यंत शिष्याचे ज्ञान स्वयमेव प्रकाशित होत नाही व योगाच्या क्रिया आपोआप होत नाहीत तोपर्यंत गुरूचे गुरुत्व सिद्ध होत नाही. शक्तिसंचाराचे सामर्थ्य असून शिष्याची सेवा घेऊन मोहाने अथवा प्रमादाने शिष्याच्या संपूर्ण शक्तीचा विकास न करताच व शिष्याचे मन तुष्ट न करिता जो गुरू शिष्याला सोडून देतो त्याचा नाश होतो. म्हणून सद्गुरूने पुढे सांगितलेल्या लक्षणांनी शिष्याची परीक्षा करून त्याच्या मनाला संतोष उत्पन्न करावा.

लक्षणं शक्तिपातस्य प्रबोधानन्दसंभवः ।<br>
सा यस्मात् परमाशक्तिः प्रबोधानन्दरूपिणी ।।<br>
आनन्दबोधयोर्लिङ्गम् अन्तः स्फुरणविक्रिया ।<br>
यया स्युः कम्परोमाञ्चस्वरनेत्रादिविक्रियाः ।।<br>
शिष्योऽपि लक्षणैरेभिः कुर्याद् गुरुपरीक्षणम् ।<br>
तत्सम्पर्के शिवार्चादौ स्वगतैर्वाथतद्गतैः ।।

श्री शंभूच्या शक्तिपाताचे हे लक्षण आहे की शिष्याच्या ठिकाणी बोध उत्पन्न होतो. कारण ही परमाशक्ती आनंद व प्रबोध स्वरूपिणी आहे. प्रबोध व आनंद याच्या योगाने शिष्याचे ठिकाणी अंतःस्फुरण विक्रियतेने हठयोग, मंत्रयोग, लययोग आदि नाना प्रकारच्या योगक्रिया तसेच कंप, रोमांच आणि स्वरनेत्रादि अंतविक्रिया होऊ लागतात. म्हणून शिष्यही याच लक्षणांनी समर्थसंपन्न गुरूची परीक्षा करू शकतो व गुरू सामर्थ्यसंपन्न किंवा सामर्थ्यहीन आहे हेही समजू शकतो. तो आपल्या ठिकाणी शक्तीचा संचार झाला किंवा नाही हे समजून निश्चिंत होतो. आणि गुरूही शिष्याच्या ठिकाणी परमेश्वरकृपेची ही बाह्याभ्यंतरलक्षणे पाहून व क्रिया पाहून निश्चिंत होतात. ईश्वरी शक्ती गुरुद्वारा शिष्यामध्ये संचारित झाल्याने शिष्याला एक प्रकारचे अपूर्व ज्ञान व निर्विषय परमानंद सुखाचा अनुभव येतो. हे लक्षण श्रेष्ठ व शेवटले आहे. म्हणून प्रत्येक साधकाला तत्काळ याचा बरोबर अनुभव येईलच असे नाही. परंतु अंतःस्फुरणरूप नानाविध आंतरिक आभ्यंतरिक क्रियांचा अनुभव येतो. त्यांच्यात प्रबोध व आनंद यांचे मिश्रण असते व त्याच्या योगाने शिष्याला आपल्या शरीरात कोणत्याही शक्तीने प्रवेश केला आहे असा अनुभव येतो. त्याच्या योगाने विद्युत स्पर्शाप्रमाणे स्फुरणाची चमक अनुभवाला येते आणि

कंप, रोमांच, स्वरभंग, नेत्रविकृती व डोक्याचे केस कंप पावू लागतात. अथवा शरीर तुटल्याप्रमाणे वाटू लागते किंवा जड होते. हातपाय ढिले होतात. मूलाधार, पाठ, हृदय व मस्तकात जडपणा आल्याचा अनुभव येतो. शरीर हालू लागते व इच्छाशक्ती सोडून दिल्याबरोबर जमिनीवर पडते व शरीरद्वारा नाना प्रकारच्या क्रिया होऊ लागतात. श्वास प्रश्वास वाढतात, किंवा झोपेसारखी अवस्था होऊन चित्त किंकर्तव्यविमूढ होते. शरीरात मुंग्या आल्याचा अनुभव येतो किंवा शरीर शून्य होते. मन व प्राण निष्क्रिय होतात. अथवा शरीरात उष्णता वाढते. निद्रा किंवा मूर्च्छेसारखी अवस्था होते. अथवा डोक्यात चक्कर येऊ लागते. भांग प्याल्याप्रमाणे कैफ चढतो व मनाचे संकल्प पुष्कळसे कमी होतात. अथवा अत्यंत स्फूर्ती येते व तिच्या योगाने साधक आनंदावेशात येऊन नाना प्रकारच्या योगक्रिया करू लागतो.

ही अव्यक्त शक्तिसंचाराची बाह्य व आभ्यंतरिक लक्षणे साधारणपणे आरंभीच्या शक्तिपाताच्या पहिल्या अगर दुसऱ्या अगर तिसऱ्या दिवशी प्रकाशित होतात. परंतु ही गोष्ट गुरूचे पूर्ण सामर्थ्य व कृपा व शिष्याची गुरुभक्ती व सुसंस्कार यावर अवलंबून असते. कारण या दीक्षाकार्यात सर्व गुरू सारखे सामर्थ्ययुक्त असत नाहीत, शिष्यही सुसंस्कारी असत नाहीत. म्हणून क्रियाशक्तीच्या विकासाला कमीअधिक समय लागतो. म्हणून दीक्षेनंतर तत्काळ शिष्याचे ठिकाणी क्रियाशक्तीचा विकास न झाला तथापि निराश होण्याचे कारण नाही. कारण जर शिष्याला ध्यानादिकालांत गुरुशक्तीचा थोडा जरी अनुभव आला असला तर आपल्या ठिकाणी त्या शक्तीचा विकास अवश्य होईल असे शिष्याने समजावे. याप्रमाणे शिष्याने आपल्या ठिकाणी अथवा गुरूच्या ठिकाणी शक्तीचा विकास पाहून शिष्याने आपल्या साधनात निश्चिंत रहावे. दीक्षेनंतर अधिकाधिक एक वर्षपर्यंत शिष्याने गुरुशक्तीच्या प्रकाशाची प्रतीक्षा करावी असे शास्त्रात सांगितले आहे.

बहुनात्र किंमुक्तेन योऽपि कोऽपि शिवाश्रयः ।
संस्कारो गुर्वाधीनश्चेत संस्क्रिया तु प्रतिपद्यते ।।
श्रीगुरौ निश्चला भक्तिवर्धते हि यथा यथा ।
तथा तथास्य विज्ञानं वर्धते कुलनायिके ।।

**वायवीय संहिता तथा कुलार्णव तंत्र**

या विषयासंबंधी या ठिकाणी अधिक सांगण्याची आवश्यकता नाही. कारण जो कोणी मनुष्य शिवशक्तीचा आश्रय घेतो, अर्थात श्री महेश्वराच्या शक्तीने दीक्षित होतो त्याला दीक्षा देण्याचे पूर्ण सामर्थ्य शक्तिमान गुरूमध्ये असते. गुरू शक्तिसंचारही करतात. परंतु अधिकारी भेदाने शिष्याच्या ठिकाणी क्रियेचा प्रकाश भिन्न भिन्न प्रकारचा

होतो म्हणून सर्व साधकांच्या क्रिया एकसारख्या होत नाहीत. जशी जशी शिष्याची गुरूवरील निश्चल भक्ती वाढत जाईल तसा तसा शिष्याच्या ठिकाणीही शक्तीच्या योगक्रियेचा विकास (प्रकाश) वाढत जाईल व त्यायोगे त्याचे विज्ञानही वाढत जाईल.

यस्य जन्मान्तरे पापकर्मबाधादिका भवेत् ।
न तस्य गुरुकारुण्यं कुलज्ञानं न जायते ।।

परंतु जर दुर्भाग्यवशात् एखाद्या शिष्याला पूर्व जन्मात केलेल्या पापाने बाधा उत्पन्न झाली तर त्याला गुरुकृपेचा लाभ होत नाही व कुंडलिनी जागृतीचे फळ ज्ञानही प्राप्त होत नाही.म्हणून त्याने प्रथमच याचा परिहार केला पाहिजे. याचकरिता क्रमदीक्षेचे विधान आहे. परंतु गुरू काय वाटेल ते करू शकतात यातही मुळीच संशय नाही.

अपात्रेभ्यः प्रदत्ता च दीक्षा साऽपि महेश्वरि ।
मनोव्यापारमात्रेण निर्वीर्या भवति ध्रुवम् ।।
मोहेन वाऽथ लोभेन दीक्षामनधिकारिणे ।
यो दद्यात्स दरिद्रः स्यात् शिष्यः स्याद्दुःखभाजनम् ।।

**योगिनी तंत्र तथा मेरुतंत्र**

परंतु ही मानसिक दीक्षा अनाधिकाऱ्याला दिल्याने निर्वीर्य होते. तिचे निश्चित फल उत्पन्न होत नाही. म्हणून गुरूने असे करू नये. तथापि जर कोणी गुरू मोहाने अथवा धनमानादिकाच्या लोभाने अनधिकारी शिष्याला दीक्षा देईल तर तो दरिद्री होऊन दुःखी होईल व दीक्षा घेणारा शिष्यही दुःखभागी होईल.

## योगसाधनार्थ आसन स्थापन

तूलकम्बलवस्त्राणां सिंहव्याघ्रमृगाजिनम् ।
कल्पयेदासनं धीमानं सौभाग्यज्ञानवर्द्धनम् ।।
कृष्णाजिने ज्ञानसिद्धिः मुक्तिः स्याद्व्याघ्रचर्मणि ।
वस्त्रासने व्याधिनाशः कम्बलं दुःखमोचनम् ।।

**कुलार्णव तंत्र, संमोहन तंत्र, तथा गंधर्वतंत्र**

योगसाधन करणाऱ्या साधकांनी आसनाशिवाय ध्यान, भजन करू नये. याकरिता आपल्या निर्दिष्ट स्थळी आसन घालून साधन करण्याचे विधान आहे. म्हणून बुद्धिमान साधकाने आपल्या सौभाग्य व ज्ञानवृद्धीकरिता कापूस, लोकर अथवा व्याघ्र किंवा हरिण यांचे चर्म आसनाकरिता उपयोगात आणावे. कृष्णमृगचर्माच्या आसनावर बसून ध्यानधारणा करण्याने ज्ञान सिद्धी होते. सिंह किंवा व्याघ्र चर्मावर बसून समाधीचा अभ्यास केल्याने मोक्षप्राप्ती होते. कंबलासनावर

बसून भजन, जप, तप, पूजन केल्याने दुःखनिवृत्ती होते आणि वस्त्रासनावर बसण्याने व्याधिनाश होतो.

धरण्यां दुःखसम्भूतिर्दौभाग्यं दारुजासने ।
वंशासने दरिद्रः स्यात्पाषाणे व्याधिपीडनम् ।।
तृणासने यशो हानिः पल्लवे चित्तविभ्रमः ।
जपध्यानतपोहानि जायते वसनासने ।।
नादीक्षितो विशेज्जातु कृष्णाजिनासने गृही ।
विशेद्यतिर्वनस्थो वा ब्रह्मचारी च भिक्षुकः ।।
मृद्वासने यदा मन्त्री चैलाजिन कुशोत्तरे ।।

तसेच आसनाशिवाय नुसत्या जमिनीवर बसून भजन, पूजन, जप, ध्यान केल्याने दुर्भाग्य प्राप्त होते. बांबूच्या आसनावर बसल्याने दारिद्र्य व दगडावर बसल्याने पीडा व रोगाची प्राप्ती होते. गवतावर बसल्याने यशोहानी होते. तसेच पल्लवासनावर (ताडाच्या पानाची चटई वगैरे) बसल्याने भ्रांती उत्पन्न होते. केवळ वस्त्रासनावर बसून साधन केल्याने जप, ध्यान, तपादिकांचा नाश होतो. दीक्षाहीन व गृहस्थाश्रमी मनुष्याने कृष्णाजिनावर बसू नये. ते केवळ यती, वानप्रस्थ, ब्रह्मचारी व संन्यासी यांच्याकरिता आहे. पुरश्चरण अथवा मंत्रानुष्ठान करण्याकरिता कुशासन, त्यावर मृगचर्म व त्याच्यावर मऊ रेशमी वस्तर अथवा मृदुकम्बल घालून त्यावर बसावे.

कुशासने मृगाजिने व्याघ्राजिने च कम्बले ।
स्थलासने समासीनः प्राङ्मुखो वाप्युदङ्मुखः ।।
नाडीशुद्धिः समासाद्य प्राणायामं समभ्यसेत् ।।

**घेरंड संहिता पंचम उपदेश**

योगाभ्यासाकरिता कमीत कमी सहा सात हात व अधिकात अधिक दहाबारा हात लांबरुंद अशी साफसूफ केली गेलेली खोली असावी. तिच्यात जल, अग्नी अथवा ज्यापासून त्रास होईल असे दुसरे सामान ठेवू नये. दर्शनीय देवता किंवा साधनोन्नत सिद्ध पुरुषांच्या चित्रांनी ती जागा सुशोभित करावी. तसेच ती जागा धूपदीपादिकांच्या योगाने सुगंधित राखावी. तिच्या मध्यभागी जमिनीवर दर्भासन, मृगासन अथवा कंबलासन घालून त्यावर उत्तराभिमुख अथवा पूर्वाभिमुख बसावे. गुरू आणि ईश्वराला प्रणाम करून प्रथम नाडीशुद्धीच्या क्रिया करून मग प्राणायाम केला पाहिजे.

# ✦ एकादश प्रकाश ✦

## दीक्षायोग प्रत्यक्ष प्रमाण आहे.

परोक्षमपरोक्षश्च द्विविधं ज्ञानमिष्यते ।
परोक्षमस्थिरं प्राहुः अपरोक्षं तु सुस्थिरम् ।।
हेतुपदेशगम्यं यत् तत् परोक्षं प्रचक्षते ।
अपरोक्ष पुनः श्रेष्ठादनुष्ठानात् भविष्यति ।।
नापरोक्षादृते मोक्ष इति कृत्वा विनिश्चयम् ।
श्रेष्ठानुष्ठान सिद्ध्यर्थं प्रयतध्वमतन्द्रिता ।।

**वायवीय संहिता अ. ३१**

पूर्वीच सांगितलेले आहे की ज्ञान शास्त्रसिद्ध परोक्ष व साधन सिद्ध अपरोक्ष असे दोन प्रकारचे आहे. शास्त्रसिद्ध परोक्ष ज्ञान अस्थिर असते. जे अस्थिर असते ते नाहीसे होऊ शकते व बदलूही शकते किंवा निराळ्या रूपात परिणत होऊ शकते व त्यापासून चित्ताला वास्तविक समाधान प्राप्त होत नाही. परंतु साधनसिद्ध अपरोक्ष ज्ञान सुस्थिर व प्रत्यक्ष असते. ते एकवार प्राप्त झाले असता कधीही जात नाही व बदलतही नाही आणि त्याच्या योगाने चित्ताला पूर्ण तृप्तीचा लाभ होतो. जे ज्ञान शास्त्रावरून युक्तिद्वारा अथवा दुसऱ्यांच्या उपदेशाने प्राप्त होते त्याला परोक्षज्ञान म्हणतात. आणि जे ज्ञान श्रेष्ठ योगानुष्ठानापासून स्वतः उत्पन्न होते त्याला अपरोक्ष ज्ञान म्हणतात. सर्व जाणणाऱ्या ज्ञानी लोकांचे व वेदाचे असे निश्चित सांगणे आहे की अपरोक्ष ज्ञानाशिवाय मोक्ष मिळत नाही. व हे प्रत्यक्ष अपरोक्षज्ञान योगाच्या अनुष्ठानाशिवाय प्राप्त होत नाही. म्हणून योगसाधन करणे परम कर्तव्य आहे. आणि या श्रेष्ठ अनुष्ठानाच्या सिद्धीकरता प्रमादरहित होऊन योगसाधना करीत राहिले पाहिजे.

तत्त्वं विज्ञानमानन्दं ब्रह्म ब्रह्मविदो विदुः ।
हेतुदृष्टान्तरहितं वाङ्मनोभ्यामगोचरम् ।।
अनुष्ठानं विना मूढो वृथा ब्रह्मणि मोदते ।
प्रतिबिम्बित शाखाग्रफलास्वादनमोदवत् ।।

**स्कंद पुराण तथा मैत्रेय उपनिषद्**

परमतत्त्वाला जाणणारे ज्ञानी लोक सांगतात की विज्ञान, आनंद, ब्रह्म हेच तत्त्व आहे. ते हेतू व दृष्टांतरहित असून मन वाणीच्या पलीकडचे आहे. अर्थात जे विज्ञान प्रत्यक्षस्वरूप, आनंदस्वरूप, पूर्णब्रह्मस्वरूप आणि सर्वव्यापी तत्त्वस्वरूप

आहे ते मन वाणीचा विषय नाही. केवळ योगसाधनाने अपरोक्षानुभवज्ञानगम्य आहे. म्हणून युक्ती तर्कदृष्टांतद्वारा आपल्या मनानेही ते समजत नाही व वाक्यद्वारा दुसऱ्यालाही समजून देता येत नाही. परंतु जे लोक योगसाधनाचे अनुष्ठान न करता आपणाला ब्रह्मज्ञानी समजतात, ते मूढ लोक वृक्षाच्या शाखेच्या अग्रभागी लागलेल्या फळाच्या प्रतिबिंबाच्या आस्वादनाप्रमाणे ब्रह्मज्ञानाचा वृथा आनंद घेतात. त्यांना ब्रह्मज्ञानाचे वास्तविक फळ मिळत नाही.

स्वस्यविद्याबन्ध सम्बन्ध मोक्षात्
सत्यज्ञानानन्दरूपात्मलब्धौ ।
शास्त्रं युक्तिर्देशिकोक्तिः प्रमाणं
चान्तःसिद्धा स्वानुभूतिः प्रमाणम् ।।
प्रत्यक्षं च प्रमाणाय सर्वेषां प्राणिनां प्रिये ।
उपलब्धिवशात्तस्य हताः सर्वे कुतार्किका ।।
परोक्षे कोऽनुजानीते कस्य किंवा भविष्यति ।
यद् वै प्रत्यक्षफलदं तदेवोत्तमदर्शनम् ।।

**विवेक चूडामणि तथा कुलार्णव तंत्र**

आपल्याला अविद्यासंबंधी बंधनापासून सुटण्याला सत्यज्ञानस्वरूप आणि आनंद आत्म्याची (सत्य, ज्ञान आणि आनंद स्वरूप आत्म्याची) प्रत्यक्ष प्राप्ती करून घेतली पाहिजे. हे आत्मज्ञान प्राप्त करून घेण्याची शास्त्र, युक्ती, गुरुवाक्य व आपला स्वतःचा अनुभव अशी चार प्रमाणे मानली जातात. असेच सर्व शास्त्रांचे सांगणे आहे. म्हणून व्यवहारात प्रत्यक्ष, अनुमान व शास्त्र या तीन प्रमाणांनी लोक तत्त्वनिश्चय करतात. जो विषय प्रत्यक्ष नाही त्याला तर्क, युक्ती, शास्त्रद्वारा तथा अनुमानाने सिद्ध करून मानतात. परंतु शास्त्र किंवा अनुमान प्रमाण यांच्या अपेक्षेने (अपेक्षेपेक्षा) प्रत्यक्ष प्रमाण सर्वांनाच अधिक मान्य आहे. कोणताही विषय ज्या वेळी प्रत्यक्ष अनुभवाला येतो त्या वेळी युक्ती, तर्क, वितर्क, वादवितंड करणारे सर्व कुतार्किक लोक निरस्त होतात. कारण जो विषय परोक्ष आहे त्याचे काय होईल कोणी सांगावे ? म्हणून जे प्रत्यक्ष फळ देते तेच उत्तम दर्शन हे योगशास्त्र प्रत्यक्ष प्रमाण आहे. म्हणून प्रत्यक्ष प्रमाणापुढे दुसऱ्या कोणत्याही प्रमाणाची आवश्यकता रहात नाही.

## गुरुदीक्षा

दीक्षा च द्विविधा प्रोक्ता बाह्याभ्यन्तरभेदतः ।
क्रियादीक्षा भवेदबाह्या वेधारव्याभ्यन्तरी मता ।।

द्विधा दीक्षा साधारा च निराधारा तथैव च ।
नित्ये नैमित्तिके काम्ये यस्याश्चैवाधिकारिता ।।
साधारा सा च संप्रोक्ता निराधारा च मुक्तिदा ।
निर्मला सा च विज्ञेया कथ्यते तत्त्वचिन्तकैः ।।

**कुलार्णव तंत्र तथा योगिनी तंत्र**

बाह्य व अभ्यंतर अशी दोन प्रकारची दीक्षा आहे. धर्म, अर्थ व काम यांच्या प्राप्तीकरता हवन, जप, देवार्चन, पुरश्चरण इत्यादी नाना प्रकारच्या क्रियांनी होणारी शास्त्री, होत्री, क्रियावती, वर्णमयी आणि क्रमदीक्षा इत्यादी ज्या दीक्षा आहेत त्यांना बाह्यदीक्षा म्हणतात व त्यामध्ये जप, तप, हवन इत्यादी परिश्रमसाध्य क्रियाकर्म केले जाते. परंतु शांभवी, शक्ती, योग आणि वेध इत्यादी दीक्षांना आभ्यंतरिक दीक्षा म्हणतात. व त्यात बाह्य अवडंबराची कोणती परिश्रमसाध्य क्रिया करावी लागत नाही. या दीक्षा गुरूच्या आत्मसामर्थ्याने व कुंडलिनीच्या जागरणाने होतात. त्यांच्या क्रिया आयासरहित असून त्यापासून मोक्षप्राप्ती होते. अधिकारी भेदाने दीक्षा साधारा व निराधारा अशी दोन प्रकारची ही मानली गेली आहे. नित्य, नैमित्तिक आणि काम्यकर्म संपादन करण्याकरिता जी दीक्षा घेतली जाते अर्थात संध्यादि नित्यकर्माकरिता उपनयन, संस्कारदीक्षा तसेच शत्रुनाशाकरिता किंवा दुसऱ्याला वश करून घेण्याकरिता यज्ञादि कर्म करण्याची दीक्षा अथवा यश, धन, ऐश्वर्य कामनासिद्धीकरता घेतली जाणारी दीक्षा साधारा म्हटली जाते. इच्याच (हिच्याच) योगाने धर्म, अर्थ व कामनेची सिद्धी होते. परंतु ही बाह्य दीक्षा मोक्ष देऊ शकत नाही. मोक्ष देणारी निराधारा आभ्यंतरिक दुसरी दीक्षा आहे. तत्त्वचिंतन करणाऱ्या ज्ञानी महात्म्याचे असे सांगणे आहे की या निराधारा आंतरिक दीक्षेलाच निर्मल, पवित्र मोक्ष देणारी समजली पाहिजे. ही आभ्यंतरिक दीक्षा कोणत्याही बाह्य स्थूल वस्तूची अथवा कोणत्याही बाह्य क्रियाकर्माची अपेक्षा करीत नाही. ही केवळ गुरुशिष्यांच्या मानसिक व्यापाराने संपन्न होते. म्हणून इला (हिला) निराधारा म्हणतात. याच दीक्षेच्या योगाने गुरू शिष्याच्या ठिकाणी शक्तिसंचार करतात.

गुरोरालोकनादेव स्पर्शात् संभाषणादपि ।
यस्य संजायते ह्याज्ञा तस्य नास्ति पराक्रिया ।।
मनसा यस्तु संस्कारः क्रियते योगवर्त्मना ।
स नेह कथ्यते गुह्यो गुरुवक्त्रैक गोचरः ।। **वायवीय संहिता अ. १५**

ज्या दीक्षेच्या द्वारा गुरू शिष्यांमध्ये शक्तिसंचार करतात, जिच्या योगाने सर्व प्रकारच्या योगांचे साधन होते ती सूक्ष्म महाशक्ती चैतन्यरूपी शैवी शक्ती आहे. ती गुरुपरंपरेने शिष्यामध्ये येते व चैतन्यरूपाने स्पष्ट प्रकाश पावते. त्या वेळी ती शक्ती आज्ञा नाम पावते. ज्याप्रमाणे स्वामी आपल्या सेवकास आज्ञा करतो व तो स्वामीचे आज्ञेनुसार आवश्यक कामकाज करतो त्याचप्रमाणे शिष्यही गुरूच्या संचारित शक्तीचा संकेत - आज्ञा प्राप्त करून घेऊन आत्मज्ञानाकरिता आवश्यक क्रियाकर्म करू लागतो. गुरूच्या दृष्टीने, स्पर्शाने, वाक्याने अथवा मनाने ज्या शिष्याला गुरूची आज्ञा शक्ती प्राप्त होते त्याला आपल्याकडून आपल्या कल्याणाकरिता जप, तप, प्राणायाम, धारणा, ध्यान आदि काहीही करण्याची आवश्यकता नाही. ज्याप्रमाणे मालक आपल्या नोकराला आपल्या आज्ञेनुसार काम करण्याला सांगतो, सेवकाच्या इच्छेनुसार सांगत नाही, सेवकही स्वामीच्या आज्ञेनुसारच सर्व कर्म करतो. त्याचप्रमाणे शिष्यही गुरूच्या आज्ञेनुसारच त्याच्या शक्तीने सर्व क्रिया करू लागतो. आपल्या इच्छेने क्रिया करीत नाही. सेवकाला स्वामीची आज्ञा पालन करणे हे कर्तव्य आहे. तसेच शिष्याने आपल्या ज्ञान, ध्यानाचा त्याग करून गुरूच्या आज्ञाशक्तीला कार्यात परिणत करावयाचे असते. गुरूच्या आज्ञाशक्तीहून श्रेष्ठ असे शिष्याला कोणतेच क्रियाकर्म नाही असा पाशुपत महायोगाचा सिद्धांत आहे. म्हणून पाशुपत योगसाधन करणाऱ्या साधकाला गुरूच्या आज्ञेशिवाय दुसरे कोणतेही साधन करण्याची आवश्यकता नाही. ज्या गुरूची आज्ञाशक्ती सर्व काही करीत आहे त्यात आपली बुद्धी चालवण्याने अथवा आपल्या इच्छेने भलतेच साधन करण्याने अनर्थ होतो. म्हणून ज्या भाग्यवान साधकांना अशा समर्थ गुरूपासून दीक्षाद्वारा गुरूची आज्ञाशक्ती प्राप्त झाली आहे त्यांनी समजले पाहिजे की गुरूची आज्ञा सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे व ती न मानणे म्हणजे आपले अनिष्ट करणे होय. गुरूच्या योगशक्तीने अथवा त्याच्या मनाने शिष्याला निराधारा आंतरदीक्षा होते. तिच्यामध्ये साधक अत्यंत आश्चर्यकारक घटना पाहतो, ऐकतो व सांगतो. त्या सर्वांचा भेद एक श्रीगुरूच जाणण्याला समर्थ आहे. या गोष्टी गुप्त असल्याने सांगणे योग्य नाही. म्हणूनच शास्त्रात गुप्त ठेवल्या आहेत. या ठिकाणी केवळ आवश्यक सामान्य भेद मात्र सांगितला आहे. या विषयी कोणाला अधिक समजून घेण्याची इच्छा असल्यास त्यांनी आपल्या गुरूपासून समजून घ्यावे.

## सद्‌गुरुकृपा

मूलाधारेषु या नित्या कुण्डली तत्त्वरूपिणी ।
सूक्ष्मातिसूक्ष्मा परमा विसतन्तु - स्वरूपिणी ।।

विद्युत्पुञ्ज- प्रतिकाशा कुण्डलीकृत रूपिणी ।
परब्रह्मगृहिणी पञ्जाशद् वर्ण रूपिणी ।।
शिवस्य नर्तकी नित्या परब्रह्म प्रपूजिता ।
ब्राह्मण:सैव गायत्री सच्चिदानन्द रूपिणी ।।
तद् भ्रमावर्तवातोऽयं प्राणात्मा नित्यनूतना ।
नित्यं तिष्ठतु सानन्दा कुण्डली तव विग्रहे ।।

**आगम संदर्भ – ज्ञान दर्पण**

दीक्षेच्या वेळी ज्या गुरूच्या ठिकाणी शिवाचे अधिष्ठान असते व जो गुरू श्रीमहेश्वराच्या अधिष्ठानाचा आश्रय करून व प्रसन्न होऊन शिष्याला आज्ञाशक्ती व आशीर्वाद देतो की तुझ्यामध्ये जी शक्ती मूलाधारात नित्य निवास करते, जिच्या बोधाने तत्त्वज्ञानाचा उदय होतो, जी तत्त्वज्ञान देणारी, तत्त्वस्वरूप, पद्मतन्तुवत्, सूक्ष्मातिसूक्ष्म परमाशक्ती कुंडलिनी महादेवी आहे. जिचे रूप कोटी विद्युतपुंजासारखे आहे, जी परब्रह्म परशिवाची पत्नी आहे, व अ पासून क्ष पर्यंत पन्नास अक्षर रूपिणी आहे, जी शंकराच्या प्रसन्नतेकरिता सदा नृत्य करते, तीच तुमच्याकडून योग, ज्ञान व ध्यानाच्या क्रिया करवते. जिच्या कृपेने तुमच्या सर्व अभीष्टांची सिद्धी होते, जी योगाचे परमैश्वर्य प्रदान करते. उपासना करण्याला योग्य, सच्चिदानंदस्वरूपिणी ब्रह्म गायत्री कुंडलिनी देवी आमच्या गुरुपरंपरेच्या आशीर्वादाने तुमच्या ठिकाणी सर्वदा जागृत राहो व तुला नित्य नूतन नाना प्रकारच्या योगक्रिया व दिव्य अनुभव करवीत (करीत आहे) राहो. तिच्या योगाने तुझे शरीर, मन व प्राण स्वस्थ व सुदृढ होवो. तसेच संसारात रहात असताही आपले परम कल्याण सुखपूर्वक प्राप्त होवो.

शिवशक्तिपरां पूजा योगेनैव समाचरेत् ।
मन्त्रोदकैर्विना सन्ध्यां पूजाहोमैर्विना जपम् ।।
उपचारैर्विनायोगं योगी नित्यं समाचरेत् ।
यमादि नियमैः पुष्पैः आत्मैकादशभिः परैः ।।
दशदिक्षु तथा मध्ये यजेत् परमेश्वरम् ।
ध्यानिनां हि वपुः सूक्ष्मं भवेत्प्रत्यक्षमैश्वरम् ।।
ध्यानयज्ञरतास्तस्मात् देवान् पाषाणमृण्यान्
नात्यन्तं प्रतिपद्यन्ते शिवयथात्म्यवेदनात् ।।

**कुलार्णव तंत्र धर्म संहिता तथा वायवीय संहिता**

याप्रमाणे गुरूचा आशीर्वाद व आज्ञाशक्ती प्राप्त करून घेऊन जो साधक योगसाधना करतो तो साधक योगाच्या द्वारानेच अंतरात शिवशक्तीचे पूजन करतो. त्याची मंत्राशिवाय व पाण्याशिवाय संध्या होते. अर्थात सुषुम्ना चालते – तो पूजा व होम यांच्याशिवाय जप करतो, त्याचा जप स्वतः होतो – त्याचप्रमाणे घृत, समिधा इत्यादी हवनाच्या सामग्रीशिवाय तो नित्य यज्ञ करतो. त्याचे पाच यम व पाच नियम मिळून दहा व अकरावे मन मिळून – अकरा पुष्पांनी दशदिशांमध्ये तसेच आपल्या शरीरात तो एका परमेश्वराचेच पूजन करतो. याप्रमाणे ईश्वराची सर्वत्र पूजा करणाऱ्या योगध्यानपरायण साधकाच्याजवळ ईश्वराचे ज्योतिर्मय सूक्ष्म शरीर प्रत्यक्ष प्रकट होते म्हणून साधक गुरुशक्तीच्या ध्यानरूप यज्ञात मग्न राहतो व त्याला शिवाच्या वास्तविक ज्योतिर्मय स्वरूपाचे प्रत्यक्ष दर्शन होते. तो काष्ठ, पाषाण, मृत्तिकेपासून तयार केलेल्या देवांचे ध्यान अथवा आश्रय करीत नाही. कारण जे लोक शिवाच्या वास्तविक स्वरूपाला यथातथ्य जाणतात ते बाहेरच्या स्थूलरूप देवी देवतांचे भजनाचा सर्वदा अंतरापासून त्याग करतात.

श्रुणु देवि प्रवक्ष्यामि योगयोगीशलक्षणम् ।
तस्य श्रवणमात्रेण योगः साक्षात् प्रकाशते ।।
सम्मोदः परमानन्दः पतनं गायनं तथा ।
वेणुवीणादिवाद्यश्च कवितारचनादिकम् ।।
रोदनं भाषणचैव समुत्थानं विजृम्भणम् ।
गमनं विक्रिया देवि योग इत्याभिधीयते ।।
विकृतिं मनसो हित्वा यदोल्लासः प्रवर्तते ।
तदा तु देवताभावं भजन्ते योगिपुङ्गवाः ।।

**कुलार्णव तंत्र अष्टम उल्लास**

श्री महेश्वर सांगतात हे देवी, आता तुला वास्तविक योग सांगतो. गुरूच्या शक्तिपाताने शिष्याची अंतरशक्ती कुंडलिनी देवी जागृत होते आणि क्रिया करू लागते. त्या वेळी शिष्याच्या मन, प्राण आणि शरीरात नाना प्रकारच्या बाह्य व आभ्यंतरिक कंपनादि क्रिया होऊ लागतात. शिष्याच्या कोट्यवधी जन्मातील संस्कार छिन्नभिन्न होऊन नाना प्रकारची रूपे धारण करतात. त्याच्या योगाने साधकाला जन्मांतराची अस्पष्ट स्मृती होते अथवा नाना प्रकारच्या योनीतील सुखदुःखाचे भान होते आणि त्या कारणाने तो पशुपक्षी इत्यादिकांच्या शब्दाप्रमाणे भयसूचक शब्द करतो. अथवा आल्हादित होऊन हसतो, रडतो, तसेच भावपूर्ण आवेशात येऊन महाआनंदित होऊन परमप्रसन्नता प्राप्त करून घेतो. व त्या आवेशात जमिनीवर पडून गडबडा लोळतो. अथवा आनंदात येऊन

गाऊ लागतो. तसेच वेणु, वीणा, मृदंग इत्यादी वाद्यांचे मुखाने शब्द करून अनुकरण करतो. त्याच्याच बरोबर कवितादिकांची रचना करतो. कधी रडू लागतो अथवा आपल्याशीच बोलू लागतो, भाषण करू लागतो. अथवा नाना प्रकारच्या चेष्टा करू लागतो. जांभया देऊ लागतो. घरात इकडे तिकडे फिरू लागतो, याप्रमाणे गुरुकृपेने कुंडलिनी शक्ती जागृत झाल्याकारणाने अशा प्रकारच्या मन प्राणाच्या विक्रिया होऊन जे साधन होते, त्यालाच वास्तविक योग म्हणतात. या योगात होणाऱ्या क्रियांची संख्या व त्यांच्या स्वरूपांचे वर्णन करणे हे मानवी बुद्धीच्या पलीकडचे काम आहे. तथापि या महायोगाचे विज्ञान साधक केवळ आपल्या श्रद्धेने समजून घेतो. साधक आनंदोल्लासात येऊन इतके विचित्र व्यापार आसन, प्राणायाम, बन्ध, मुद्रादि अशा विचित्र व नाना प्रकारच्या योग क्रिया इत्यादी करतो. तथापि त्याचे मन पराधीन व ज्ञानशून्य होत नाही. साधकाचे ज्ञान पूर्ववत् शाबूत असते. आनंदमदाने उत्साहित होऊन जाते. अंतरशक्तीच्या प्रेरणेने क्रिया करू लागते. त्या अवस्थेतही त्याच्यावर काही बलात्कार होत नाही. साधकाची बुद्धी निश्चल राहते. संकल्पमात्राने तो सर्व क्रियांपासून निवृत्त होऊन पूर्ववत् आपल्या अवस्थेवर येतो. याप्रमाणे ज्या वेळी मन उल्हासाला प्राप्त होऊन सर्व क्रिया करू लागते व विकृत होत नाही त्या वेळी साधक योगी दिव्य भावास प्राप्त होतो.

उन्मनाः पतनोत्थाने मूर्छना च मुहुर्मुहुः ।
देहेन्द्रियाणामवशः समवस्था निगद्यते ।।
अन्तर्लक्ष्यो बहिर्दृष्टि निमिषोन्मेषवर्जिता ।
एषा तु शाम्भवी मुद्रा सर्व तंत्रेषु गोपिता ।।
एषा तु खेचरी मुद्रा शिवस्य समबोधिनी ।
सर्वोत्तीर्णा सदाहन्ता सामरस्य समाकृतिः ।।

या क्रियेचा आवेश केवळ दीक्षेच्याच वेळी होतो असे नाही. परंतु दीक्षेच्या नंतरही जोपर्यंत शिवशक्तीचे ऐक्य झाले नाही तोपर्यंत यावज्जीव किंवा जोपर्यंत मुक्ती प्राप्त होणार नाही तोपर्यंत जन्मजन्मांतरात ही क्रिया चालत राहील. म्हणून साधकाने प्रतिज्ञापूर्वक विशेष नियमबद्ध राहिले पाहिजे असे नाही. परंतु नित्य गुरू आज्ञेनुसार प्रातःकाली व सायंकाळी आसनावर बसून साधन केले पाहिजे. त्याच्या योगाने प्रतिदिवशी नव्या नव्या क्रिया व नाना प्रकारचे अनुभव येऊ लागतात. श्री महेश्वर सांगतात की याप्रमाणे योगसाधन करणाऱ्याला जमिनीवर पडणे व उठणे अर्थात बसून व पडून नाना प्रकारची आसने करणे, वारंवार प्राणायाम करणे, तसेच श्वासप्रश्वास घेणे व सोडणे इत्यादी क्रिया करण्याने उन्मनी अवस्था प्राप्त होते. तिच्या योगाने शरीर आणि इंद्रिये अवश व विवश

सम अवस्था समाधी होते. या समाधीच्या पूर्वी साधकाला आणखीही पुष्कळशा क्रिया होतात. आसन, प्राणायाम, बंध, मुद्रा, नाडीशुद्धी आदि या सर्व क्रियांनी समाधी होते व समाधीनंतरही आवश्यकतेनुसार या क्रिया होत रहातात. जितक्या जितक्या क्रिया दीर्घ व दृढ होतात तितका तितका काल सम अवस्था समाधी येते. त्याचप्रमाणे इतर क्रियांबरोबर साधकाला शांभवी मुद्राही होते. जिच्यात अंतर्लक्ष्य व बाहेर दृष्टी असते. अशा निमेष उन्मेष वर्जित शांभवी मुद्रा होत. शांभवी मुद्रा सर्व तंत्रांत गुप्त असून ती साधक प्रयासाशिवाय स्वतः करतो. तशीच साधकाला खेचरी मुद्राही होते. जीभ उलट होऊन टाळूत जाऊन बसते. व रसपान होते. तेही आपोआप होते. श्रीशिवाच्या स्थानातील अमृताचा बोध करून देणारी खेचरी मुद्रा व श्रीशंभूच्या स्वरूपाचे दर्शन करून देणारी शांभवी मुद्रा साधकाला आपोआप होते. तिच्या प्रभावाने साधकाला आत्मज्ञानाचा प्रकाश होतो व साधकाला आपल्या विभुत्वाचा बोध होतो.

न किञ्चिदपि जानति स्वात्मध्यानपरायणः ।
तदा यत्परमं सौख्यं मनोवाचामगोचरम् ।।
स्वयमेवानुभूयन्ते शर्करा क्षीर पानवत् ।
कीदृशं तादृशं सौख्यं इति वक्तुं न शक्यते ।।
दृश्यतेपुलिकाद्यैर्यत्तद् ब्रह्मध्यानमुच्यते ।।
यत्सुखं विद्यते ध्याने देहावेशकरं परम् ।।
कथितुं नैव शक्नोति प्रबुद्धस्तत्समाहितः ।
ब्रह्माध्यानपरानन्दपराः सुकृतिनो नराः ।
क्षणेऽप्यन्तर्हिते तस्मिन् शोचन्त्यासंहता इव ।।

याप्रमाणे ज्या वेळी साधकाला शांभवी व खेचरी मुद्रा होते त्या वेळी शारीरिक, मानसिक इत्यादी क्रिया कमी होतात. व फक्त केवळ प्राणाच्या क्रिया होतच राहतात. प्राण सुषुम्ना विवरात प्रवेश करतो आणि शांभवी व खेचरी मुद्रा दृढतापूर्वक लागते. इच्या (हिच्या) योगाने आत्म्याचे ध्यान अवर्णनीय असते. त्या अवस्थेत साधकाला काही समजत नाही, त्याचे बाह्य ज्ञान लुप्त होते. तो आत्मतत्त्वात तन्मय होतो म्हणून आत्म्याशिवाय कशालाही तो जाणत नाही. परंतु त्या ध्यानामध्ये जे परमसुख होते ते मन, वाणीला अगोचर आहे, त्याचा ध्यान करणारा स्वतःच अनुभव घेऊ शकतो. परंतु तो दुसऱ्याला सांगू शकत नाही. म्हणून योगसाधनेने स्वतः ध्यान करणाऱ्या साधकाला ध्यानाच्या योगाने ज्या प्रकारचे सुख व आनंद होतो तो कशा प्रकारचा असतो तो कोणत्याही प्रकाराने सांगता येत नाही. तथापि त्याच्या बाह्य लक्षणावरून अंतरानंदाचा थोडासा परिचय होतो.

जे लोक गुरुप्रदत्त योगसाधन करतात, ज्यांची कुंडलिनी शक्ती क्रियाशील झाली आहे, ज्यांचे ध्यान संकल्पमात्राने ध्येयामध्येच लागते त्यांच्या अंतरातील लक्षणे फक्त तेच जाणू शकतात, परंतु त्याची थोडीबहुत लक्षणे बाहेरही प्रकट होतात. त्यांच्या मन, प्राण आणि शरीराच्या क्रिया सात्त्विकता धारण करतात. म्हणून इंद्रिये शांत, स्वच्छ व प्रकाशवान होतात व आनंदाने प्रफुल्ल व प्रसन्न होतात. ध्यानाच्या केवळ स्मृती मात्रानेच त्यांची दृष्टी अंतर्मुख होऊ लागते व त्यामुळे नेत्र मदोन्मत्त होता, वाणी कोमल व गद्‌गद होते, अंतरात्म्याच्या सुखाने सर्वांगावर भावपूर्ण रोमांच येऊन कंप होऊ लागतो व श्वास, प्रश्वास बंद होतात. हे ब्रह्मध्यानाचे लक्षण पाहण्यात आले की ध्यान बरोबर होत आहे असे समजावे. कारण कुंडलिनी शक्ती जागृत झाल्याने मन, प्राण आणि शरीर आवेशपूर्ण होतात. त्या परमदेहावेशात ध्यानाने जे सुख मिळते त्याचे वर्णन ध्यानातून उठल्यावरही साधक करू शकत नाही. जे भाग्यवान साधक या प्रकाराने ब्रह्मज्ञान करतात ते क्षणमात्र जरी या ध्यानानंदापासून च्युत झाले तरी त्यांन मोठा आघात झाल्याप्रमाणे दुःख होते व अशा परमध्यान सुखाचा क्षणभरही वियोग व्हावा असे त्यांना वाटत नाही.

प्रत्याश्च प्रवर्तन्ते प्रशस्तफलसूचकाः ।
मयि भाववतां पुंसां प्रागदृष्टार्थगोचराः ।।
कम्पस्वेदोऽश्रुपातश्च कण्ठे च स्वरविक्रिया ।
आनन्दाद्युपलब्धिश्च भवेदाकस्मिकी मुहुः ।।
एतैर्व्यस्तैः समस्तैर्वा लिंगैरव्यभिचारभिः ।
मन्दमध्योतमैर्मावै विज्ञेयास्ते नरोत्तमाः ।।

**वायवीय संहिता अ. ११**

श्रीमहेश्वर सांगतात की ज्या वेळी सद्‌गुरूच्या शक्तिसंचाराने अथवा ईश्वराच्या अनुग्रहाने किंवा पूर्वजन्मीच्या प्रबळ पुण्यप्रभावाने अथवा शिवपूजनादि भक्तिसाधनाने मनुष्य ज्या वेळी माझ्या ठिकाणी भावान्वित होतो त्या वेळी कुंडलिनी शक्ती जागृत होते व पूर्वजन्मात केलेले योगसाधन या जन्मात आरंभ करते. त्यायोगाने प्रशस्त फळसूचक नाना प्रकारचे प्रत्यय येऊ लागतात. हे प्रत्यय मनुष्याच्या अदृष्ट सिद्धीमुळे होतात. साधकाला कंप, स्वेद, अश्रुपात, कंठस्वराची विक्रिया व त्यामुळे विकृत शब्दोच्चारण, तसेच उडी मारणे, नाचणे, हसणे, रडणे, ओरडणे इत्यादी क्रिया आनंदप्राप्तीच्या आवेशाने अकस्मात वारंवार होऊ लागतात. ज्या मनुष्याच्या ठिकाणी ही सर्व अकृत्रिम लक्षणे पृथक पृथक अथवा सर्व एकदम मंद, मध्यम अथवा उत्तम भावाने प्रकट होतात, ते भक्त उत्तम, श्रेष्ठ साधक समजावेत.

मंदामध्ये शारीरिक क्रिया इच्छा मात्राने रोखल्या जातात. मध्यम भावात शारीरिक व मानसिक क्रियांचा वेग कष्टाने सांभाळला जातो. अर्थात बाह्य व आभ्यंतरिक क्रियांना रोध करण्याने मनाला दुःख होते. उत्तम भाव तो आहे की ज्यात क्रिया मनाला व शरीराला विवश करतात व क्रियाशक्तीला रोखण्याची इच्छा होत नाही.

यथा योऽग्नि समावेशान्नायो भवति केवलम् ।
तथैव मम सान्निध्यान्नते केवल मानुषाः ।।
अवज्ञानं कृतं तेषु नरैर्व्यामूढचेतनैः ।
आयुः श्रियं कुलं शीलं हत्वा निरयमावहे ।।

गुरुकृपेने कुंडलिनी शक्ती जागृत झाल्याने ज्यांची माझ्या ठिकाणी भक्ती उत्पन्न झाली आहे त्या भक्तांना सामान्य समजू नये. ज्याप्रमाणे लोखंडात अग्नीने प्रवेश केल्यावर ते केवळ लोखंत राहत नाही त्याप्रमाणे माझ्या सान्निध्यात आल्याकारणाने ते केवळ मनुष्य रहात नाहीत, परंतु दिव्य भावाला प्राप्त झालेले, दिव्य गुणयुक्त दैवी संपत्ती संपन्न पूजा करण्यास योग्य असे होतात. म्हणून जे मूढ लोक अशा माझ्या भक्तांची अवज्ञा करतात ते लोक आपले आयुष्य, अर्थ, कुल, शील यांचा नाश करून अधोगामी होतात.

सर्ववेदमयी देवी सर्वमन्त्ररूपिणी ।
सर्वमंत्रात्मिकता विद्या वेदविद्याप्रकाशिनी ।।
सैव कुण्डलिनी माया शुद्धाध्वपरमासती ।
सा विभागस्वरूपैव षडध्वात्मा विजृम्भते ।
तत्र शब्दास्त्रयोऽध्वानस्त्रयश्चार्थाः समीरिताः ।। **वायवीय संहिता अ. २९**

याप्रमाणे कुंडलिनी शक्ती जागृत होऊन क्रियाशील झाल्याने वास्तविक योगाला आरंभ होतो व त्याचे नाव स्वाभाविक योग, सिद्धयोग, अथवा महायोग आहे. हाच सिद्धिप्रद मार्ग आहे या उपायाने सर्व वेदज्ञानमयी, मंत्रस्वरूपिणी, सर्वमंत्रात्मिका विद्या, आणि वेद विद्येचा प्रकाश करणारी कुंडलिनी शक्ती साधकाकडून क्रिया करवते व त्याच्या योगाने समस्त मंत्र व सर्व विद्येचे ज्ञान प्रकाशित होते. त्या वेळी साधक देवी देवतांचे दर्शन करतो. त्यांच्या अनुग्रहाचा लाभ करून घेतो व वेदादिक शास्त्रांच्या मंत्राचे विज्ञान लाभ करून घेतो व तसेच त्याला वेदाचे गूढ रहस्य समजू लागते. ती कुंडलिनी शक्ती वर्ण, पद आणि मंत्र या तीन शब्दरूपांनी आणि भुवन, तत्त्व आणि कला या तीन अर्थरूपांनी सहा प्रकारांनी प्रकाशित होते. त्या वेळी फलस्वरूप साधकाला भुवन अर्थात अंतरांतील दिव्य लोकांच्या ज्ञानाचा

अनुभव येतो आणि पृथिव्यादि छत्तीस तत्त्वांच्या ज्ञानाचा त्याला अनुभव येतो. कला, विद्याशक्ती, कुंडलिनी देवीची प्रकाश क्रियाही जाणतो. त्या वेळी त्याला वर्ण, पद आणि मंत्राचाही बोध होतो. कुंडलिनी शक्ती षट्चक्राचे भेदन व शोधन करते आणि सुषुम्नामार्गात प्रवेश करते व साधकाला क्रमाने समाधीच्या अवस्था दाखविते. शिवशक्तीच्या सम्मेलनार्थ कुंडलिनी शक्तीच्या प्रेरणेने साधक लोक अशा अद्‌भुत व आश्चर्यजनक क्रिया करतात की ज्यांची काही कल्पनाहि करता येत नाही. आपापल्या संस्कारानुसार साधक हठ, मंत्र, लय आणि राजयोगाच्या शारीरिक, मानसिक आणि प्राणांच्या नाना प्रकारच्या क्रिया करतात की ज्यांचे वर्णन करणेही शक्य नाही. परंतु जे जे अनुभव साधकांना आलेले प्रत्यक्ष पाहिले आहेत त्यांचेच या ठिकाणी वर्णन केले आहे.

## नाडीशुद्धीच्या क्रिया

मलाकुलासु नाडीषु मारूतो नैव गच्छति ।
प्राणायामः कथं सिद्धस्तत्त्वज्ञानं कथं भवेत्
तस्मादादौ नाडी शुद्धिं प्राणायामं ततोऽभ्यसेत् ।।

**घेरंड संहिता पंचम उपदेश**

शरीरातील सर्व नाड्या मलाने आवृत झाल्याकारणाने प्राण सुषुम्ना नाडीत सहज प्रवेश करू शकत नाही. म्हणून प्राणायामाची सिद्धी होत नाही व तत्त्वज्ञान होत नाही. म्हणून प्रारंभी नाडीशुद्धी होणे आवश्यक आहे. याकरिता कुंडलिनी शक्ती साधकाकडून आरंभी नाडीशुद्धीच्या क्रिया करविते. वातक्रम, व्युत्क्रम, शीतक्रम, भस्त्रा, अग्निसार, वायुसार, नौली आणि कपाल भाती इत्यादी क्रिया ज्यांच्या योगाने नेति, धौती, बस्ती इत्यादी क्रियांचे काम होते. साधकाला आपोआप वायुद्वारा रेचक, पूरक, कुंभक प्राणायामरूपाने होतात. अर्थात साधकाच्या मुख, नासिका, गुद आणि लिंगातून प्राण अपान वायूचे निःसरण व ग्रहण व निरोधरूपाने या सर्व क्रिया कुंडलिनी शक्तीच्या प्रेरणेने होतात.

अंगविकृती नानाप्रकारचे भाव, देहविक्षेप, व्यायाम, अंगमर्दन, अंगडाई, घर्षण, अभिधात, नेत्रांची विक्रिया, डोळ्यांत बुबुळे फिरणे, आस्फालन-हातपाय झाडणे व पसरणे, धावणे, फिरणे, चक्कर घेणे, घूर्णा, सरकत सरकत साऱ्या जागेत गडबड लोळणे, नृत्य करणे, दारदुरीगति - बेडकाप्रमाणे उठून इकडे तिकडे पद्मासनासह पडणे, उड्या मारणे, ओरडणे, वेड्याप्रमाणे किंवा दारू पिऊन उन्मत्त झालेल्याप्रमाणे किंवा भूत अंगात आलेल्या माणसाप्रमाणे शारीरिक व मानसिक

चेष्टा करणे व भाव दाखविणे इत्यादी प्राणवायूंच्या क्रिया साधक स्वतः करतात. साधकाच्या प्रकृती अनुसार आणखीही विकृत क्रिया होतात. जसे कंप, रोमांच, अंतःस्फुरण, स्पंदन, स्पर्श, जृंभण, हास्य, रोदन, पतन, स्तंभ, शरीर जड होणे, जमिनीला चिकटून जाणे, श्वास प्रश्वास यांचे अत्याधिक जाणे येणे, घाम येणे, डोळ्यांतून पाणी गळणे, लाळ गळणे, शरीर कृश होणे, मल मूत्र अल्प होणे, कोष्ठ काठिण्य होणे, अल्प निद्रा अथवा अतिनिद्रा किंवा निद्रेचा अभाव होणे, थंडी वाजणे, ताप आल्यासारखे वाटणे, शरीरत जो सुप्त रोग असेल तो प्रकट होणे, शरीर दुखू लागणे, पोटात दुखणे, कामवासना उत्तेजित होणे, आत्यंतिक कामेच्छेने वीर्यक्षरण होणे, अथवा जुलाब होणे, बहुमूत्र होणे, ज्वर येणे, पहिल्यापासून शरीरात असलेले उचकी, श्वास, इत्यादी रोग वाढणे. साधकांच्या संस्कारानुसार कुंडलिनी शक्ती सर्व दोषांच्या निवारणार्थ नाना प्रकारच्या क्रिया करविते व त्या योगाने साधकांचे रोग शीघ्र नष्ट होतात.

## स्वर विक्रिया

विकृत शब्द – मुख, नासिका अथवा गळ्यातून नाना प्रकारचे शब्द काढणे, स्वरसाधन – नाना प्रकारचे सूर, पशु, पक्षी, बेडूक, कुत्रा, मांजर, सिंह, व्याघ्र, इत्यादिकांप्रमाणे शब्द करणे, गर्जना, हुंकार, चीत्कार, अथवा भयंकर शब्द करणे, तसेच बडबडणे, अद्भुत भाषा बोलणे, क्रंदन ध्वनी – नाना प्रकारचे सूर काढून रडणे, हास्यध्वनी, खदखदा हसणे, गायन करणे, भगवन्नामकीर्तन करणे, मुखाने मृदंग, तबला, तानपुरा इत्यादिकांप्रमाणे शब्द काढणे, नियमबद्ध टाळी वाजवून ताल धरणे, गद्य, पद्य अथवा गाण्याची रचना करणे, व्याख्यान देणे आणि आलस्यरहित, उत्साहित राहणे इत्यादी नाना प्रकारचे स्वर उत्पन्न होतात व बिघडतात.

## आसन

सिद्धं पद्मं तथा भद्रं मुक्तं वज्रञ्च स्वस्तिकम् ।
सिंहश्च गोमुखं वीरं धनुरासनमेवच ।।
मृतं गुप्तं तथा मात्स्यं मत्स्येन्द्रासनमेवच ।
गोरक्षं पश्चिमोत्तानं उत्कटं संकटं तथा ।।
मायूरं कुक्कुटं कूर्मं तथा चोत्तान कूर्मकम् ।
उत्तानमंडूकं वृक्षं मंडूकं गरुडं वृषम् ।।
शलभं मकरं उष्ट्रं भुजंगश्चयोगासनम् ।।

**घेरंड संहिता द्वितीय उपदेश**

सिद्ध, पद्म, भद्र, मुक्त, वज्र, स्वस्तिक, सिंह, गोमुख, वीर, धनु, मृत, गुप्त, मत्स्य, मत्स्येन्द्र, गोरक्ष, पश्चिमोत्तान, उत्कट, संकट, मयूर, कुक्कुट, कूर्म, उत्तान कूर्म, उत्तान मंडूक, वृक्ष, मंडूक, गरुड, वृषभ, शलभ, मकर, उष्ट्र, भुजंग व योगासन इत्यादी नाना प्रकारची आसने होतात. या आसनांनी शरीराला स्थिरता प्राप्त होते. शरीरातील अग्नीची पाचनक्रिया उत्तम प्रकारची होते. रजोगुण व तमोगुण यांचे प्रशमन होऊन शरीर निरोगी राहते.

साधकाला क्रित्येक प्रकारच्या योगांची आसने होतात कारण जीवाचे कोट्यवधी योनीतून जन्म झालेले असतात व त्या योनीतील अति सूक्ष्म संस्कार जीवात असतात. ते कुंडलिनी शक्ती जागृत झाल्याने स्मृतिपंथात येऊन निघून जातात. स्वप्नाप्रमाणे हे संस्कार ध्यानावस्थेत साधकाला भासमान होतात आणि त्यामुळे साधक स्वाभाविक चेष्टा करू लागतो. कोणत्या योनीचे कसे संस्कार आहेत हे शारीरिक, मानसिक, प्राण व इतर स्वरविक्रिया यांच्या अनुमानाने साधकाला समजून येतात. ज्या वेळी शुद्ध स्मृती दृढ होते त्या वेळी साधकाला जन्मांतरातील संस्कारांचा उत्तम प्रकारे अनुभव येतो असेही प्रत्यक्ष पाहण्यात आले आहे. म्हणून चौऱ्याऐंशी लाख आसनांपैकी हजारो प्रकारची आसने साधक आपोआप करतो. उद्भिज योनींची आसने पद्म, ताल, वृक्ष आदि, जलचर योनींची आसने – मत्स्य, कूर्म, मकर इत्यादी, कीटक योनींची आसने – भुजंग, शलभ, वृश्चिक आदि, पक्षीयोनीतील आसने – मयूर, गरुड, कुक्कुट, हंस इत्यादी पशुयोनीतील आसने – सिंह, वृषभ, उष्ट्रासन इत्यादी.

## बंध आणि मुद्रा

महामुद्रा महाबंधो महावेधश्च खेचरी ।
उड्यानं मूलबंधश्च बंधो जालंधराभिधः ।।
करणी विपरीताख्या वज्रोली शक्तिचालनम् ।
इदं हि मुद्रा दशकं जरामरणनाशनम् ।।

**हठयोग प्रदीपिका तृतीय उपदेश**

महामुद्रा, महाबंध, महावेध, खेचरी, उड्यान, मूलबंध, जालंधर बंध, विपरीतकरणी, वज्रोली आणि शक्तिचालन या दहा मुद्रा जरा व मृत्युचा नाश करणाऱ्या आहेत.

महामुद्रा नभोमुद्रा उड्यानं जलंधरम् ।
मूलबंधो महाबंधो महावेधश्चखेचरी ।।
विपरीतकरी योनिर्वज्रोली शक्तिचालनी ।
ताडागी मांडुकी मुद्रा शाम्भवी पचधारण ।।

अश्विनी पाशिनी काकी मातंगी च भुजंगिनी ।
पंचविंशति मुद्राणि सिद्धिदानीह योगिनाम् ।।

**घेरंड संहिता तृतीय उपदेश**

महामुद्रा, नभोमुद्रा, उड्यान, जालंधर, मूलबंध, महाबंध, महावेध, खेचरी, विपरीतकरणी, योनी, वज्रोली, शक्तिचालनी, ताडागी, मांडुकी, शांभवी, वैश्वानरी, वायवी, आकाशी, पार्थिवी, आम्भसी, अश्विनी, पाशिनी, काकी, मातंगी आणि भुजंगिनी, या पंचवीस मुद्रा योग्यांना सिद्धी देणाऱ्या आहेत. याही आसनाबरोबरच केल्या जातात. आसनांचे मुख्य काम शरीर स्थिर करून दहा वायूंना उत्तम प्रकारे चालविणे हे आहे व मुद्रांचे प्रधान कार्य शरीर दृढ करणे व प्राणवायूला शरीराच्या विशेष भागात स्थिर करणे हे असून त्यांच्या योगाने मन धारणा करण्यास समर्थ होते. मुद्रांची स्थाने - मलद्वार व योनिस्थानांत अश्विनी मुद्रा, मूलबंध व महामुद्रा व महाबंध होतो. यांची क्रिया गुरुद्वाराचे संकोचन व विकास केल्याने होतो. नाभी व उदर या ठिकाणी उड्यान बंध, ताडागी मुद्रा व सारंगी होते. यांचे कार्य उदरात वायू भरणे व सोडणे हे आहे. कंठ संकोचाने जालंधरबंध व डोळ्यांच्या ठिकाणी त्राटक व शाम्भवी मुद्रा होते. कानात नाद, श्रवण आणि षण्मुखी मुद्रा व भ्रामरी होते. जिभेच्या ठिकाणी खेचरी, नभोमुद्रा आणि मांडुकी होते. मुखात भुजंगी, काकी व योनिमुद्रा होते. मस्तकाच्या ठिकाणी विपरीत करणी मुद्रा, आणि सर्वांगाच्या ठिकाणी महामुद्रा, महावेध व ताडन परिधानादि क्रिया होतात. याप्रमाणे साधकाला शास्त्रानुसार कुंडलिनी शक्ती आपोआप सर्व क्रिया करविते. या बंधमुद्रांच्या साधनाने साधकाचा आनंद व उत्साह वाढतो व याचा नित्य अभ्यास होत राहिल्याने जठराग्नी वाढतो आणि श्वास, कास, प्लीहा इत्यादी वीस प्रकारचे श्लेष्म रोग सर्व दूर होतात.

## प्राणायाम

आनन्दोभ्दव योगार्थ निद्रा घूर्णिस्तथैव च ।
रोमाञ्चध्वनी संविग्धसांग मोटन कम्पनम् ।।
भ्रमणं स्वेद जल्पाश्रु संविन्मूर्च्छा भवेद्यदा ।
तदोत्तमोत्तमः प्रोक्तः प्राणायामः सुशोभनः ।।

**लिंगपुराण तथा वायवीय संहिता**

योगशास्त्रात कुंडलिनी शक्ती जागृत करण्याकरिता प्राणायाम हेच मुख्य साधन सांगितले आहे. योगशास्त्रानुसार कनिष्ठ प्राणायामात घाम, मध्यमात कंप आणि उत्तमात प्राणाचे उत्थान होऊन कुंडलिनी जागृत होते. हे प्राणायाम आपल्या

इच्छेने परिश्रमपूर्वक करावे लागतात. परंतु ज्या वेळी कुंडलिनी जागृत होऊन क्रिया करू लागते त्या वेळी त्यापेक्षाही उत्तम प्राणायाम अनायासे व स्वतः होतात. त्यांच्या योगाने साधकाला महाआनंदाची चिन्हे – घूर्णा, योगनिद्रा, रोमांच उत्पन्न होतात. साधक आनंदावेशाने (ॐ) ओम् चा ध्वनी करू लागतो. आणि अंग मोडणे, कंप, भ्रमण, प्रस्वेद, जल्प इत्यादी क्रिया होऊ लागतात. तसेच आनंदाश्रू येऊ लागतात व योगाचा अर्थ स्पष्ट होतो. हाच उत्तमातील उत्तम प्राणायाम होय. ज्या ज्या वेळी कुंडलिनी शक्तीला सुषुम्ना मार्गातून ब्रह्मरंध्रात जाण्याची आवश्यकता उत्पन्न होते त्या वेळी कुंडलिनी देवी स्वतः साधकाकडून योगशास्त्रात सांगितल्याप्रमाणे नाना प्रकारच्या क्रियांबरोबर प्राणायाम करविते. त्यांच्या योगाने साधकाचे शरीर, मन व प्राण स्वस्थ होऊन त्याला विनाप्रयास आपली अभीष्ट सिद्धी प्राप्त होते.

याचप्रमाणे कुंडलिनी महाशक्ती साधकाकडून कित्येक प्रकारचे प्राणायाम करविते. सूर्यभेदन, उज्जायी, शीतकारी, शीतली, भस्त्रिका, भ्रामरी, मूर्च्छा हे आठ प्रकारचे कुंभक प्राणायाम आहेत. याशिवाय बाह्याभ्यन्तर, स्तंभवृत्ती व केवल कुंभक प्राणायामही आहेत. हेही आवश्यकतेनुसार साधकाला स्वतः होतात. या सर्वांचे प्रत्यक्ष ज्ञान, योगसाधन करण्यानेच होते. याच्याच बरोबर पंचतत्त्वाचे समूहाचे ज्ञान स्वयं स्फुरू लागते. जे साधक पूर्व जन्मात ज्ञान, योग, भक्ती, मंत्रजप, देवीदेवतांची पूजा करून आलेले असतात त्यांना या जन्मातही कोणत्याही कारणाने कुंडलिनी शक्ती जागृत झाल्याने आपल्या पूर्वजन्माच्या संस्कारानुसार ज्ञानाचे साधन – सर्व ठिकाणी आत्मतत्त्वाच्या एकत्वाचा अनुभव येणे, योगसाधन, यमनियमादि अष्टांग योगाच्या क्रिया करणे, आणि भक्तिमार्गातील भगवत्प्रेमी लक्षणे, चित्तचांचल्य, चित्तक्षोम, भयत्रास, शंका, संशय, उग्रता व गर्व, प्रफुल्लता, विषाद, स्वप्नयुक्त निद्रा, सुषुप्ती व मूर्च्छा आणि भावसमाधी होणे, मंत्र जप करणाऱ्यांना वरील भक्तिमार्गातील लक्षणे, आणि देवीदेवतांची दर्शने होतात. प्रत्येक प्रकृती व प्रवृत्ती भिन्न भिन्न असल्याकारणाने सर्व साधकांना एकसारख्या क्रिया होत नाहीत. परंतु सर्वांच्या साधनाचे अंतिम फल समाधी, ज्ञान व मोक्ष एकच आहे.

## नऊ रस

रौद्रोऽद्भुतश्च श्रृङ्गारो हास्यं वीरो दया तथा ।
भयानकश्च बीभत्सः शान्तः सप्रेमभक्तिकः ।।

रौद्र – तीक्ष्ण भाव, अद्‌भुत – विस्मयजनक भाव, शृंगार – रतिजनक भाव, हास्य – प्रसन्नता, वीर – उत्साहपूर्ण भाव, दया – कारुण्यभाव, भयानक –

भयसूचक भाव, बीभत्स – घृणाव्यंजक भाव आणि सप्रेमभक्तियुक्त शांत – नम्र भाव हे नवरस म्हटले जातात.

कुंडलिनी शक्ती जागृत झाल्याने नाना प्रकारचा अश्रुत शास्त्रांचे ज्ञान व अज्ञान गोष्टी स्वयंप्रकाशित होतात. त्या भावावेशात साधक आनंदित होऊन राहतो आणि मनात जे जे स्फुरण होते ते ते क्रियारूपाने आपल्या संस्कारानुसार प्रकट करतो. त्याचा ठराविक क्रम नाही. ज्या वेळी जो भाव किंवा वृत्ती येते ती तसे आपले काम करते. अव्यक्त चैतन्य शक्तीने साधकाच्या मनाला सूक्ष्मातिसूक्ष्म व कधी कधी तीव्र भावाच्या प्रेरणा होतात. त्यांच्याबद्दल विचार करण्याचे कारण नाही. त्यांना कार्यात परिणाम होऊ देण्याची आवश्यकता असते म्हणून साधकांनी निःशंक व निर्भय होऊन आपल्या क्रियाशक्तीला क्रियेत परिणत होऊ दिले पाहिजे.

ज्या वेळी साधकांत रौद्र भावाचा प्रकाश होतो, त्या वेळी साधनकालात साधक क्रोध व कर्कश भाषेने आपले रौद्ररूप प्रकाशित करतो व ज्या वेळी साधकाच्या ठिकाणी अद्‌भुत रसाच्या क्रिया होतात त्या वेळी तो महाविस्मय दाखवितो, कारण त्याला तसे विस्मयकारक अनुभव येत असतात. त्याचप्रमाणे साधकाच्या ठिकाणी शृंगाररसाचा आविर्भाव झाला असता तो आपल्या उपास्यदेवतेला पतिभावनेने पाहतो अथवा आत्मरतीत निमग्न होतो. ज्या वेळी साधकांच्या ठिकाणी हास्यरसाचा विकास होतो त्या वेळी साधक साधनकाळात स्मित, हसित, विहसित, अवहसित, अपहसित आणि अतिहसित या सहा प्रकारच्या हास्यांपैकी कोणत्याही प्रकाराने हसतो. क्रिया करताना साधकाच्या ठिकाणी ज्या वेळी वीररसाचा आविर्भाव होतो त्या वेळी तो इतक्या स्फूर्तीने गर्जन, तर्जन, आस्फालन, शरीर तोडणे, मोडणे अथवा आवेशाने कठीणातील कठीण कामही सहज करणे इत्यादी क्रिया करतो. अथवा त्या अवस्थेत बळकटातील बळकट वस्तूही तो मोडू तोडू शकतो. अर्थात साधनकालात तो वीराप्रमाणे उत्साहपूर्ण होतो. साधनकालात पुष्कळसे साधक करुण रसाने भरून जातात. कष्टव्यंजक करुणाजनक स्वराने रडू लागतात. दुसऱ्यालाही रडवतात. पुष्कळशा साधकांना साधनाला बसताच अंतरंगात भयसंचार होतो व त्या योगाने भयभीत होऊन तो भयसूचक शब्द करू लागतो. कित्येक साधक साधनकालात निंदा किंवा घृणासूचक शब्द बोलतात. आणि तिरस्कारसूचक शरीराच्या चेष्टा करतात. तसेच शांत भाव उत्पन्न झाला असता साधनकालात साधक मन, प्राण आणि शरीराच्या क्रिया यांचा रोध करून चूपचाप बसतो व आपल्या अंतरात्म्याशी संलग्न होतो व त्या योगाने त्याला परम शांती व महासुखाचा अनुभव येतो. याप्रमाणे महायोगसाधनात अंतरात्म्याच्या प्रेरणेने शरीर, मन व प्राण यांच्या क्रिया होतात व त्या योगे साधकाला सर्व तत्त्वांचे व भौतिक विषयसमूहाचे ज्ञान होते. याप्रमाणे ही प्राकृतिक

तत्त्वे साधकाला अनुकूल होतात. त्यांचे स्थान, कार्य, स्थिती व स्वरूप यांचे ज्ञान साधकाला स्वतः होते. आवश्यकतेनुसार त्यांच्यापासून आपली भौतिक आणि आध्यात्मिक उन्नती करून घेतो. तीही त्याला कधीही प्रतिकूल होत नाहीत.

## या सर्व क्रिया अर्थशून्य नाहीत

यत्र यत्यत्कृतं कर्म शुभं वा यदि वाशुभम् ।
तत्सर्वं देवता प्रीत्यै जायते सुर सुन्दरि ।।
जल्पो जपफलं तन्द्रा समाधिरभिधीयते ।
विक्रिया पूजनं देवि छर्द्दितं भैरवी बलिः ।।
मुक्तिः स्याच्छक्तिसंयोगः स्तोत्रं तत्कालभाषितम् ।।
न्यासोऽवयवसंस्पर्शो भोजनं हवनक्रिया ।
वीक्षणं ध्यानमीशानि शयनं वन्दनं भवेत् ।।

**कुलार्णव तंत्र अष्टम पटल**

याकरिता साधकाची कुंडलिनी शक्ती जागृत झाल्याने मंत्र, यंत्र, जप, तप, पाठ, पूजन उलट सुलट जे काही केले असेल ते सर्व शुभरूप होऊन फल देऊ लागते व सर्व देवीदेवता प्रसन्न होतात. साधनाच्या वेळी साधक ज्या काही शुभाशुभ क्रिया करतो त्या वेळी आत्मदेवाची प्रीती संपादन करतो म्हणून क्रिया करताना बडबडण्यापासून जपाचे फल मिळते व त्या वेळची निद्रा व तंद्रा समाधीचे फळ देते. शरीराच्या ज्या ज्या चेष्टा होतात त्यापासून पूजेचे फळ मिळते व त्यापासून सर्व पापांचा नाश होतो. त्या वेळचा कुंडलिनी शक्तीचा संयोग मुक्तिरूप फळ देतो व साधनकालातील बोलणे स्तोत्रपाठाप्रमाणे फलदायक असते. त्या वेळचा अवयव स्पर्श हाताने अंगप्रत्यंगाचे मर्दन व स्पर्श मंत्रन्यासाचे फळ देतो. त्या वेळी केलेले भोजन हवनाचे फळ देते आणि क्रियाशक्तीच्या आवेशात जिकडे दृष्टी जाईल व जे पाहण्यात येईल ते ध्यानाचे फळ देते. तसेच क्रिया करता करता पडणे ईश्वराला साष्टांग नमस्कार घातल्याप्रमाणे फलदायक होते. याप्रमाणे साधकाची कुंडलिनी जागृत झाल्याने आपापल्या संस्कारानुरूप साधक ज्या काही शुभाशुभ क्रिया करतात त्या सर्व आध्यात्मिक ज्ञानात परिणत होऊन महामंगलरूप व सुखदायक होतात.

## योगक्रियेने कर्मनिवृत्ती

अध्यात्मविद्या हि नृणां सौख्यमौक्ष्यकरी भवेत् ।
धर्म कर्म तथा जप्यमेतत्सर्वं निवर्तते ।।

मत्प्रसादाद्विशुद्धानां दुःखमाश्रमरक्षणम् ।
न विधि न निषेधश्च तेषां मम यथा तथा ।।

**वायवीय संहिता अ. ११**

त्रितापाने संतप्त झालेल्या मनुष्याला संसारात राहून परमशांती प्राप्त होण्याला अध्यात्मयोग विद्या हेच एक साधन आहे. त्याच्या योगाने परमसुख व मुक्ती प्राप्त होते. त्याची प्राप्ती झाली असता साधकाचे सर्व धर्म, कर्म, पूजापाठ, जपतप इत्यादी आपोआप सुटतात. व साधक सर्वधर्मकर्माच्या विधिनिषेधापासून निवृत्त होतो. म्हणून श्रीमहेश्वर सांगतात की माझ्या कृपाप्रसाद क्रियाशक्तीने जे साधक विशुद्ध झाले त्यांना शास्त्रकथित वर्णाश्रमधर्माचे रक्षण करणे कष्टप्रद आहे. या कारणामुळे ते वर्णाश्रमधर्माची रक्षा करू शकत नाहीत व त्याची त्यांना आवश्यकताही नाही. कारण ते माझ्या भक्तीच्या व शक्तीच्या बळाने माझ्याप्रमाणेच विधिनिषेधातीत आहेत. म्हणून त्यांना विधिनिषेध अथवा कोणतेही बंधन नाही.

आद्यज्ञानोदये काम्यकर्मत्याग उदीर्यते ।
द्वितीयसम्यग्ज्ञाने तु नैमित्तिकर्मनिराकृतिः ।।
तृतीयपूर्णज्ञाने तु नित्यकर्मनिराकृतिः ।
चतुर्थाद्वैतबोधेतु सोतिवर्णाश्रमी भवेत् ।। **सूर्यगीता**

प्रथम योगसाधनाने ज्ञानाचा उदय होतो त्यामुळे साधक काम्य कर्माचा त्याग करतात. कारण ज्ञानाचा प्रकाश झाल्याने साधकांच्या मनात सांसारिक सुखप्राप्तीची कोणतीच इच्छा रहात नाही. म्हणून कामनापूर्वक कोणतेही कर्म ते करीत नाहीत. याप्रमाणे ज्ञानोदयाने साधकांच्या काम्यकर्माचा त्याग होतो. दुसऱ्या योगसाधनाने प्रकाशित झालेले ज्ञान साधकाच्या बुद्धीत समाविष्ट होते. सम्यक् प्रकाराने ज्ञान प्रतिष्ठा प्राप्त झाल्याने साधक लोक नैमित्तिक कर्माचाही त्याग करतात. कारण कोणत्याही निमित्ताने कोणतेही काम ते करीत नाहीत. याच ज्ञानाच्या विचाराने त्यांचा नैमित्तिक कर्माचा त्याग होतो. तिसऱ्या योगसाधनाने साधकाला पूर्ण ज्ञान होते व त्या वेळी तो नित्यकर्माचाही त्याग करतो आणि साधकाला चौथे अद्वैतज्ञान झाले म्हणजे त्याच्या वर्णाश्रमधर्माचाही त्याग होतो. याप्रमाणे श्रीशंकराच्या कृपाप्रसाद शक्तीने ज्ञानाचा उदय होऊन त्याची स्थिरता व पूर्णता प्राप्त झाल्यावर साधकांच्या नित्यनैमित्तिक काम्य व प्रायश्चित्त आणि निषिद्ध अशा सर्व कर्मांचा त्याग होऊन साधक अद्वैत ज्ञानाने शिवरूप होऊन जातात व कोणतेही कर्म त्यांना बद्ध करू शकत नाही.

# ✦ द्वादश प्रकाश ✦

## दीक्षाद्वारा कुंडलिनी शक्तीची मंत्र सृष्टी

यदा भवति सा संविद्गुणी कृतविग्रहा ।
सा प्रसूते कुण्डलिनी शब्द ब्रह्ममयी विभुः ।।
शक्तिं ततो ध्वनितस्मान्नादस्तस्मान्निबोधिका ।।
ततोऽर्धेन्दुस्ततो बिन्दुस्तस्मादासीत्परा ततः ।।
पश्यन्ती मध्यमा वाणी वैखरी सर्ग जन्मभूः ।
इच्छा – ज्ञान – क्रियात्मासौतेजोरूपागुणात्मिका ।।
क्रमेणानेन सृजति कुण्डली वर्णमालिकाम् ।।

**शारदा तिलक तंत्र प्रथम पटल**

गुरुदीक्षेने साधकाला ज्या वेळी संवित् स्वप्रकाशिका ज्ञान शक्ती कुंडलिनी देवी आपल्या स्वरूपाचे ज्ञान करून देण्याकरिताच विशेष गुणयुक्त क्रियाशीला होते त्या वेळी शब्दब्रह्ममयी शक्तिपासून अनेकानेक चमत्कार अशा गुणवती शक्तीचा प्रसव करते. त्या शक्तिपासून ध्वनी, नाद, निबोधिका, अर्धेन्दु, बिंदु, परा, पश्यंती, मध्यमा आदि वर्णमाला प्रकाशकाचे क्षेत्र वैखरी वाणीला उत्पन्न करते. हीच कुंडलिनी शक्ती तेजरूप होऊन गुणांचा आश्रय करून इच्छा, ज्ञान आणि क्रियारूपाने प्रकाशित होऊन वाणी व वर्णमालेची सृष्टी उत्पन्न करते. त्याच्या योगाने साधनकालात साधक आपल्यामध्ये होणाऱ्या क्रियांच्या लक्षणावरून समजू शकतो की कुंडलिनी शक्तीच्या कोणकोणत्या क्रियांचा अनुभव आपल्याला येत आहे.

कुंडलिनीच्या प्रथम संवित् स्वरूपाच्या अवस्थेत साधकाला असा अनुभव येतो की, शरीर, मन व प्राण शक्तिहीन झाले आहेत, परंतु चेतना कायम आहे. दुसरे, ज्या वेळी कुंडलिनी शक्तिरूपाने प्रकाश पावते, त्या वेळी साधकाला आपल्या ठिकाणी मन व प्राणाच्या क्रियाशक्तीचा अनुभव येतो. नंतर ध्वनी उत्पन्न झाल्यावर आत अव्यक्त ध्वनी शब्द ऐकू येतो. परंतु नादाचा बरोबर निर्देश करता येत नाही. ज्या वेळी कुंडलिनी नादाचे स्वरूप धारण करते त्या वेळी साधकाला निबोधिका अवस्थेचे ज्ञान होते, जिच्यात ज्योतीचे दर्शन होणे आरंभ होतो. त्यानंतर अर्धचंद्राचे दर्शन होते. त्यानंतर बिंदुरूप ज्योतीचा प्रकाश होतो आणि त्या योगाने सर्व प्रकारचे नाद सुस्पष्ट होऊन भिन्न शब्द वीणा, वंशी, भ्रमरारूपाने परा, पश्यंती व मध्यमेत अनुभव येतो आणि नंतर वैखरी वाणीने वर्णमालेच्या रूपाने नाना प्रकारच्या क्रियांनी शब्दरूपात व्यक्त करतो.

गुणिता सर्वगात्रेषु कुण्डली परदेवता ।
विश्वात्मना प्रबुद्धा सा सूते मंत्रमयं जगत् ।।
एकधा गुणिता शक्तिः सर्व विश्वप्रवर्तिनी ।
वेदादिबीजं श्रीबीजं शक्तिबीजं मनोभवम् ।
प्रासादं तुम्बुरं पिण्डं चिन्तारत्नं गणेशवरम् ।
मार्तण्डं भैरवं दौर्गं नारसिंहं वराहजम् ।।
वासुदेवं हयग्रीवं बीजं श्री पुरुषोत्तमम् ।
अन्यान्यपि च बीजानि तदोत्पातयती ध्रुवम् ।।

ती परम देवतास्वरूपिणी ईश्वरी शक्ती जागृत होऊन उत्तम प्रकारे क्रिया करू लागली म्हणजे साधकाच्या शरीरात व्याप्त होऊन मंत्रमय जगताची रचना करू लागतो व त्या योगाने साधक वेदादिशास्त्रांच्या बीजमंत्र प्रणवाचा ध्वनी करू लागतो. त्याचबरोबर आवेशात नाना प्रकारच्या देवी, देवता, शिव, शक्ती, विष्णू, सूर्य, गणेश, दुर्गा, भैरव, नृसिंह, वराह, वासुदेव, हयग्रीव, पुरुषोत्तमादि देवतांचे ओम्, ह्रीं, श्रीं, क्लीं इत्यादी बीजमंत्र उच्चारण करून जपू लागतो. याप्रमाणे कुंडलिनी शक्ती, साधकाने न पाहिलेले, न ऐकलेले व न शिकलेले असे अन्योन्य मंत्र निश्चयपूर्वक त्याच्या मुखाने प्रकट करते. ज्याच्या योगाने साधकाच्या नाम व राशीला प्रतिकूल व अनिष्ट करणारे मंत्रही चैतन्य यांच्या एकतेची सिद्धी होते.

## स्वतःसिद्ध प्रणव

एतदेवाक्षरं ब्रह्म ह्येतदेवाक्षरं परम् ।
एतद्‌ह्येवाक्षरं ज्ञात्वा यो यदिच्छति तस्य तत् ।।
एतदालम्बनं श्रेष्ठं एतदालम्बनं परम् ।
एतदालम्बनं ज्ञात्वा ब्रह्मलोके महीयते ।।

**कठोपनिषद् प्रथम अध्याय**

याप्रमाणे कुंडलिनी शक्तीच्या व्यक्त, अव्यक्त व व्यापक अवस्थेपासून प्रथम वेदाचा बीजमंत्र जो ओंकार त्याचा प्रकाश होतो. ओंकारानंतर निरनिराळ्या देवतांच्या मंत्रांची रचना होते म्हणून कुंडलिनी जागृत झाल्यावर साधकाला प्रथम ध्वनिरूप शब्दसृष्टीचा आरंभ होतो. ते ओम् हे उत्तरच ब्रह्म आहे व तेच अत्यंत श्रेष्ठ आहे. याला जो आपल्या अंतरात्म्याच्या ठिकाणी स्वतः स्फुरित जाणतो, त्याची जी इच्छा असेल ती परिपूर्ण होते. ते ओम् उत्तरच परमश्रेष्ठ अवलंबन आहे. योगसाधनाने या परम आश्रयाला जाणल्याने ब्रह्म लोकाची प्राप्ती होते.

म्हणून हे बीजरूप ओम् ब्रह्म आहे असे वेदाचे सांगणे आहे. ब्रह्मच अवाङ्मनोगोचर आहे. तद्रूप वेदस्थित ते मूर्तिमान ओम्ही मन वाणीच्या पलीकडील लक्ष्यार्थ आहे. ज्याप्रमाणे ब्रह्माचे रूप वाणीने व्यक्त केले जात नाही तसेच ओम्चेही स्वरूप सामान्य वाणीच्या द्वाराने व्यक्त केले जात नाही. परंतु याचा अंतरात ब्रह्माप्रमाणे बोध केला जातो. साधारणपणे व्यवहारात येणारी उत्तरे सोळा स्वर, छत्तीस व्यंजने यांनी प्रचलित आहेत. व्याकरणाच्या नियमाप्रमाणे उदात्त, अनुदात्त, स्वरित भेदाने कित्येक प्रकारचे होऊन ऱ्हस्व, दीर्घ, प्लुतादि स्वरांच्या योगाने उच्चारण केले जातात. परंतु उद्गीय स्वरूप या ब्रह्मरूप ओंकारासारखी आकृती असलेले अक्षर कोणतेच नाही. म्हणून याचे उच्चारणही त्या अक्षरांच्या साहाय्याने होऊ शकत नाही.

ह्रस्वो दहति पापानि दीर्घो मोक्षदायकः ।
आप्यायनः प्लुतोवापि त्रिविधो चारणे नतु ।।

**वराहोपनिषद् पञ्चम अध्याय**

शास्त्रांत वैदिक मंत्र जपाच्या फलाचा अवधी सांगितला आहे. म्हणून सामवेदाचे मंत्र षड्ज, ऋषभ, गांधारादि स्वराने उच्चारण करून जप हवन केल्याने त्यांचे फळ तत्काळ मिळते. सामवेदाचे उद्गाते उद्गीथ उपासनेत वेदाचे स्वराने ॐ चा ध्वनी करतात. त्याचा स्वरही त्याच्या अंतर्गत आहे. हा ॐ स्वतः सिद्ध झाला आहे. याच्या विचित्र स्वरांची योजना कुंडलिनी शक्तीकडून होते, तेव्हा याचा ऱ्हस्व उच्चार होण्याने पापाचा नाश होतो. दीर्घ उच्चारणाने मोक्षप्राप्ती होते आणि प्लुत स्वराने उच्चारणाने शरीर, मन आणि प्राण यांची तृप्ती होते.

सिद्ध महायोगाचे कार्य संपादन करणारी मोहमाया कुंडलिनी शक्ती वैदिक मंत्रांच्या समस्त स्वरांचे संपादन करते. त्या वेळी हा ओंकार परावाणीत प्रस्फुरित होऊन पश्यंती व मध्यमा यांच्यातून जाऊन वैखरीने व्यक्त होतो. आणि वैखरीची क्रिया सुरू होताच साधकाच्या मूलाधार व तालुमूलाच्या कंपनाला आरंभ होतो. आणि कंपनाबरोबर षड्ज, ऋषभ, गांधारादि विचित्र स्वराने दीर्घ प्राणायामाचे उच्चारण होते. या प्रणव ध्वनीचा अर्थ, स्वर, व्यंजन, वर्णाशी कोणताही संबंध राखत नाही. मूलाधारापासून कुंडलिनी शक्तीच्या प्रेरणेने साधक स्वतः उच्चारण करतो. त्या वेळी साधक प्रायः अर्धसंज्ञाशून्य होत असतो, हृदयाकाशात पुष्कळशा नादांचा गुंजारव ऐकतो. परंतु नादाचा निर्देश करू शकत नाही आणि तो आवेशाने पूर्ण झाल्याने त्याला हे ज्ञान रहात नाही की आपण फार जोराने ध्वनी करीत आहोत. हा गगनभेदी ध्वनी

जर रात्रीच्या वेळी खुल्या मैदानात केला जाईल तर तो दोन तीन मैलांपर्यंत ऐकू जाईल. ऐकण्याला असा श्रुतिमधुर स्वर असतो की तो ऐकणाऱ्याचे मन मुग्ध करून टाकतो. परंतु ध्वनीचे स्वरादिक समजून येत नाहीत. परंतु पुष्कळ स्वरमिश्रित अशा अद्‌भुत स्वरांची प्रचिती होते. ज्याप्रमाणे सामवेदाचा उद्‌गाता व श्रोता स्वराच्या एकतेत तल्लीन होतात त्याप्रमाणे या स्वतः प्रणवाचा ध्वनी उभयतांना अर्थबोधरहित आश्चर्यात निमग्न करतो. याच्या स्वराचा काही भाग हुंकार शब्दाशी समान असतो. परंतु बरोबर हुंकारच असे म्हणता येत नाही. कारण याच्या विचित्रतेचे वर्णन करणे शक्य नाही.

ज्या वेळी वैखरी क्रियेने होणारा प्रणव जपध्वनी काही वेळाने लय पावतो त्या वेळी साधक आपल्या इच्छेनेही तसा ध्वनी करू शकतो. परंतु मानसिक आनंद होत नाही. व दहा पाच वेळा ध्वनी करताच चित्ताला नको वाटते. दमल्यासारखे वाटते व गळ्याचा स्वरभंग होतो. स्वभावतः क्रियेच्या आवेशात कित्येक साधकांनी प्रायः नित्य चार-पाच तास याप्रमाणे कित्येक महिने दीर्घकाल प्रणवध्वनी केला होता. त्या वेळी त्यांचा स्वर गगनभेदी होत असे व शरीर स्फूर्तियुक्त रहात असे. महामायाकृत या योगक्रिया कौशल्याचे (कौशलाचे) सामर्थ्य लिहून, समजून देणे अशक्य आहे. या दीर्घप्रणव-ध्वनीच्या नंतर कित्येक भाग्यवान साधकांना हा ध्वनी सूक्ष्म होतो. महायोग साधनांत याला स्वतः प्रणवजप असे नाव आहे. उक्त दीर्घ प्रणवजपापेक्षा या सूक्ष्म जपात मनाला त्याच्या शतपट अधिक सुख अनुभवाला येते. या जपाची क्रिया अष्टप्रहर चालते. स्वप्नामध्येही साधकाचे मन क्रियात्मक राहते. याच्या आरंभाचा व अवधीचा काही नियम नाही.

सूक्ष्म प्रणवजपाचा आरंभ झाल्यानंतर योगापासून प्राप्त होणाऱ्या ऐश्वर्याची मनाला इच्छा होत नाही. या जपामुळे मन अंतर्मुख होऊन राहते व विषयवासनांचा ऱ्हास होत जातो. मन आत्मतत्त्वात निष्ठावान व मूर्च्छित होऊन राहते. कामक्रोधांनी व्यथित होत नाही. प्राणप्रवाह बहुधा चालू असतो. परंतु श्वास प्रश्वास दीर्घ होत नाहीत. साधकाला साधनाला बसल्यावर दुसऱ्या क्रिया कमी होतात व हीच क्रिया मुख्य राहते. याच्याच बरोबर साधकाला सूक्ष्मनाद श्रवणगोचर होतात. कधी दूर व कधी जवळ असे येतात. परंतु या अवस्थेतही साधकाला आत काही दृश्य दिसत नाही. त्याचे मन शांत, शून्य व एकाग्र राहते. समयानुसार बाहेरची विस्मृती होते. परंतु या अवस्थेतही मनाला बाहेरच्या विषयांचे ग्रहण करण्याचे सामर्थ्यही असू शकते. या स्वतः प्रणव जपाच्या अवस्थेत मन धारणेत पूर्ण प्रतिष्ठित होते. त्याच योगाने साधक आलस्य व निद्रा यांना जिंकतो आणि त्याच्या शरीरांत नेहमी सत्त्वगुणाचा संचार असतो.

योगमायाकृत वैखरीक्रियेपासून प्रवर्तित स्वतः सिद्ध हा ॐ (ओम्) वर्णरूप म्हणता येत नाही. त्याला ध्वनिरूप म्हणण्याची आवश्यकता आहे. कारण षड्ज,

ऋषभ, गांधार, मध्यम, पंचम, धैवत आणि निषाद या सप्त स्वरांबरोबर याच्या ध्वनीचा संबंध प्रतीत होतो. परंतु स्वरांचा पृथक निर्देश होत नाही. म्हणून याला अद्‌भुत किंवा विचित्र म्हटले असता अत्युक्ति होणार नाही. स्वतः प्रणवजपात मनाची अवस्था मनच जाणते. सूक्ष्म प्रणव जपाच्या ध्वनीच्या स्वरांसंबंधी सांगणे आतापर्यंत कोणाही साधकाला शक्य झालेले नाही. साधक या क्रियेला अनाहत ओम् ध्वनी अथवा नादानुसंधान म्हणून मौन ठेऊन जातो. परंतु अनाहत हे ध्वनी व स्वतः प्रणव जपाचा ध्वनी यांच्यात साम्य आहे. कारण अनाहत ध्वनी दहा प्रकारचा असतो. प्राणवायू ब्रह्मरंध्रात जातेवेळी भेरी झरझरी शब्द ऐकू येतात व शेवटी प्राण ब्रह्मरंध्रात स्थिर झाल्यावर किंकिणी, वंशी, वीणा, भ्रमरादिकांचे शब्द ऐकू येतात. म्हणून नादानुसंधान व स्वतः प्रणव यात अवश्य भेद आहे. कारण नादानुसंधान स्थिर व चिरस्थायी असते व स्वतः प्रणवजप अस्थिर क्षणस्थायी असतो.

## प्रणव नाम ॐ (ओम्) लक्ष्यार्थ आहे

सर्व पदार्थांचे नाम वाच्यार्थ असते परंतु ज्याचे रूप लक्ष्यार्थ असते तसेच हे परम पवित्र ब्रह्माचे रूप ओम् (ॐ) जपादि साधन कालांत प्रणव नामाने वाच्यार्थ होते आणि जप केल्यानंतर स्थिती कालांत ब्रह्माचे रूप ॐ (ओम्) लक्ष्यार्थ असते. जसे कोणा एका व्यक्तीचे नाव हरी आहे. हरी शब्दाने हरीच्या रूपाचा बोध होत नाही. नावाचा बोध होतो. नाम वाचार्थ्य आहे. हरीची भेट झाल्यावर त्याच्या रूपाचा बोध होतो. ते त्याचे रूप लक्ष्यार्थ आहे. म्हणून योगदर्शनात सांगितले आहे, 'तस्य वाचकः प्रणवः' प्रणव ईश्वराचा वाचक आहे. अर्थात त्याच्या नावाचा प्रकाशक आहे. म्हणून तो वाच्यार्थ आहे. योगसाधन करून अथवा जपसाधन करून ईश्वराशी ऐक्य पावल्यावर (ओम्) ॐ लक्ष्यार्थ होतो. म्हणून प्रणव नाम असून ॐ वस्तू आहे. म्हणून पुनः सांगितले आहे की ''तज्जपस्तदर्थभावनम्''. प्रणवाचा जप करतेवेळी अर्थचिंतन करणेही आवश्यक आहे. यावरून स्पष्ट सिद्ध होते की, प्रणव नाम आहे आणि ॐ वस्तू आहे. हा ॐ स्वर व्यञ्जन वर्ण नाही. जो वर्णही नाही, तो ऱ्हस्व, दीर्घ अथवा प्लुत कसा होऊ शकेल ? म्हणून हा वर्णरूप प्रणव शब्द नामवाच्यार्थ आहे आणि ध्वनिरूप हा ॐ शब्द लक्ष्यार्थ आहे. हा हृदयग्रंथी भेदी ॐ चा विषय योगसाधनाने अनुभवगम्य आहे.

यन्नमस्यं चिदाख्यातं यत्सिद्धीनां च कारणम् ।
येन विज्ञातमात्रेण जन्मबन्धात्प्रमुच्यते ।।

अक्षरं परमोनादः शब्द ब्रह्मेति कथ्यते ।
मूलाधारगता शक्तिः स्वाधारा बिन्दुरूपिणी ।।
तस्यामुत्पद्यते नादः सूक्ष्मबीजादिवाङ्कुरः ।
तां पश्यन्तीं विदुर्विश्वं यया पश्यन्ति योगिनः ।।

**योगशिखोपनिषद् अध्याय ३**

जो चिद्रूप आहे, नमस्कार करण्याला योग्य आहे, जो सिद्धीचे कारण आहे, आणि ज्याच्या विज्ञानमात्राने जीव जन्ममरणाच्या बंधनापासून मुक्त होतो अशा अक्षर ॐ च्या ध्वनीच्या परम नादाला शब्द म्हणतात. मूलाधारचक्रस्थित बिंदुरूपिणी शक्तीपासून हा ध्वनिरूप ॐ प्रकट होतो. याचा साधकाला मूलाधारामध्ये परावाणी व नाभीमध्ये पश्यन्तीच्या रूपाने अनुभव येतो.

हृदये व्यज्यते घोषो गर्जत्पर्जन्य सन्निभः ।
तत्र स्थिता सुरेशाणि मध्यमेत्यभिधीयते ।।
प्राणेन च स्वराख्येन प्रथिता वैखरी पुनः ।
शाखापल्लवरूपेण ताल्वादि स्थानघट्टनात् ।।
अकारादिक्षकारान्तान्यक्षराणि समीरयेत् ।
अक्षरेभ्यः पदानि स्युः पदभ्यो वाक्य संभवः ।।
सर्वे वाक्यात्मका मन्त्रा वेदशास्त्राणि कृत्स्नशः ।
पुराणानि च काव्यानि भाषाश्च विविधा अपि ।।

हृदयात मध्यमावाणीत मेघगर्जनेप्रमाणे या ॐ च्या ध्वनीला ऐकतो. आणि हृदयस्थ प्राणाच्या साहाय्याने तालुमूलादि स्थानापासून शाखापल्लवरूपाने वैखरी वाणीने अकारापासून क्षकारापर्यंत अक्षरांचे शब्दद्वारा प्रकाश करतो. त्या अक्षरापासून पद व पदापासून वाक्य बनते. जितके मंत्र वेदशास्त्र पुराणादि आहेत ते सर्व आणि काव्ये व नाना प्रकारच्या देशदेशांतराच्या भाषा या सर्व वाक्यमय आहेत.

सप्तस्वराश्च गाथाश्च सर्वे नादसमुद्भवाः ।
एषा सरस्वती देवी सर्वभूतगुहाश्रया ।।
वायुना वह्नि युक्तेन प्रेर्यमाणा शनैः शनैः ।
तद्विवर्तपदैर्वाक्यैरित्येवं वर्तते सदा ।।
य इमां वैखरीं शक्तिं योगी स्वात्मनि पश्यति ।
स वाक्सिद्धिमवाप्नोति सरस्वत्याः प्रसादतः ।।
वेदशास्त्रपुराणानां स्वयं कर्ता भविष्यति ।

यांप्रमाणे सप्तस्वर आणि गाथा या सर्व ध्वनिरूप नादापासून उत्पन्न होतात. यांना उत्पन्न करणारी सरस्वती देवी सर्वांच्या हृदयांत स्थित आहे. कुंडलिनी शक्तीमुळे प्राण व अग्नीच्या प्रेरणेने याचा साधकाला क्रमाने अनुभव येतो. हीच वैखरी शक्ती विवर्तरूप होऊन वाक्यरूपाने प्रकट होते. जो साधक या वैखरी शक्तीला आपल्या ठिकाणी पाहतो, त्याला सरस्वतीच्या कृपेने वाक्सिद्धी प्राप्त होते व तो स्वयं वेद शास्त्र पुराणांचा कर्ता होतो.

## दिव्यरूप दर्शन

यदा कुण्डलिनी शक्तिराविर्भवति साधके ।
तदा स पञ्चकोशे मत्तेजोऽनुभवति ध्रुवम् ।।
ततस्तु तपसि ध्यानी पश्यति ज्योतिरैश्वरम् ।
श्वेतं रक्तं तथा पीतं कृष्णमिन्द्रायुधप्रभम् ।।
भ्रुवोर्मध्ये ललाटस्थं बालार्कसम तेजसम् ।
दर्शनं नाम दिव्यानां दर्शनं चाप्रयन्ततः ।।

**सूर्यगीता तथा उमा संहिता अध्याय २७**

ज्या वेळी कुंडलिनी शक्ती साधकाच्या ठिकाणी क्रियारूपाने प्रकाशित होते त्या वेळी त्याला अन्नमयादि (अन्नमय, प्राणमय, मनोमय इत्यादी) पंचकोशांच्या ठिकाणी माझ्या सूर्यरूप ज्योतिर्मय तेजाचा निश्चयपूर्वक अनुभव येतो. ध्यानसमयी साधकाला अंधकारमय अंतराकाशात ज्योतिरूप ईश्वराचे दर्शन होते. ती ज्योती शुभ्र, तांबडी, पिवळी, काळी, इंद्रधनुष्याप्रमाणे नाना प्रकारच्या रंगांची असते. ती ज्योती भ्रूमध्ये ललाट देशाचे ठिकाणी प्रातःकाली उदित सूर्याप्रमाणे दिसते. याचेच नाव दिव्यदर्शन आहे व ते प्रयत्नाशिवाय आपोआप होते. ''विषयवती वा प्रवृत्तिरुत्पन्ना मनसः स्थिती निबंधिनी, विशोका वा ज्योतिष्मती ।।''

ज्या वेळी याप्रमाणे कुंडलिनी शक्तीच्या प्रेरणेने क्रिया करता करता साधकाचे शरीर, मन, प्राण उत्कर्षसाधन करतात त्या वेळी मनाच्या स्थिरतेला कारण असणारी विषयवती प्रवृत्ती उत्पन्न होते. त्या वेळी साधकाच्या चित्ताच्या स्थिरतेकरिता अंतरात दिव्य वस्तू अथवा ज्योती स्वयं प्रकट होते. त्या दिव्य ज्योतीला पाहून मन स्वभावतःच त्याच्या ठिकाणी लागते. व साधक साधनाच्या फलाच्या चिंतेसंबंधी शोकरहित होतो. प्रकाशमान दिव्य ज्योतीचे दर्शन होताच साधकाच्या चित्ताला त्याच्यामध्येच महासुखाचा अनुभव होतो.

## दिव्यदर्शनाचे प्रकार

एतेष्वथारविन्देषु यत्रैवाभिरतं मनः ।
तत्रैव देवं देवीं च चिन्तयेद् धीरया धिया ।।
अंगुष्ठमात्रमलं दीप्तमानं समन्ततः ।
शुद्धदीपशिखाकारं स्वशक्त्या पूर्णमण्डितम् ।।
इन्दुरेखा समाकारं तारारूपमथापि वा ।
नीवारशूकसदृशं विससूत्राभमेव वा ।।
कदम्बगोलकाकारं तुषारकणिकोपमम् ।।

**वायवीय संहिता अध्याय ३८**

या ज्योतीचे दर्शन कित्येक प्रकारांनी होते जसे विद्युत् चमक, विद्युत प्रकाश, नक्षत्रदर्शन, चंद्र सूर्य अग्नीचे दर्शन, कोट्यवधी सूर्याच्या ज्योतीप्रमाणे उग्रदर्शन तसेच अत्युग्र अशा महाज्योतीचे दर्शन होते व त्या ज्योतीचे रंगही नाना प्रकारचे असतात. याशिवाय प्रज्वलित अग्निशिखा, दीपशिखा, बिंदूप्रमाणे, काच, स्फटिक, मणी आणि काजव्याप्रमाणे लहानमोठ्या रूपरंगांचे दर्शन होते. कधी ताऱ्यांनी भरलेले आकाश, नीलाकाश, धूम, शीकर, अंधकार आणि महाथोर अंधकाराचे दर्शन होते. साधन करता करता साधकाचे मन जितके सूक्ष्म विषयप्रवाही होते तितके सूक्ष्मातिसूक्ष्म दर्शन होते.

सिद्धं वा स्वगुरुदेवं प्रसन्नतां च कुमारिकाम् ।
गंगा भागीरथीं भानु लिङ्गीनां लिङ्गमैश्वरम् ।। **शारदा तिलक मंत्र**

याप्रमाणे ज्ञान, योग, भक्ती आदि कोणत्याही मार्गाने तपस्या करीत राहिल्याने कुंडलिनी शक्ती जागृत झाल्यामुळे अथवा ईश्वरपरायणतेमुळे चित्त शुद्ध झाल्यावर साधकाला वर सांगितलेल्या शिवाय सिद्ध पुरुषांचे दर्शन, आपल्या गुरुदेवांचे दर्शन तसेच ब्रह्मा, विष्णू, महेश्वर अथवा आपल्या इष्ट देवतांचे दर्शन आणि गंधर्व, अप्सरा, विद्याधर, पन्नग, यक्ष, राक्षस, किन्नरादि देवतांचेही दर्शन होते. योग, ज्ञान, ध्यानपरायण, सात्त्विक भावापन्न साधकांना प्रायः संन्यासी, ब्रह्मचारी, शिवलिंग अथवा अन्योन्य देवतांच्या प्रतिमेचे दर्शन ध्यानसमयी अमनस्क अवस्थेत, जागृतीत अथवा स्वप्नातही होते. विशेषकरून साकार उपासक भक्तिप्रधान साधकांनाच ही दर्शने अधिकतर होतात.

कन्यां छत्रं रथं दीपं प्रासादं कमलं नदीम् ।
कुञ्जरं वृषभं माल्यं समुद्रं फणिनं द्रुमम् ।।
पर्वतं च हयं मेद्यमाममांसं सुरासवम् ।
एवमादीनी सर्वाणि दृष्ट्वा सिद्धिभवाप्नुयात् ।।

जे साधक कामनापूर्वक देवतेच्या चैतन्य मंत्राचा जप अथवा गुरुप्रदत्त शक्तीची आराधना करतात त्यांना त्यांच्या कामनासिद्धीची सूचक अशी वरील दर्शनाप्रमाणेच बालक, कुमारी, छत्र, रथ, दीप, प्रासाद, देवमंदिर, राजगृह, पद्म, नदी, हत्ती, घोडा, बैल, माल्य, समुद्र, फलित वृक्ष, पर्वत, प्रज्वलित अग्नी, कच्चे मांस, आसव, ग्रह, नक्षत्र, चंद्र, सूर्य, रत्न, अलंकार, सिंहासन, आकाशगामी विमान, ध्वज, राज्याभिषेक, शुभ्रचंदन, शुभ्रवस्त्र, धान्य, कुंकुम, मधु, पांढऱ्या मोहऱ्या, राजा आणि पुष्कळशा स्त्रिया या सर्व मंगलादायक वस्तू साधकांना स्वप्नात अथवा ध्यानकाळी स्वप्नासारख्या अवस्थेत दिसतील तर त्यांच्या मंत्राची सिद्धी लवकर होते.

याच्याशिवाय नवे पात्र, खीर, फल, सिद्ध अन्न, दही, दूध, वाद्ययंत्र, सुंदर स्त्रिया, ब्राह्मण, गाय, हंस, कबूतर, चाष, (नीलकंठ) मोर, नकुल, शृगाल, मृग, बेडूक, पुष्प, सद्वाक्य, अंजन, जलपूर्ण कलश, दर्पण तसेच मीन, मद्य, भक्षण, अंजन रोदनहीन शव, इक्षु पताका, वेदध्वनी, यान, चाबूक, अंकुश, मंगलगीत, सैनिक आणि आपल्या प्रियजनांचे दर्शन, तसेच सूर्योदय, चंद्रग्रहण, सूर्यग्रहण इत्यादी स्वप्नामध्ये दिसतात. मोठमोठी घरे, श्रीमंतांचे वाडे, राजवाडा व देवमंदिरात जाण्याचे अथवा हत्तीवर, घोड्यावर, बैलावर बसल्याचे त्याचप्रमाणे पर्वतावर चढण्याचे, अग्नीत प्रवेश करण्याचे स्वप्न साधकाला दिसते. याशिवाय भयजनक स्वप्नेही होतात. पुष्कळ स्त्रियांसह भोजन करणे, पक्व मांस खाणे, शरीराला कीड लागल्याप्रमाणे पाहणे, विष्ठेचा लेप करणे, रक्ताने स्नान करणे, रक्तपान करणे, मद्यपान करणे, कच्चे मांस खाणे, इत्यादी प्रकारची भयंकर स्वप्नेही पडतात. ही सर्व स्वप्ने मंत्रिसिद्धीची सूचक असतात. कामनासिद्धीकरिता शास्त्रांत ही सर्व मंगलरूप सांगितली आहेत.

याप्रमाणे निष्कामतेने अथवा कामनायुक्त होऊन कुंडलिनी शक्तीच्या जागृतीने साधन करणाऱ्या साधकांना प्रायः स्वप्नामध्ये देवांच्या प्रतिमांचे दर्शन, देवतांचे उत्सव, संकीर्तन, शंख, तासघंटावाद्य, उत्तम कथांचे श्रवण, आणि अतिरमणीय मनोहर दिव्य स्थानांचे दर्शन होते. साधक आपण आकाशात बुडत आहो असे पाहतो. ही सर्व लक्षणे शुभ व सिद्धिदायक आहेत. कारण कुंडलिनी शक्तीच्या जागृतीने आतील द्वार मोकळे झाल्याने मन ज्या ज्या वेळी अंतरजगात जाते त्या त्या वेळी चालता, फिरता, बसता, क्रिया करताना अथवा निद्रेत आपापल्या संस्काराप्रमाणे विशेषतः श्रद्धाभक्तियुक्त साधकांना प्रायः अशी दृश्ये दिसतात.

## दिव्य शब्द नादोत्पत्ती

उक्तात्मभानतः पूर्वं पश्चात् च विविधः कपे ।
अभिव्यजन्त एतस्य नादस्तत्सिद्धि सूचकाः ।।

अनाहतमनुच्चार्यं शब्दब्रह्म परं शिवम् ।
तस्मात् शब्दा नव प्रोक्ताः प्राणविद्भिस्तुलक्षिता ।।

**राम गीता तथा उमा संहिता अ. २६**

अंतरात ज्योतिरूप आत्म्याच्या प्रकाशापूर्वी किंवा पश्चात, साधक नाना प्रकारचे शब्द ऐकतो. हे नादशब्द व्यक्त व अव्यक्त असे दोन प्रकारचे असतात. ज्या शब्दांना बाहेरच्या कोणत्याही शब्दाची उपमा देता येत नाही, त्यांना अव्यक्त म्हणतात. आणि जे शब्द तास, घंटेप्रमाणे स्पष्ट प्रतीत होतात त्यांना व्यक्त म्हणतात. हे शब्द वर्णात्मक आणि ध्वन्यात्मक असे नाना प्रकारचे असतात. आघाताशिवाय किंवा उच्चाराशिवाय जे शब्द अंतरात स्वतः होतात त्यांना मंगलदायक शब्दब्रह्म म्हणतात. शब्दब्रह्म अनाहत ध्वनीचे लक्ष्य करणारे योगी या नादांचे नऊ प्रकार सांगतात. योगशास्त्रात नाद असंख्य प्रकारचे सांगितले आहेत परंतु योगसाधन करणारे यांना नियमित संख्यारूपाने (ऐकून) ते अनुभव घेतात.

## जाबालदर्शन तथा योग चूडामण्युपनिषद्

आकाशं धारणायास्य व्योम सूक्ष्मं प्रवर्तते ।
पश्यते मण्डलं सूक्ष्मं घोषश्चास्य प्रवर्तते ।।
ब्रह्मरन्ध्रं गते वायौ नादश्चोत्पद्यतेऽनघ ।
शंखध्वनि निभश्चादौ मध्ये मेघध्वनिर्यथा ।।
पवने व्योम सम्प्राप्ते ध्वनिरुत्पद्यते महान् ।
घण्टादीनां प्रवाद्यानां ततः सिद्धिरदूरतः ।।

योगसाधनात मन ज्या वेळी आकाशतत्त्वांत जाते त्या वेळी सूक्ष्म आकाशापासून नाद उत्पन्न होतात. त्या वेळी साधकाला सूक्ष्म शून्यरूप ज्योतीचे दर्शन होते व शब्द ऐकू येतात. जेव्हा प्राणवायू ब्रह्मरंध्रात जातो तेव्हा मेघध्वनी व शंखध्वनिसदृश शब्द ऐकू येतो. अंतराकाशात प्राण गेल्याने हा महान ध्वनी होऊ लागतो. घंटेप्रमाणे वाद्ये वाजू लागतात. हे शब्द योगसिद्धीचे सूचक आहेत. असे होऊ लागले म्हणजे योग सिद्धी दूर नाही असे समजावे.

## दिव्य नादाचे प्रकार

आदौ जलधिजीमूत भेरीझरझर संभवाः ।
मध्ये मर्दल शंखोत्था घण्टाकाहलजास्तथा ।।
अन्ते तु किङ्किणि वंश वीणा भ्रमर निःस्वनाः ।
इति नानाविध नादाः श्रूयन्ते देहमध्यगाः ।।

**हठयोग प्रदीपिका चतुर्थ उपदेश ।**

हे नाद समुद्राच्या गर्जनेप्रमाणे, मेघगर्जनेप्रमाणे, धबधब्याप्रमाणे, गाडीच्या शब्दाप्रमाणे, जळणाऱ्या अग्नीप्रमाणे ऐकू येतात. अथवा भेरी, काहल, दुंदुभी, मार्दल, मृदुंग, शंख, घंटा, किंकिणी, कांस्य, झांझर, करताल व वंशी, वीणा इत्यादी वाद्यांप्रमाणे होतात. अथवा वृषभ, मयूर, भ्रमर,मधुमक्षिका, झिनझिन, चिन चिणी, आदि पशुपक्षी कीट पतंगाच्या शब्दाप्रमाणे स्त्रियांचे गीताप्रमाणे किंवा पुष्कळशा लोकांच्या कोलाहलाप्रमाणे घोष शब्दही ऐकू येतो. यात चिन, किंचिण, घंटा, शंख, वीणा, करताल वंशी, मृदुंग, भेरी आणि मेघ हे नाद मुख्य आहेत.

## दिव्य नादश्रवणाचे फळ

प्रथमे चिञ्चिणी गात्रं द्वितीये गात्रभञ्जनम् ।
तृतीये स्वेदनं याति चतुर्थे कम्पते शिरः ।।
पञ्चमे स्रवते तालु षष्ठेऽमृतनिषेवणम् ।
सप्तमे गूढविज्ञानं परा वाचा तथाष्टमे ।।
अदृश्यं नवमे देहं दिव्यं चक्षुस्तथामलम् ।
दशमे परमं ब्रह्म भवेदब्रह्मात्मसंनिधौ ।। **हंसोपनिषत्**

प्रथम चिणनाद प्रकट झाल्याने शरीरात झनझन होते. दुसरा चिञ्चिण नाद झाल्याने शरीर तुटू लागते. तिसऱ्या घंटानादाने प्रस्वेद येतो. चवथ्या घंटानादाने मस्तक कापू लागते. पाचव्या तंत्रीनादाने तालूपासून अमृत ठिपकते. सहाव्या करतालनादाने अमृताचे आस्वादन होते. सातव्या अंशी नादाने गूढ विषयाचे ज्ञान होते. आठव्या मृदंग नादाने परावाणीचे ज्ञान होते. व त्यामुळे वाक्सिद्धी होते. नवव्या भेरी नादाने शरीराची सुंदरता, अदृश्यत्व सिद्धी व आवरणरहित दिव्य दृष्टी प्राप्त होते. आणि दहाव्या मेघनादाच्या श्रवणाने साधक समाधीत ब्रह्माशी एकताप्राप्त होऊन ब्रह्मरूप होतो.

नव शब्द परित्यज्य ॐकारान्तु समाश्रयेत् ।
ध्यायन्नेवं सदा योगी पुण्यपापैर्न लिप्यते ।।
नाद कोटि सहस्राणि बिन्दु कोटि शतानि च ।
सर्वे तत्र लयं यान्ति ब्रह्म प्रणव नादके ।।

**उमासंहिता अध्याय २६ तथा नादबिन्दुउपनिषद् ।**

साधकाने उपरोक्त नऊ नादांचा त्याग करून मेघाप्रमाणे केवल ध्वनिरूप ॐकाराचाच आश्रय करून रहावे. ॐकारध्वनी आपोआप उत्पन्न झाल्यावर दुसऱ्या कोणत्याही नादात मन लावण्याची आवश्यकता नाही. ॐकाराचे नादरूपाने ध्यान करीत राहिल्याने योगी लोक पापपुण्याने लिप्त होत नाहीत व मोक्षाला जातात. हजारो कोटी नाद आणि शतकोटी बिंदुरूप ज्योती ही सर्व ब्रह्मरूप ॐकाराच्या नादात लय पावतात.

ॐकारमधिकृत्याशु योगी ध्वन्यात्मकं मम ।
सत्यलोकावधिं प्राप्तुं शक्नुयातकोऽत्र संशयः ।।
कर्मनिष्ठमहात्मानो योगनिष्ठास्तथामराः ।।
ॐकाराश्रयतो नूनं देवयानगतिं गताः ।
यस्मान्न पुनरावृत्तिस्तं लोकं प्राप्तुमीशते ।। **शक्ति गीता**

केवळ माझ्या ध्वनिरूप ॐकाराचा आश्रय करून योगी लोक सत्यलोकाला प्राप्त होतात यात काही संशय नाही. जे महात्मे लोक वैदिक कर्म उद्‌गीथ उपासनापरायण अथवा योगपरायण आहेत ते ॐकाराचा आश्रय करून देवयान गतीने मोक्षाला जातात. म्हणून पुनरावृत्तिरहित अशा लोकाची इच्छा करणारे साधक ॐकाराची उपासना करून मोक्षाला जातात.

## दिव्य स्पर्श ज्ञान

अनन्तज्ञाननिलयां यां भजन्ति मुमुक्षवः ।
सुप्ता सर्पोपमा मौला पाति साधकमीश्वरी ।।
चैतन्या कुण्डलीशक्तिर्वायवी बलतेजसा ।
चैतन्या सिद्धिहेतुस्था ज्ञानमात्रं ददाति सा ।
ज्ञानमात्रेण मोक्षः स्याद्वायवी ज्ञानमाश्रयेत् ।।

**रुद्रयामल तंत्र पटल १५**

अनंत ज्ञानाचे आलय असे जे मूलाधार चक्र, त्या ठिकाणी सुप्त नागिणीप्रमाणे असलेली कुंडलिनी शक्ती साधकाचे पालन व रक्षण करते. म्हणून मोक्षेच्छू साधक प्राणायामाने तिचेच भजन करतात. आणि ती वायवी शक्ती कुंडलिनी साधकांच्या भजन प्राणायामाने जागृत होते आणि क्रियाशील होऊन सिद्धीला कारण होते व साधकाला आनंदस्वरूप आत्मज्ञान प्रदान करते. कारण केवळ ज्ञानानेच मोक्ष होतो, म्हणून साधकांनी वायवी शक्ती कुंडलिनी ज्ञानाचा आश्रय करावा.

प्रबुद्धा वह्नियोगेन मनसा मरुता सह ।
सूचीवद्‌गात्रमादाय व्रजत्यूर्ध्वं सुषुम्णया ।।

यथा कुण्डलिनी देहे स्फुरत्यब्ज इवालिनी ।
तथा संविदुदेत्यन्तर्मृदुस्पर्शवशोदया ।। **योगचूडामण्युपनिषद्**

तिचा आश्रय केल्याने ती जागृत शक्ती अग्नी, मन आणि प्राणासहित सुषुम्नेत प्रवेश करून वर चढू लागते. ज्याप्रमाणे सुई वस्त्राला स्पर्श करीत व वेध करीत जाते तशी कुंडलिनी शक्ती मूलाधारापासून सुषुम्नेतील चक्रांचा वेध करीत ब्रह्मरंध्रात जाते.

त्या वेळी साधकाला तिच्या शरीरातील स्पर्शाचा अनुभव येतो. ज्या वेळी याप्रमाणे कुंडलिनी शक्ती जागृत होऊन क्रिया करू लागते त्या वेळी भ्रमर जसा कमळावर मृदुमृदु विचरण (विहरण) करतो तसा मृदू व कोमल महासुखकर दिव्यस्पर्श साधकाला अनुभव येतो. हा स्पर्श आवश्यकतेनुसार कोमल अथवा कठोरही असतो.

## दिव्य रस

रेचकं पूरकं मुक्त्वा वायुना स्थीयते स्थिरम् ।
नाना नादाः प्रवर्तन्ते संस्रवेच्चन्द्रमण्डलम् ।।
समाकुंच्याभ्यसेद्योगी रसनां तालुकं प्रति ।
किंचित्कालान्तरेणैव क्रमात्प्राप्नोति लम्बिकाम् ।।
ततः प्रस्रवते सा तु संस्पृष्टा शीतलां सुधाम् ।
पिबन्नेव सदा योगी सोऽमरत्वं हि गच्छति ।।

**योगशिखोपनिषद् तथा धर्मसंहिता**

ज्या वेळी योगसाधन करणाऱ्या साधकाला कुंडलिनी शक्तीच्या प्रेरणेने अथवा प्राणायामाच्या अभ्यासाने रेचक पूरकाचा त्याग होऊन केवल कुंभक होऊ लागतो व त्यामुळे प्राण स्थिर होतो, त्या वेळी नाना प्रकारचे नाद होऊ लागतात व मस्तकातील चंद्र मंडळापासून अमृत स्राव होऊ लागतो. आत्मशक्तीच्या उद्‌बोधानंतर खेचरी क्रिया झाली असता असे पाहण्यात आले आहे की साधकाची जीभ उलट होऊन तालूस जाऊन लागते व वर खेचली जाते. त्या वेळी गळ्याच्या आणखी क्रिया अशा होतात की त्या वेळी ही जीभ पडजीभेला वर करते, त्या वेळी अकस्मात सुधारसाचे पान होते. अथवा हीच जीभ आभ्यंतरिक क्रिया शक्तीच्या योगाने तालूत जाऊ लागते. त्या वेळी सहस्रारांतून शीतल चंद्रामृतांचे क्षरण होते. त्याने साधक नखशिखांत शांत होतो. व अभ्यासाने नित्य अमृतपान करीत राहिल्याने त्याला अमरत्व प्राप्त होते.

## दिव्यरसाचे प्रकार

आदौ लवणं क्षारश्च ततस्तिक्त कषायकम् ।
नवनीतं घृतं क्षीरं दधितक्रमधूनिच ।।
द्राक्षारसश्च पीयूषं जायते रसनोदकम् ।।

मनोलयं यदा याति भ्रूमध्ये योगिनां नृणाम् ।
जिह्वामूलेऽमृतस्रावो भ्रूमध्ये चात्मदर्शनम् ।।

**घेरण्डसंहिता तथा याज्ञवल्क्य संहिता**

याप्रमाणे खेचरीत अमृतपान होते. त्याचा स्वाद प्रथम लवण, क्षारयुक्त व कटु कषाय असा असतो. मधे लोणी, तूप, दही व ताक याप्रमाणे असतो. व शेवटी मध व द्राक्षाच्या रसाप्रमाणे अमृतपान होते. योगसाधन करीत राहिल्याने ज्या वेळी साधकाचे मन आज्ञाचक्रांत लय पावून भ्रूमध्यात आत्मदर्शन होते त्या वेळी जिह्वामूलात अमृतस्राव होऊन त्याला रसपान होते.

## दिव्यरसाचे गुण

रसनास्वाद भेदेन विशेषं श्रुणु पार्वति ।
क्षारेण नश्यति व्याधिः कटुना कुष्ठनाशनम् ।।
अम्लकेन महादेवि वलिपलितवर्जितः ।
मधुस्वादुरसाद्देवि शास्त्रमुद्गीर्यते ध्रुवम् ।
घृत स्वादु रसाद्देवि अमरत्वं प्रजायते ।।

**योगसागर**

श्री महेश्वर सांगतात, हे पार्वती, लवणादि क्षार रसाने रोगनाश होतो. आम्लाने वलीपलिताचा नाश होतो. मधुरसाने शास्त्रज्ञानाचा प्रकाश होतो व घृतरसास्वादाने अमरत्व-मोक्षाची प्राप्ती होते.

## दिव्य गंध

दिव्यं स्तम्भं तमाकर्षेद् गन्धो नासान्तिको भ्रुवः ।
गन्धलीनं मनः कृत्वा स्तम्भयेन्नान संशयः ।।

**अग्नि पुराण**

दिव्यगंधाचे स्थान भ्रूमध्यापासून नासाग्रापर्यंत आहे. गंधात मन लीन झाल्याने स्तंभित होते. पंचविषय बाहेर दुःखदायी व बंधनकारक आहेत. परंतु याच पंचविषयांच्या योगसाधनाने अंतरात अनुभव करून घेतल्याने ते बंधनकारक न होता उलट मोक्षाला कारण होतात. श्रीमहेश्वरकथित वास्तविक ज्ञानाला न जाणून बाह्य भोग भोगणे दुःखदायक आहे. परंतु ईश्वरपरायण साधकाला अंतरविषय सुखदायक होतात.

# ✦ त्रयोदश प्रकाश ✦

## ब्रह्माची तीन शरीरे

नाडीचक्रमिति प्रोक्तं बिंदुरूपमतः श्रृणु ।
स्थूलं सूक्ष्मं परं चेति त्रिविधं ब्रह्मणो वपुः ।।
स्थूल शुक्लात्मकं बिन्दुः सूक्ष्मं पञ्चाग्निरूपकम् ।।
भ्रूमध्यनिलयो बिन्दुः शुद्धस्फटिकसन्निभः ।।
महाविष्णोश्चदेवस्य तत्सूक्ष्मं रूपमच्युते ।
सोमात्मकः परः प्रोक्तः सदासाक्षी सदाच्युतः ।।

**योगशिखोपनिषत् अध्याय ५**

श्री महेश्वर ब्रह्मदेवाला नाडी चक्राचे वर्णन करून आता ब्रह्माच्या ज्योतिस्वरूपाचे स्थूल, सूक्ष्म आणि पर अशा तीन शरीराचे वर्णन करतात. ब्रह्माचे जीवरूप स्थूल शरीर, ज्योतिरूप बिंदू, शुक्ल अर्थात शुक्रात्मक शुभ्रज्योती आहे ज्याला योग साधन करणारे धारणाज प्रज्ञेने ध्याता, ध्यान आणि ध्येयरूपाने आपल्या अंतरात प्रत्यक्ष पाहतात. दुसरे ब्रह्माचे सूक्ष्म शरीर पंचाग्निरूप म्हटले जाते. अर्थात कालाग्नी, वडवाग्नी, पार्थिव अग्नी, विद्युत् आणि सूर्य, चंद्र, नक्षत्र इत्यादींमध्ये भौतिक अग्नी जो स्थूल रूपाने बाहेर ब्रह्मांडांत व्याप्त आहे व सूक्ष्मरूपाने अंतर्जगत पिंडामध्ये आहे. पृथ्वीचे खाली पाताळात राहणाऱ्या अग्नीला कालाग्नी म्हणतात. तोच सूक्ष्मरूपाने शरीरांत मूलाधारस्थित कुंडलिनी शक्ती अग्नीच्या तेजःपुंज रूपाने प्रतिष्ठित मूलाग्नी आहे. त्याच्यापासून नाद उत्पन्न होतो. समुद्र व पाण्यात राहणाऱ्या अग्नीला वडवाग्नी म्हणतात; तो शरीरात अस्थीत रहात असून त्याच्यापासून शुक्रमज्जादि उत्पन्न होतात. काष्ठपाषाणात राहणारा दावानल पार्थिव अग्नी आहे. तो शरीरातील कठीण पदार्थांत अस्थीत व आतड्यात राहतो. त्याने बल, दृढता व पाचनक्रिया होते. चौथा विद्युत् अग्नी मेदात राहतो. तो शरीरात व हृदयाकाशात आत्मरूपाने अवस्थित आहे. तो ध्यानाने विजेप्रमाणे दृष्टिगोचर होतो. पाचवा सूर्याग्नी, तो नाभिस्थानी राहून शारीरिक क्रिया संपादन करतो. हेच ब्रह्माचे व्यापक महाविष्णुरूप सूक्ष्म शरीर भ्रूमध्यात शुद्ध स्फटिकाप्रमाणे नीलज्योतिर्मय बिंदुरूप योग साधना करणाऱ्यांना दिसते. तिसरे ब्रह्माचे पररूप कारण शरीर सोमात्मक आहे. ते सहस्रार-स्थित चंद्रामृताने परिपूर्ण नित्यतृप्त सदा अच्युत, सर्वदा साक्षीभूत परब्रह्माचे महान ज्योतिर्मय पररूप आहे. त्याला योगी समाधिज प्रज्ञेने ध्याता ध्यानवृत्तीचा त्याग करून ध्येयाकार तद्रूप होऊन पाहतात.

म्हणून ब्रह्माचे स्थूल शरीर ज्योतिर्मय शुक्रात्मक शुभ्रबिंदू शुक्लरूप धारणेपासून उत्पन्न झालेल्या प्रज्ञेने ध्याता ध्यान ध्येयरूप त्रिशुद्धिसहित पाहिले जाते; आणि ब्रह्माचे सूक्ष्म शरीर पंचाग्निरूप ज्योतिर्मय नील बिंदू, महाविष्णुरूप, धारणेच्या परिपक्वतेनंतर ध्यानज प्रज्ञेने ध्यान व ध्येय रूपाने दिसते. ब्रह्माचे पररूप कारणशरीर सोमात्मक सच्चिदानंद स्वरूप ध्यानाच्या परिपक्वतेनंतर समाधी प्रज्ञेने ध्येयाकार तद्रूपतेने अनुभवगम्य होते.

योग, जपतप, पाठपूजन, भक्ती, श्रद्धा आदि सत्कर्म करणाऱ्या साधकांना आपल्या अंतरात ब्रह्माचे ज्योतिर्मय ब्रह्माचे स्थूल सूक्ष्मरूप स्वतः प्रकाशित होते. त्याला शास्त्रात कोणी शिव, कोणी विष्णू, कोणी शक्ती, कोणी आत्मा, कोणी परमात्मा, कोणी ओंकार अथवा परब्रह्म परतत्त्व, तसेच कोणी कुंडलिनी महाशक्ती आणि कोणी आपले उपास्य देवी दैवतांचे नावाने संबोधितात. ते परब्रह्म शिवच सर्वत्र विराजमान आहे. म्हणून द्वैतभावना करणे ठीक नाही. याचे वास्तविक ज्ञान समाधीनेच होते. परंतु साधना करणाऱ्यांना समाधीपूर्वी धारणा व ध्यानाने पापक्षय होऊन मन एकाग्र झाल्यावर नादबिंदू कला ज्योतिरूपाने ब्रह्माचे दर्शन क्षणिक प्राप्त होते.

## कलारूप ब्रह्मज्योती दर्शन

अग्निः कला सूर्यः कला विद्युत् कला ।
एष वै सौम्य चतुष्कलः पादोः ब्रह्मणो ज्योतिष्मान्नाम ।।
अकल्पितोद्भवं ज्योतिः स्वयं ज्योति प्रकाशितम् । ७-३-४
अकस्माद्दृश्यते ज्योतिस्तज्ज्योतिः परमात्मनि ।।१।।
स्व शरीरे स्वयं ज्योतिः स्वरूपं पारमार्थिकम् ।
क्षीण दोषाः प्रपश्यन्ति नेतरे माययावृताः ।।३३।।

**छान्दोग्य तथा पाशुपत ब्रह्मोपनिषद्**

अग्नी, सूर्य, चंद्र आणि विद्युत या चार ब्रह्माच्या कला-अंश आहेत. यांना वेदांत ब्रह्माचे ज्योतिरूप पाद म्हटले आहे. योगसाधन करणाऱ्यांना या ज्योतिर्मय रूपाने दिसतात. ही ब्रह्मज्योती कल्पनेशिवाय प्रकट होते. अशी स्वयंप्रकाशज्योती अकस्मात दिसते. अशी आपोआप कल्पनेशिवाय ध्यानात येणारी ज्योती परमात्म्याच्या ठिकाणी व्यवस्थित आहे. म्हणून आपल्या शरीरात आपोआप जी ज्योती प्रकाशित होते तिला परमार्थात ब्रह्मरूप म्हटले आहे. त्याने ज्याचे पाप क्षीण झाले आहे अशा पुण्यात्म्यांना ती ज्योती दिसते. मायेने आवृत इतर लोक ती पाहू शकत नाहीत.

## बिन्दुरूप ब्रह्मज्योतिदर्शन

बिन्दुब्रह्म सकृद् दृष्ट्वा मनस्तस्मिन्नियोजयेत् ।
स्वयमेव तु संपश्येद्देहे बिन्दु च निष्कलम् ।।१।।
भ्रूदहरादुपरि सच्चिदानंद तेजः कूटरूपम् ।
परब्रह्म अवलोकयन्तद्रूपोभवति गर्भजन्मजरामरण
संसारभयात्संतारयति तस्मात्तारकमिति ।।१।।

**घेरण्ड संहिता तथा अद्वयतारकोपनिषद्**

या शरीरात अग्नी, विद्युत, सूर्य, चंद्र व श्वेतस्फटिक सदृश प्रकाशमान बिंदू आहे. या पाचज्योतींचा ब्रह्माचे सूक्ष्म शरीर म्हणून बिंदुरूप ब्रह्माला पाहून त्या ठिकाणी मन लावले पाहिजे. त्याचेच ध्यान केले पाहिजे व दुसरे काही पाहण्याची साधकाने इच्छा करू नये. ज्योतिरूप बिंदुच आपले इष्ट दैवत अशी भावना ठेवावी. आपल्या ठिकाणी बिंदुरूप निष्कलब्रह्माला साधक पाहतो. म्हणून दुसऱ्या देवीदेवतांची कल्पना अथवा भावना करण्याची आवश्यकता नाही. भ्रूमध्यावर सच्चिदानंदमय तेजराशी आहे त्याला परब्रह्म म्हणतात. त्याला पाहता पाहता साधक ब्रह्मरूप होऊन जातो आणि त्या योगाने गर्भ, जन्म, जरा, मृत्यू आणि भय यांपासून मुक्त होतो. म्हणून उपनिषदात त्याला तारक ब्रह्म अथवा तारक योग म्हटले आहे.

## आत्मरूप ब्रह्मज्योती दर्शन

अंतःकरण मध्ये तु ज्योतिरात्मा प्रवर्तते ।
लिंगदेहं तु तं प्राहुर्योगिनस्तत्त्ववेदिनः ।।
तत्प्रतीतौ भवेन्मुक्तिर्नान्यतो जन्मकोटिभिः ।।१।।
तदा लक्षणमात्मनो ज्योतिरूपं प्रपश्यति ।।
तत्तजो दृश्यते येन क्षणमात्रं निरानिलम् ।
सर्वपापविनिर्मुक्तः स याति परमां गतिम् ।।१।।

**गौतमीय तंत्र तथा शिव संहिता ।**

हा आत्मा अंतरात ज्योतिरूपाने प्रकाशित होऊन राहिला आहे. याला तत्त्ववेत्ते लोक लिंग हे देहसूक्ष्मशरीर म्हणतात. याचे प्रत्यक्ष दर्शन झाल्याने मुक्ती होते. म्हणून जोपर्यंत मुक्तिरूप आत्म्याचे प्रत्यक्ष दर्शन अंतःकरणांत होत नाही तोपर्यंत कोट्यवधी जन्म झाले तरी मोक्ष प्राप्त होत नाही. ध्यानपरायण योगी बाह्य

नेत्र बंद करून अंतःचक्षु दिव्यदृष्टीने ज्योतिरूप आत्म्याला पाहतात. क्षणमात्रही ते तेज निर्मल व स्पष्ट भावाने पाहिले असता सर्व पाप जळून परमगतीची प्राप्ती होते.

विधूम इव दीप्तार्चिरादित्य इव दीप्तिमान् ।
विद्युतोऽग्निरिवाकाशे पश्यन्त्यात्मानमात्मनि ।।१।।
नेत्रे पश्यति यज्ज्योतिस्तारारूपं प्रकाशकम् ।
स जीवः सर्व भूतानामात्मानं च समाहितः ।।१।।
यदा प्रकाशते ह्यात्मा घटे दीपो ज्वलन्निव ।
ज्ञानमुत्पद्यते पुसां क्षयात्पापस्य कर्मणः ।।१।।

**ब्रह्मपुराण शिवपुराण तथा गीतासार**

धूमरहित प्रज्वलित अग्नीप्रमाणे समान प्रकाशमान सूर्याप्रमाणे किंवा आकाशात चमकणाऱ्या विजेप्रमाणे आपल्या अंतराकाशात साधक आत्म्याला पाहतात. तीच ज्योती समस्त प्राण्यांचे जीवात जीवात्मा आहे. ते दीप शिखेच्या आकाराने सर्वदा हृदयात स्थित आहे. ज्या वेळी आत्मा शरीरात प्रज्वलित होतो त्या वेळी सर्व पापांचा क्षय होऊन मनुष्याला ज्ञान उत्पन्न होते.

हृत्पुंडरीकमध्यस्थं चैतन्यज्योतिरव्ययम् ।
निवातदीपसद्दशमकृत्रिममणिप्रभम् ।।
ध्यायतो योगिनस्तस्य मुक्तिः करतलेस्थिता ।।
ध्यानयुक्तः सदा पश्येदात्मानं सूर्यचन्द्रवत् ।।
सत्त्वस्यानुपपत्तौ तु दर्शनं तु न विद्यते ।।१।।

**त्रिशिख ब्राह्मणोपनिषद**

हा ज्योतिरूप चैतन्य अव्यय आत्मा हृदयकमलात निर्वात दीपवत् स्थिर अकृत्रिम मण्याप्रमाणे प्रकाशमान आहे. त्याच्या ध्यानाने योगी सहज मुक्त होतात. ध्यानमुक्त होऊन सदा आत्म्याला सूर्यचंद्रवत् पहावे. परंतु सत्त्वगुण उत्पन्न झाल्याशिवाय असे दर्शन होत नाही. म्हणून साधकांनी आत्मदर्शन होण्याकरिता नेहमी सत्त्वगुणाचा आश्रय करावा.

ध्यायन्ते योगिनस्तन्च शुद्ध ज्योतिः स्वरूपिणम् ।
हस्तपादादिरहितं निर्गुणं प्रकृतेः परम् ।।१।।
करपादोदरांगन्गास्थिररहितं परमेश्वरम् ।
सर्व तेजोमयं ध्यायेत्सच्चिदानंद लक्षणम् ।।२।। **कुलार्णव तन्त्र**

ज्या परब्रह्म परमात्म्याचे योगीजन प्रकृतीच्या पलीकडील निर्गुण हस्त पादादिरहित निराकार शुद्ध ज्योतिर्मय स्वरूपाचे ध्यान करतात तो परमेश्वर हस्त, पाद, उदरादि, अंगरहित व अस्थिमांसादि स्थूल शरीररहित निराकार आहे. म्हणून साधकाने त्याचे सच्चिदानंद लक्षण स्वरूपाचे तेजोमय ध्यान करावे.

## नवचक्रांत विभिन्नरूप ब्रह्मज्योति दर्शन

मूलाधारभिधं चक्रं प्रथमं समुदीरीतम् ।
तत्र ध्येयं स्वरूपं तु पावकाकारमुच्यते ।।१।।
स्वाधिष्ठानाभिधं चक्रं द्वितीयं चोपरिस्थितम् ।
प्रवालाकुरतुल्यम् तु तत्र ध्येयं निगद्यते ।।२।।
तृतीयं नाभिचक्रे तु ध्येयं रूपं तडिन्निभम् ।
तुर्ये हृदयचक्रे तु ज्योतिर्लिन्गाकृतीय्यते ।।३।।

**वशिष्ठकृत तत्त्वसारायण अन्तर्गत रामगीता**

मूलाधार प्रथम चक्रात ध्यान करण्याने आपले ज्योतिर्मय स्वरूप अग्निरूप भासते. स्वाधिष्ठानांत प्रवालान्कुराप्रमाणे प्रतीयमान होते. मणिपूर चक्रात आत्मज्योतीचे दर्शन विद्युतप्रमाणे दिसते. अनाहत चक्रात आत्मज्योतीचे दर्शन लिंगाकृतिरूपाने होते.

पंचमे कंठचक्रे तु सुषुम्ना श्वेतवर्णिनी ।
ध्येयं षष्ठे तालुचक्रे शून्यचित्तलयार्थकम् ।।४।।
भूचक्रे सप्तमे ध्येयम् दीपांगुष्ठप्रमाणकम् ।
आज्ञाचक्रेऽष्टमे ध्येयं रूपं धूम्रशिखाकृतिः ।।५।।
आकाशचक्रे नवमे परशुः स्वोध्द्र्वशक्तिकः ।
एवं चक्रेण चक्राणि ध्येयरूपाणि विद्धिच ।।६।।

पाचव्या विशुद्ध चक्रात स्वरूप ज्योती सुषुम्ना श्वेतवर्ण प्रतीत होते. सहाव्या तालुचक्रात ज्या ठिकाणी चित्तलय होतो त्या ठिकाणी ध्यानाने ब्रह्मज्योती शून्याकार एक रस आपोआप ध्यानगम्य होते. भ्रूमध्यात अंगुष्ठमात्र दीपशिखा प्रतीत होते. अष्टम आज्ञाचक्रात आत्मज्योती धूम्रशिखेप्रमाणे दिसते. नवव्या आकाशचक्रात आत्मज्योतीचा आकार चमकणाऱ्या परशूप्रमाणे प्रतीत होतो. याप्रमाणे आत्मज्योती नऊ चक्रांत नाना प्रकारांनी ध्यानगोचर होते.

अखंडैकरसत्वेन ध्येयस्यैकेऽप्युपाधितः ।
आकारा विविधा युक्ता नोपाधिश्चेत्तरः स्वतः ।।७।।

विद्याशक्ति विलासेन पावकात् विस्फुल्लिंगवत् ।
अकस्मात् ब्रह्मणोऽखण्डात् विविधा कृतयोऽभवन् ।।८।।
प्रत्यगात्माभिधानां तदेतेषां ध्येय वस्तुनाम् ।
अचेतनत्वं स्वप्नेऽपि न शक्यं विबुधैरपि ।।९।।

ही आपोआप ध्यानात येणारी प्रत्येक ज्योती आनंद प्रदान करते. म्हणून या आत्मरूप ज्योती सर्व एकच आहेत. या सर्व एकरूप असूनही उपाधिभेदाने विभिन्न रूपे धारण करतात. विद्याशक्ती कुंडलिनी देवीच्या विलासाने, ज्याप्रमाणे अग्नीपासून ठिणग्या निघतात त्याप्रमाणे एका अखंड ब्रह्मापासून नाना प्रकारच्या ज्योतिरूप आकृती प्रकाश पावतात. ज्योतिरूप प्रत्यगात्मानाम या सर्व वस्तू अचेतन नाहीत म्हणून ध्यानात प्रत्यक्ष दर्शन करणाऱ्या साधकांना बाहेरचे सूर्य, चंद्र, अग्नी, विद्युत यांच्याप्रमाणे अंतरात होणाऱ्या ज्योतिदर्शनाला स्वप्नातसुद्धा अचेतन समजू नये.

## आकार रूप ब्रह्मज्योति दर्शन

अन्येच योगिभिर्ध्यानेष्वाकाराश्चेतनात्मकाः ।
दृश्यन्ते तान्च वक्ष्यामि सावधानमनाः श्रुणु ।।१०।।
वटस्य कणिकाकारः श्यामाकसदृशः क्वचित् ।
श्यामाकतन्डुलाकारो बालाग्रशात भागवत् ।।११।।
नीवारशुकवत् शुक्र ज्योतिर्वत्सूर्यवत् क्वचित् ।
चन्द्रवच्चाणुवत्सूक्ष्मं प्रादेशपरिमाणवत् ।।१२।।

उक्त ज्योतीहून भिन्न व चेतनात्मक आकाराचे ज्योतिर्मयदृश्य ध्यानात योगी पाहतात त्यांच्याविषयी सांगतो. सावधान मनाने ऐक. वडाच्या बीजाच्या कणिप्रमाणे, सावाच्या धान्याप्रमाणे किंवा त्याचा तांदळाप्रमाणे कधी त्याहून सूक्ष्म धान्याप्रमाणे आणि त्याहूनही सूक्ष्म बालाग्रशात भागाप्रमाणे अतिसूक्ष्म दृश्य प्रकाशरूपाने अंतरात दिसते. ही अन्तर्ज्योतीची दर्शन प्रकाशित शुक्र ताऱ्याप्रमाणे ज्योतिर्मय अशी सूर्याप्रमाणे कधी चंद्राप्रमाणे आणि परमाणुवत ब्रह्मनाडी सुषुम्नेमध्ये अंतराकाशात अति लहान प्रदेशात महान ज्योतिरूप आकाराने होतात.

खद्योतवच्च स्फटिक सदृशस्तारवत् क्वचित् ।
नीलज्योतिः क्वचित् रक्तज्योतिः शुभ्रद्युतिः क्वचित् ।।१३।।
विविध ज्योतिरन्यत्र ज्योतिषां ज्योतिरेवसः ।
अभिव्यक्तिकरा एवं आकारा ब्रह्मणि स्थिताः ।।१४।।

योगिनां यतचित्तानां जितश्वासोन्द्रियात्मनाम् ।
ध्यानेनामी प्रकाशन्ते चिदाकाराः पुनः पुनः ।।१५।।

ही महान आत्मज्योती कधी काजव्याप्रमाणे, कधी स्फटिकाप्रमाणे किंवा मोत्याप्रमाणे चमकणारी अशी दिसते. तिचा रंग कधी निळा, कधी तांबडा व कधी विद्युतसदृश श्वेत असतो. या नाना प्रकारच्या व रंगांच्या ज्योतीचे दर्शन एकत्र होते. कारण आत्मा सर्व ज्योतींची महान ज्योती आहे. म्हणून नाना प्रकारच्या ज्योती आत्मज्योतीपासून प्रकाशित होतात. ब्रह्माची अभिव्यक्तिकारकर या विविध प्रकारच्या प्रकाश पावणाऱ्या ज्योती ब्रह्माच्याच ठिकाणी अवस्थित आहेत. म्हणून ज्या साधकांनी मन, प्राण आणि इंद्रियांचा जय केला आहे, अशांच्या ध्यानांत या चिदाकार चैतन्यरूप ज्योती वारंवार प्रकट होतात.

## व्यवहार दशेत ब्रह्मज्योति दर्शन

व्यवहार दशायां च योगिनः खंडरूपकम् ।
स्तंभं कुड्य कुशूलादिष्विदं ज्योतिः प्रकाशते ।।१६।।
यत्र यत्र विकारेषु दृष्टिः पतितः योगिनः ।
ते सर्व चिन्मया भान्ति तडिद्वत्तत्क्षणे भृशम् ।।१७।।
ज्योतिरेव परं ब्रह्म ज्योतिरेव परं सुखम् ।
ज्योतिरेव परा शांतिर्ज्योतिरेव परं पदम् ।।१८।।
नवचक्रेषु यः पश्येद्यत्र कुत्रापि योगतः ।
प्रत्यागात्मानमन्तेऽयं ब्रह्मलोके महीयते ।।१९।।

कुंडलिनी शक्ती जागृतीने ज्यांच्या ठिकाणी या ज्योती प्रकट होतात त्यांना व्यवहारदशेत सुद्धा ज्या ठिकाणी यांचे मन लागते त्या ठिकाणी अखंड ज्योती दिसू लागतात. ज्या पदार्थावर साधकाची दृष्टी पडते त्या ठिकाणी विद्युत सदृश चिन्मय ज्योती स्पष्ट दिसते. ही ज्योती परब्रह्म आहे व परमसुख आणि परमशांतिदायक आहे. ही आत्मज्योतीच परमपद आहे. साधक लोक साधनाने नऊ चक्रांत अथवा कोठेही ज्योतिरूप प्रत्यगात्म्याचे दर्शन करतात आणि शेवटी त्यांना ब्रह्मलोकाची प्राप्ती होते.

उक्तलक्षणमात्मनं कूटस्थं सद्गुरोर्मुखात् ।
श्रुत्वात्र पश्येद् ध्यानेन मुद्रया भद्रयापि च ।।२०।।
आधारेषु समस्तेष्वप्युक्तस्य प्रत्यगात्मनः ।
दृष्टव्यत्वस्य नियमो नैव चित्त विशुद्धये ।।२१।।

यत्र कुत्रापि चाधारे दृष्ट्वा ध्यानेन तं ततः ।
शुद्धचित्तो महावाक्य श्रवणेऽधिकृतो भवेत् ।।२२।।

जे लोक वेदांतकथित ज्ञानाने अधिकारी होऊन ज्ञान लाभ करू इच्छितात त्यांनी सद्गुरूच्या मुखाने पूर्वोक्त ज्योतिरूपी कूटस्थ आत्म्याचा विषय श्रवण करून योगसाधनाने अथवा शांभवी मुद्राने आपल्या ज्योतिस्वरूप आत्म्याला पहावे. कारण चित्तशुद्धीचे फळ आत्मप्रतीति आहे. म्हणून जो अंतरात असा अनुभव घेऊ लागला म्हणजे चित्तशुद्धी झाली असे समजावे. चित्तशुद्धीकरता प्रत्यगात्म्याला प्रत्येक चक्रात पाहिले पाहिजे असे नाही. कोणत्याही ठिकाणी अगर कोणत्याही चक्रात ज्योतिर्मय आत्म्याला पाहिले असता चित्तशुद्धी होते. चित्तशुद्धी झाल्यावर साधक गुरुपासून महावाक्यश्रवणद्वारा ज्ञानाचा अधिकारी होतो व योगसाधनाने समाधीत ज्ञानलाभ करून घेतो.

याप्रमाणे ईश्वरानुग्रहाने व गुरुकृपारूप शक्तिपाताने साधकांना शास्त्रकथनानुसार उपरोक्त नाना प्रकारचे अनुभव येतात. त्यांचे वर्णन करणे सहजसाध्य नाही. तथापि अनुभव घेणे हेच ज्ञान आहे.

## शक्तिपाताचे प्रकार व फळ

सति तस्मिंश्च चिन्हानि तस्यैतानि विलक्षयेत् ।
तत्रैतत्प्रथमं चिन्हं रुद्रे भक्तिः सुनिश्चला ।।१।।
द्वितीयं मन्त्रसिद्धिस्यात्सद्यः प्रत्ययकारिका ।
सर्वसत्ववशित्वं च तृतीयं तस्य लक्षणम् ।।२।।
प्रारब्धकर्म निष्पत्तिश्चिन्हमाहुश्चतुर्थकम् ।
कवित्वं पंचमं ज्ञेयं सालन्कारमनोहरम् ।।
सर्व शास्त्रार्थ वेतृत्वं अकस्मात्तस्य जायते ।।३।।

**मालिनी विजयोत्तर तंत्र**

श्री शंकरापासून परंपरागत हा शक्तिपात उत्कृष्ट तीव्र, मध्यतीव्र व मंदतीव्र, निकृष्टतीव्र अथवा मृदू, मध्यतीव्र, तीव्रतर आणि तीव्रतम इत्यादी भेदाने कित्येक प्रकारचा आहे. त्याचे फळ देशकाल पात्रानुसार व विलंबाने क्रमाने आणि तत्काळ इष्ट, अनिष्ट आणि निकृष्ट रूपाने गुरुशिष्याच्या योग्यतेनुसार इच्छा झाल्याने अथवा न झाल्यानेही प्राप्त होते.

गुरुद्वारा तीव्र शक्तिपात झाल्याने प्रयत्नाशिवाय अकस्मात शिष्याचे ठिकाणी जी लक्षणे होतात त्यातील प्रथम लक्षण हे आहे की साधकाची रुद्राच्या ठिकाणी

सुनिश्चल भक्ती होते. दुसरे त्याला प्रत्यक्ष विश्वासयोग्य सत्वर मन्त्रसिद्धी होते. तृतीय लक्षण सर्व प्राण्यांना आपल्याला अनुकूल वश करून घेण्याची योग्यता येते. चवथे त्याच्या प्रारब्ध कर्माची निष्पत्ती होते. ते न भोगताही सुटते. तथापि साधक दैवयोगाने सुखदुःखाचा भोग जो काही प्राप्त होईल त्याचा प्रतिकार अथवा प्रयत्न न करता प्रसन्न चित्ताने आनंदपूर्वक भोगून संपविण्यातच प्रसन्न राहतो. पाचवे लक्षण साधकाला कवित्व व सर्व शास्त्रार्थ जाणण्याचे सामर्थ्य प्राप्त होते.

ज्या शक्तीच्या प्रभावाने साधक दिव्यज्ञानाचा अनुभव घेऊन मोक्ष प्राप्त करून घेतात, त्या शक्तिपाताच्या वास्तविक विज्ञानाचे स्वरूप केवळ श्री महेश्वर जाणतात अथवा ज्यांच्यावर ते कृपा करतात तेही काही जाणू शकतात. परंतु वर्तमान ही परम दुर्लभ रुद्रशक्ती संपूर्ण प्रकाशित अशी क्वचित कोठे कोणाच्या ठिकाणी असेल किंवा नाही हे त्या ईश्वरालाच माहीत. तथापि श्रीमन्नारायणतीर्थ देव गुरूच्या परम कृपेने या विषयाचे अनुशीलन करून जे काही सामान्य ज्ञान झाले त्या फलस्वरूप हा ग्रंथ आहे.

एवमस्यात्मनः काले कस्मिंश्चिद् योग्यतावशात् ।
शक्तिः संबध्यते शैवी शान्ता मुक्ति फलप्रदा ।।४।।
तत्संबंधात ततः कश्चित् तत्क्षणापवृज्यते ।
अज्ञानेन सहैकत्वं कस्यचिद् विनिवर्तते ।।५।।
रुद्रशक्तिसमाविष्टः स जिज्ञासुः शिवेच्छया ।
भुक्तिमुक्ति प्रसिद्ध्यर्थं नीयते सद्गुरुं प्रति ।।६।।
तमाराध्य ततस्तुष्टाद् दीक्षामासाद्य शांकरीम् ।
तत्क्षणाद् वोपभोगाद् वा देहपाते शिवं व्रजेत् ।।७।।

मनुष्याच्या पूर्वजन्मीच्या सुकृताने या जन्मी ज्या वेळी सत्यज्ञान प्राप्त करून घेण्याचा अधिकार प्राप्त होतो त्या वेळी दैवी शक्तिग्रहणाची योग्यता येते. नंतर आत्म्याला परमशांती प्रदायिनी मुक्तिरूप फल देणाऱ्या शैवीशक्तीचा गुरुद्वारा संबंध येतो. कित्येकांना अज्ञानाची निवृत्ती होऊन मग ज्ञानप्राप्त होते. अर्थात कित्येकांना शक्तिपात होताच ज्ञान प्राप्ती होते; कित्येकांना ज्ञानप्राप्तीची सुरवात होते. जप, तप, ध्यान योगादि साधने करीत राहिल्याने ज्या वेळी साधकाच्या ठिकाणी या मंगलमयी शक्तीचा आविर्भाव होतो, त्या वेळी तो रुद्रशक्ती समाविष्ट श्री शिवाच्या इच्छेने भोग व मोक्ष यांच्या प्राप्तीकरता दीक्षेकरिता प्रेरित होतो. कारण मुक्ती भुक्ती देणारे व शक्तीला योग्य क्रमाने चालविणारे गुरूच आहेत. भक्तीने गुरूला प्रसन्न

करून त्यांच्याकडून शांकरीदीक्षा घेऊन साधक तत्क्षणी समाधिद्वारा सर्व कर्मबंधनांचा नाश करून हा मोक्षलाभ करून घेतो व जीवनमुक्त होतो; अथवा भोगांचा उपभोग घेऊन परमशिव पदाला प्राप्त होतो.

याप्रमाणे उपरोक्त शास्त्र कथित क्रमाने शक्तिपाताने कित्येक प्रकारचे भेद आहेत. त्यांचा योग्य प्रयोग शक्तिमान गुरूच्या योग्यतेवर अवलंबून असतो; कारण ज्या परमात्मशक्तीने तत्काळ दिव्य ज्ञान व मोक्ष होतो ती दिव्यशक्ती सामान्य वस्तू नाही. ज्याप्रमाणे हिच्या उचित प्रयोगाने महान कल्याण होते तसेच हिच्या अनुचित प्रयोगाने महा अनिष्ट सुद्धा होते. म्हणून गुरुपरंपरा क्रमाने शुद्ध शक्तीचा उचित प्रयोग न झाल्याने ती शक्ती गुरू व शिष्य यांचे अमंगल करते असेही पाहण्यात आले आहे. म्हणून जो गुरू शक्तिपाताचे भेद यथाविधि जाणत नाही अथवा जो अनुग्रह करून निग्रह करण्याला असमर्थ आहे आणि जो शक्तिपाताच्या वास्तविक विज्ञानाने तसेच त्याच्या तीव्र, तीव्रतर, तीव्रतम उत्कृष्ट निकृष्ट भेदांसंबंधी अनभिज्ञ आहे आणि जो आपल्या गुरुपरंपरा क्रमाचा व्यतिक्रम करून व रूपांतर करून हरेक शिष्याला मन मानेल त्या क्रमाने निकृष्ट प्रकारचा शक्तिपात करतो त्याच्याकडून शिष्याचे अकल्याण होण्याची अधिक संभावना आहे. कारण गुरू स्वतः शैवी शक्तीला सामान्य समजून शास्त्रविधीप्रमाणे न वागेल तर त्याच्यापासून फळ कसे मिळू शकेल ?

## योगसाधना गुप्त राखली पाहिजे

प्रवृत्ति लक्षणाख्यानाद्योगिनो विस्मयात्तथा ।
विज्ञानं विलयं याति तस्मात् गोप्याः प्रवृत्तयाः ।।१।।

**रुद्रयामल तंत्र पटल ३६**

एकाग्र मनाने दृढतापूर्वक तप, भगवद् भजन करीत राहिल्याने साधकांना दिव्यदर्शन तर होतेच परंतु त्याचबरोबर ईश्वरानुग्रहाने अलौकिक शक्तीही प्राप्त होते. दिव्यदर्शन होणे सामर्थ्य प्राप्तीचे लक्षण आहे. जर तसे न होईल तर गुरुकृपा व ईश्वराची महानता ती काय? ज्या तपस्येचे फळ पाठ नाही ती कोण करील? परंतु अशी गोष्ट नाही. साधकाची इच्छा असो वा नसो, ईश्वर साधकाच्या तपस्येनुसार अवश्य व शीघ्र फळ देतो. म्हणून काही आश्चर्यचकित होण्यासारखी गोष्ट नाही. योग साधनाने स्वाभाविक साधकाला ईश्वराच्या दिव्यशक्तीच्या गुणाचा प्रकाश होतोच, यात यत्किंचितही शंका नाही.

सामर्थ्यसंपन्न गुरूपासून दीक्षित झाल्यावर त्यांच्या कृपेने योगाच्या आरंभकालीही नाना प्रकारचे आंतरिक दिव्य अनुभव होऊ लागतात आणि त्या योगाने मानसिक

शक्ती उत्पन्न होते. परंतु विस्मयाने अथवा कुतूहलाने पुष्कळसे साधक ते अनुभव आपल्याहून भिन्न प्रकृतीच्या लोकांना सांगतात. इतकेच नव्हे तर आपले महत्त्व दाखविण्याकरिता आपल्या नावाने वृत्तपत्रात छापून प्रसिद्ध करतात. त्यामुळे त्यांचे ज्ञान नष्ट होते; आणि पुनः असे अनुभव येत नाहीत. म्हणून साधन करण्यामुळे जे जे अनुभव येतील किंवा ईश्वरानुग्रहाने पुष्कळशी सांसारिक कामे आपल्या मनाप्रमाणे होतील, त्यामुळे विस्मित न होता, चंचलतेचा त्याग करून, शांत चित्ताने हृदयांत प्रयत्नपूर्वक गुप्त ठेविले पाहिजेत.

योग योगाद्भवेन्मोक्षो मंत्र सिद्धिरखण्डिता ।
न प्रकाश्यमतो योगं भुक्तिमुक्तिफलाय च ।।
योग योगाद्भवेन्मोक्षस्तत्प्रकाशाद्विनाशनम् ।
अतो न दर्शयेद्योगं यदीच्छेदात्मनः शुभम् ।।

योगसाधन करण्याने योगाने मोक्षाची प्राप्ती व अखंडित मंत्रसिद्धी होते. कारण योगच भुक्ती व मुक्ती प्रदान करतो. म्हणून योगाचे फळ भुक्ती व मुक्ती प्राप्त करून घेण्याकरिता योगसाधन गुप्त राखिले पाहिजे. एकांत मनाने योगसाधन करीत राहिल्याने त्यापासून निश्चयाने मोक्ष मिळतो. परंतु अपक्व अवस्थेत त्याचा प्रकाश केल्याने नाश होतो. योगसाधनाने ज्या सिद्धी होतात त्यांचा चमत्कार लोभाने लोकांना दाखवू नये. जर योगाने मोक्ष मिळतो तर भोग मिळाल्याशिवाय कसा राहील? परंतु प्रकाशित केल्याने मोक्षाची हानी होतेच व भोगही मिळत नाही.

म्हणून जोपर्यंत समाधीने दिव्य आत्मज्ञानाची सिद्धी होणार नाही तोपर्यंत प्राणांतीही प्रकाशित करू नये. दुर्बुद्धीने भोगप्राप्तीची इच्छा करून लोकांना दाखविल्याने व शिकविल्याने साधकाचा विनाश होतो. याकरिता साधकाला आपल्या कल्याणाची इच्छा असल्यास जोपर्यंत आपली अभीष्ट सिद्धी झाली नाही, ज्ञान परिपक्व झाले नाही आणि गुरू प्रसन्न होऊन आज्ञा दिली नाही तोपर्यंत योगसाधन कोणाला दाखवू नये व शिकवूही नये.

तत्त्वाप्ति वा गुरोराज्ञां विनापि गुरुतां व्रजन् ।
शक्तिसम्पातकृद्योऽसौ क्रीडेद्विषधरैः सह ।।

परंतु जे लोक गुरूपासून योगदीक्षा घेऊन गुरूच्या आज्ञेशिवाय व पूर्णत्व प्राप्त करून घेतल्याशिवाय दुसऱ्यांना शक्तिसंचार करून गुरू होण्याची इच्छा धरतात त्यांना विषारी सर्पाशी खेळण्याचे फळ प्राप्त होते. कारण ही शैवी शक्ती परंपरागत नियमांचे रक्षण न करता स्वेच्छेने वागणाऱ्या दात्याचा व गृहीत्वाचा नाश करते.

## योगाचे रहस्य अप्रकाश्य आहे

स्वशास्त्रोक्तं रहस्याद्यं न वदेद्यस्य कस्यचित् ।
यदि ब्रूयात्स समयाच्च्युत एव न संशयः ।।
एतत्प्रकाशनं यच्च आयुः क्षयकरं स्मृतम् ।
साधकस्य विनाशस्तु तस्मान्नैतत्प्रकाशयेत् ।।
लोभान्मोहाच्च गर्वाद्वा विद्वेषाद्वा प्रकाशयेत् ।
सोऽचिरान्मृत्युमाप्नोति शास्त्राघातविषादिभिः ।।

**कुलार्णव तंत्र तथा गंधर्व तंत्र**

श्री महेश्वर सांगतात, जे साधक शास्त्रकथनानुसार गुरुप्रदत्त योगसाधन करतात, त्याचे आद्यंत रहस्य भलत्या सलत्याला सांगू नये. म्हणून आरंभकाली जे अनुभव येतात ते प्रकट केल्याने किंवा कोणाला मंत्रोपदेश केल्याने साधकांचे आत्मसामर्थ्य व गुरुकृपेचे फळ नष्ट होते आणि त्या योगाने नाना प्रकारचे रोग होऊन आयुष्य क्षीण होते व साधकाच्या साधनाचाही विनाश होतो. म्हणून काही विशेष प्रयोजनाशिवाय योगाचे यथातथ्य रहस्य प्रकट करू नये. परंतु जो साधक दुष्टबुद्धीने, लोभाने, मोहाने धन, कीर्ती किंवा सन्मान प्राप्त करून घेण्याच्या इच्छेने अथवा गर्वाने (मी मोठा योगी आहे, माझे कोण काय करू शकतो, मी गुरू का होऊ नये) अथवा गुरूच्या द्वेषाने अथवा साधनाच्या तिरस्कार बुद्धीने विद्वेषी होऊन जो आपले साधन प्रकाशित करतो तो आयुष्य संपण्यापूर्वीच अकाली शस्त्राघाताने अथवा विषप्रयोगाने मृत्यू पावतो.

सदा बुद्धिमता भाव्यं योगिना योगसिद्धये ।
एते विघ्ना महासिद्धेर्न रमेत्तेषु बुद्धिमान् ।।
न दर्शयेत्स्वसामर्थ्यं यस्य कस्यापि योगिराट् ।
यथा मूढो यथा मूर्खो यथा बधिर एव वा ।।
तथा वर्तेय लोकस्य स्वसामर्थ्यस्य गुप्तये ।
शिष्याश्च स्वस्वकार्येषु प्रार्थयन्ति न संशयः ।।
तत्तत्कर्मकरव्यग्रः स्वाभ्यासेऽविस्मृतो भवेत् ।
अविस्मृत गुरोर्वाक्यमभ्यसेत्तदहर्निशम् ।।

श्रीमहेश्वराच्या आज्ञांनुसार आत्मज्ञानाच्यापूर्वी साधकाने आपले योगसाधन व त्यामुळे प्राप्त झालेले सामर्थ्य प्रकट करू नये. महाऐश्वर्यसंपन्न योग्यांनीही आत्मज्ञान महासिद्धिविना इतर जे ऐश्वर्य आहे ते सर्व ब्रह्मज्ञानाला विघ्नरूप आहे असा विचार

करून त्यांच्यात आसक्त होऊ नये. आपले सामर्थ्यही ज्याला त्याला दाखवू नये. सामर्थ्य गुप्त राखण्याकरिता व्यवहारात लोकांशी मूढासारखे, मूर्खाप्रमाणे आणि बहिऱ्याप्रमाणे वागावे. म्हणजे लोक ओळखू शकणार नाहीत. कारण सामर्थ्य कळून आले तर लोक आपापल्या कार्याकरिता शिष्य होण्याची इच्छा धरून निःसंदेह प्रार्थना करीत राहतील व त्यांच्यावर कृपा करीत राहिल्याने आपला नित्याचा अभ्यास सुटतो व फलस्वरूप गुरुवाक्याचे उल्लंघन होते व मनाची स्थितीही पहिल्याप्रमाणे रहात नाहीत. म्हणून गुरुवाक्याची स्मृती करून आपल्या अभ्यासात मग्न असावे. म्हणजे याच जन्मात योगाने दिव्य ब्रह्मज्ञान होऊन जीवन्मुक्त दशा लवकर प्राप्त होईल.

आयुर्वित्तं गृहच्छिद्रं मंत्रमैथुन भैषजम् ।
तपोदानापमानश्च नवगोप्यानि प्रयत्नतः ।।

**दक्षसंहिता**

गुप्त विषय प्रकट केल्याने महा अनर्थ होतो. म्हणून शास्त्रात सांगितले आहे की मनुष्याने आपले आयुष्य, धन, गृहछिद्र, मंत्र, मैथुन, औषध, तपस्या योगसाधन, दान व आपला अपमान हे नऊ विषय गुप्त राखावेत. कारण यांच्या प्रकाशाने महा अनर्थ व मोठे विघ्न होते.

## योगसाधनाचे अंतराय

व्याधिस्त्यानसंशयप्रमादालस्याविरतिभ्रान्तिदर्शनालब्ध
भूमिकत्वानवस्थित्वानि चित्तविक्षेपास्तेऽन्तरायाः ।।

**योगदर्शन समाधि पाद**

व्याधी, स्त्यान, संशय, प्रमाद, आलस्य, अविरति, भ्रांतिदर्शन, अलब्ध, भूमिकत्व आणि अनवस्थित्व हे नऊ अंतराय योगशास्त्रात चित्तविक्षेपाचे कारण व योगविरोधी विघ्नरूप म्हणून सांगितले आहेत.

- व्याधि – अनियमित आहाराने अथवा ऋतुदोषाने वात पित्तादि दोष वाढल्याने होणाऱ्या रोगांना व्याधि म्हणतात.
- स्त्यान – इच्छा झाली असताही योगामध्ये प्रवृत्त होण्याची चित्ताची असमर्थता आणि तमोगुणामुळे चित्ताच्या मूढतेने साधकाची अकर्मण्यता ह्याचे स्त्यान
- संशय – योगसिद्धी होईल की नाही, त्याचे फळ सत्य आहे की मिथ्या इत्यादी संदेहयुक्त अवस्थेचे नाव संशय आहे. हा साधकाचा सर्वनाश करणारा आहे.

- प्रमाद – समाधीच्या साधनाबद्दल प्रयत्न न करणे आणि योगसाधनाबद्दल उदासीन राहणे हे प्रमादाचे लक्षण आहे. या प्रमादाने प्राप्त झालेला योगही नष्ट होतो.
- आलस्य – कफादिकाने शरीर व तमोगुणाने चित्त जाड्य उत्पन्न होऊन योगसाधनास प्रवृत्ती न होणे, ध्यानात चित्त न लागणे इत्यादी चित्ताच्या दुरावस्थेचे नाव आलस्य आहे.
- अविरति – ध्यानाला बसताच विषय व्यापाराचे संकल्प होणे, विषय तृष्णा अविरति आहे. ती बलात्काराने साधकाच्या मनाला ध्यानापासून परावृत्त करून विषयाच्या ठिकाणी लावते.
- भ्रान्तिदर्शन – योगसाधनात विपर्यय ज्ञानाला भ्रान्ती म्हणतात. ज्याच्या योगाने साधक काहीच्या काहीच धारणा करून घेतो.
- अलब्ध भूमिकत्व – समाधीचा अभ्यास करीत राहूनही काही कारणाने लाभ न होणे हे अलब्ध भूमिकत्व आहे. हे विघ्नही साधकाला संतोषापासून च्युत करते.
- अनवस्थित्व – पहिली योगात उत्तम स्थिती होती, परंतु आता नाही हा भाव उत्पन्न अनवस्थित्व अंतराय साधकाला आक्षेप करतो आणि समाधिस्थिती उत्पन्न होऊ देत नाही.

या नऊ विघ्नांशिवाय याचे सहकारी दुःख, दौर्मनस्य, अंगमेजयत्व आणि श्वास प्रश्वास हे आहेत.

दुःख – अधिभौतिक इत्यादी नाना प्रकारचे प्रसिद्ध आहे.

दौर्मनस्य – इच्छेचा विघात झाल्याने मनाचा क्षोम.

अंगमेजयत्व – इच्छेशिवाय शारीरिक कंप, अंग हालणे.

श्वास प्रश्वास – ध्यानाच्या वेळी अधिक श्वास प्रश्वास चालण्याने मन चंचल होते. ही सर्व योगाची मूलरूप विघ्ने आहेत; म्हणून याच्या प्रतिषेधार्थ एकतत्त्वाचा अभ्यास केला पाहिजे. विशेष विवरण योग दर्शनात आहे.

## योगविघ्न प्रतिकार

योगिनोऽपक्वगोस्य युन्जतः काय उत्थितैः ।
उपसर्गैविहन्येत तत्रायं विहितो विधिः ।।३८।।
योगधारणया कांश्चिदासनैर्धीरणान्वितैः ।

तपोमन्त्रोषधैः कांश्चिदुपसगनि विनिर्दहेत ।।३९।।
कांश्चिन्ममानुध्यानेन नाम संकीर्तनादिभिः ।
योगेश्वरानुवृत्त्या दा हन्यादशुभदान्छनैः ।।४०।।
यदि कुर्यात् प्रमादेन योगी कर्म विगर्हितम् ।
योगेनैव दहेदहो नान्यत्तत्र कदाचन ।।२५ । २०।।

**एकादश स्कंध अध्याय २८**

भगवान् श्रीकृष्ण सांगतात की योगसाधन करणाऱ्या साधकाला योग सिद्ध होण्याच्या पूर्वी जर काही शारीरिक मानसिक आध्यात्मिक व्याधिरूप विघ्न उत्पन्न झाले तर त्याचा हा प्रतिकार आहे की काही रोगांना योगधारणेने, काहींना आसनयुक्त प्राणायामाने व काही जपतप मंत्र आणि औषधाने शांत करावे. त्याचप्रमाणे कित्येक माझ्या ध्यानाने, कित्येक माझ्या नाम संकीर्तनाने आणि आणि कित्येक विघ्नरूप उपद्रव मंगलदायक योगीश्वराच्या ध्यानाने हळूहळू नष्ट करावेत. जर प्रमादवश साधक योग्याकडून एखादे लोकनिन्दित अथवा गर्हित कर्म झाले तर त्याचे प्रायश्चित्त योगसाधनानेच केले पाहिजे. त्याला योगाशिवाय दुसरा उपाय करण्याची आवश्यकता नाही.

केचिद्देहमिमं धीराः सुकल्पं वयसि स्थिरम् ।
विधाय विविधोपायैरथ युञ्जन्ति सिद्धये ।।४१।।

कोणी कोणी धीर योगी पुरुष या शरीरात मंत्र औषधी इत्यादी नाना प्रकारच्या उपायांनी कल्प करून, शरीर युवावस्थेत स्थिर करून, पुनः सिद्धीकरता योगसाधन करतात. परंतु चतुर पुरुषाला असे करण्याची आवश्यकता नाही. हा व्यर्थ परिश्रम आहे. कारण वृक्षाला लागलेल्या फळाप्रमाणे शरीरादि एक दिवस पडणार आहे. कदाचित नित्य हटयोगाचे साधन करीत राहिल्यास शरीराचा कल्प होऊन शरीर सुदृढ झाले तथापि त्यामुळे देहवासना दृढ होण्याचा अधिक संभव असतो. म्हणून माझे भजन करणाऱ्या बुद्धिमान योगसाधन सोडून केवळ शरीरच सर्वस्व न समजता रहावे. कारण शरीर सुदृढ करण्याच्या नादी लागणे हे माझ्या प्राप्तीच्या मार्गातील एक विघ्न आहे. म्हणून जे साधक निष्काम होऊन योगसाधनाने माझ्या ठिकाणीच मग्न होऊन राहतात व सर्व सुख आपल्याच ठिकाणी अनुभवतात, अशा माझा आश्रय करणाऱ्या योगपरायण साधकाला कोणतेही विघ्न येत नाही; आणि दैववशात आलेच तर त्यापासून बाधा होत नाही.

## योगसिद्धीचा उपाय

भयं क्रोधमथालस्य मतिस्वप्नातिजागरम् ।
अत्याहारमनाहारं नित्यं योगी विवर्जयेत् ।।१४।।
अत्याहारः प्रयासश्च प्रजल्पो नियमग्रहः ।
जनसंगश्च लोल्यंच षड्भिर्योगो विनश्यति ।।१५।।
उत्साह साहसधैर्यात्तत्त्वाज्ञानाच्च निश्चयात् ।
जनसंग परित्यागात् षड्भिर्योगः प्रसिध्यति ।।१६।।
युक्ताहार विहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।
युक्त स्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ।।१७।।

**हटयोग प्रदीपिका तथा गीता**

योगसाधना करणाऱ्या साधकांना भय, क्रोध व आळस तसेच अधिक झोप घेणे, अधिक जागणे, अति खाणे व उपवास करणे सदा वर्ज्य आहे. कारण अति आहार, अति श्रम, अति बोलणे, नियम ग्रहण करणे, तसेच योगसाधनाला विरोधी अशांची संगती करणे आणि चंचलता ही सहा योगसाधनाचा नाश करणारी आहेत. म्हणून यांचा त्याग केला पाहिजे. उत्साह, साहस, धैर्य, तत्त्वज्ञान, शास्त्रद्वारा आपल्या कल्याणाचा दृढ निश्चय करणे आणि प्रतिकूल जनसंगाचा परित्याग करणे हे सहा योगसिद्धी करणारे आहेत. यांचे ग्रहण केले पाहिजे. जे साधक परिमित आहार आणि नियमित व्यवहार करतात, तसेच जे नियमाने योग्य वेळी निजतात व जागतात आणि आपले व्यावहारिक कर्म करीत असता आवश्यकतेनुसार नियमित परिश्रम करतात त्यांना सर्व दुःखांचा नाश करणारा योग सिद्ध होतो.

**श्रीगुरुदेवदत्त**